


# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय



विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा! ✦ अमरावती, मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १० धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!


# आरोपींचे आका कुठेही लपलेले असोत, त्यांना शोधून काढू-मुख्यमंत्री



**मुंबई / प्रतिनिधी-** जुहूसारख्या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने मोठी खळबळ उडवून दिली आहे. या धक्कादायक घटनेनंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत पोलिसांच्या तपासाची माहिती दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली आहे. पोलिसांच्या हाती या प्रकरणाचे महत्त्वाचे धागेदोरे लागले असून रातोरात मुख्य आरोपींची ओळख पटवण्यात आली आहे. लवकरच या आरोपींना बेड्या ठोकल्या जातील. हे लोक महाराष्ट्राबाहेरून किंवा देशाबाहेरून सूत्रे हलवत आहेत. त्यामुळे इतर राज्यांच्या पोलिसांशी समन्वय साधून आणि केंद्र सरकारची मदत घेऊन या सर्वांचा पर्दाफाश केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टायगर श्रॉफवरील हल्ल्यानंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणा-या विरोधकांचा फडणवीसांनी चांगलाच समाचार घेतला. विरोधकांनी टीका करण्यापूर्वी थोडे अंतर्मुख होऊन स्वत:च्या काळाकडे पाहावे. हे तेच लोक आहेत ज्यांच्या काळात पोलिसांच्या मदतीने देशातल्या सर्वात मोठ्या उद्योगपतीच्या घरासमोर बॉम्ब ठेवण्यात आला होता. मनसुख हिरेन यांची हत्या आणि सीबीआयने उघडकीस आणलेले बदल्यांमधील घोटाळे ते कदाचित विसरले असावेत, असा घणाघाती पलटवार त्यांनी केला. मुंबई पोलीस अत्यंत व्यावसायिक असून ते या प्रकरणाच्या मुळाशी नक्की जातील, असेही ते म्हणाले. या गोळीबारामागे लॉरेन्स बिश्नोई गँगचा ➪(पान २ वर)

# निधीची कमतरता; महिलांच्या ७ योजना गुंडाळल्या

## महिला व बालविकास विभागाचा निर्णय

**मुंबई / प्रतिनिधी-** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची राज्यभरात सध्या तुफान चर्चा सुरू आहे. महिलांना आर्थिक सा मिळावे म्हणून लाडकी बहीण योजनेद्वारे प्रत्येक महिन्याला १५०० रूपयांचा सन्मान निधी दिला जातो. पण दुसरीकडे महिला व बालविकास विभागाच्या महत्त्वाच्या ७ कल्याणकारी योजनांना कात्री लावण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. खर्चाचा अभाव, निधीची कमी मागणी आणि नागरिकांकडून अपुरा प्रतिसाद मिळाल्यामुळे योजनांना कात्री लावण्यात आली आहे. यातील ४ योजना तात्काळ बंद केल्या असून उरलेल्या ३ योजना टप्प्याटप्प्याने गुंडाळल्या जाणार आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे 'माझी कन्या भाग्यश्री' आणि महिला मंडळांना दिल्या जाणा-या अनुदानासारख्या महत्त्वाच्या योजनांना फटका बसला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर शासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगू लागल्या आहेत. 'लाडकी बहीण' योजना अद्याप सुरू आहे. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सप्टेंबर महिन्याचा सन्मान निधी लवकरच लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. पण दुसरीकडे मात्र महिला बाल विकास विभागाच्या ७ योजना बंद करण्यात आल्या आहेत. महिलांसाठी बहुउद्देशीय सामाजिक केंद्रे ही योजना खर्च घटत असल्याच्या ➪(पान २ वर)



# राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्या!

**अकोला / प्रतिनिधी-** अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या घटनेनंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली. 'राज्याचा गृहमंत्री 'पांडू हवालदार' झाला आहे,' अशी बोचरी टिप्पणी करत त्यांनी महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री देण्याची मागणी केली.अकोला येथे बोलताना सपकाळ यांनी राज्यातील सुरक्षा व्यवस्थेवर ➪(पान २ वर)



# टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई; ३ आरोपींना घेतले ताब्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर गोळीबार प्रकरणातील तिन्ही आरोपींना राजस्थान पोलिसांनी अटक केली आहे. मुंबईतून सुरत अन् तेथून ते नेपाळला जाण्याच्या तयारीत असतानाच मुंबई पोलिसांच्या वेगवान हालचालींमुळे आणि राजस्थान पोलिसांच्या सहकार्याने या तिघांना कोटा येथे अटक करण्यात आली. यासंदर्भातील संपूर्ण माहिती कोटी सिटीचे पोलीस अधिक्षक तेजस्विनी गौतम यांनी माहिती दिली.

राजस्थान दहशतवदाविरोधी पथक आणि कोटा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत पुणे जयपूर एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. मुंबई पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी लागलीच राजस्थान पोलिसांशी संपर्क साधल्याने या तिघांना अटक करण्यात यश आलं आहे.



याबाबत पोलीस अधिक्षक तेजस्विनी गौतम म्हणाल्या, 'टायगर श्रॉफ प्रकरणातील आरोपी पुणे-जयपूर रेल्वेने प्रवास करत असून ते थोड्याचवेळात कोटात येथे येणार असल्याची माहिती आज सकाळीच आम्हाला प्राप्त झाली. या माहितीनुसार आम्ही पथके तैनात करून अवघ्या १५ मिनिटांत सापळा रचून संपूर्ण ट्रेनमध्ये शोधमोहिम ➪(पान २ वर)

# विधान परिषदेच्या ५ पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान

- ✦१८२ उमेदवार निवडणूक रिंगणात
- ✦२ हजार ४१९ मतदान केंद्रांवर १० लाख ६८ हजारांहून अधिक मतदार बजावणार हक्क
- ✦२७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी
- ✦निवडणूक यंत्रणा सज्ज



**मुंबई/प्रतिनिधी-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद, पुणे व नागपूर विभागातील तीन पदवीधर तसेच अमरावती व पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे.या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे. मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. पाच जागांसाठी १८२ उमेदवार

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तसेच अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ४७ उमेदवार असून, या पाचही मतदारसंघांत मिळून १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदार ठरविणार आहेत.

**२ हजार ४१९ मतदान केंद्रांवर व्यवस्था-** पाचही ➪(पान २ वर)



## सुट्टीची सूचना

आज मंगळवार दि. २० आक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) निमित्त दै. जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार दि, २१ आक्टोबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची नोंद एजंट, जाहिरातदार आणि वाचकांनी घ्यावी.

**- व्यवस्थापक**

# आ.जितेंद्र आव्हाडांना जीवे मारण्याची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईत अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असतानाच, आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना जीवे मारण्याची धमकी आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे सिनेसृष्टीत खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना ताजी असतानाच, आता आमदार जितेंद्र आव्हाड यांनाही जीवे मारण्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. यासंदर्भात आव्हाड यांनी एक मोबाईल नंबर शेअर करत आपल्या ट्विटमध्ये लिहिले आहे की, एका इसमानी दोन ते तीन वेळा मला फोन केला, ➪(पान २ वर)
















# कंत्राटदारांनी काढली सरकारची अंत्ययात्रा





## थकीत बिलांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर घोषणाबाजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनावर विविध कामांचे हजारो कोटी रुपयांचे बिल थकल्याच्या निषेधार्थ कंत्राटदार रस्त्यावर उतरले आहे. राज्य अभियंता संघटना आणि इतर संघटनांच्या शेकडो कंत्राटदारांनी आज सोमवार १९ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शासनाची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढली आणि जोरदार घोषणाबाजी केली.

आदोलनात इंजिनिअर्सच्या हातातील पोस्टर्सने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पोस्टरवर जिल्हाधिकारी मिसिंग, हमारे बिल बाकी है'...सह अनेक मीम्स बनवण्यात आले होते, जे रस्त्याने जाणाऱ्या प्रत्येकाला आपल्याकडे पाहण्यास भाग पाडत होते.

संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,सर्व विभागांकडे कंत्राटदारांची हजारो कोटी रुपयांची बिले थकीत आहेत. गेल्या ११ महिन्यांत ९ उद्योजक कंत्राटदारांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे आम्ही प्रशासनाचा निषेध करत आहोत.

कंत्राटदारांच्या समस्या सोडवण्यासाठी तातडीने उच्चस्तरीय समिती गठीत करावी. केवळ बिलाचा विषय नाही, तर सरकारच्या धोरणात्मक निर्णयांमुळे ही कंत्राटदार अडचणीत आले आहेत. सरकार विरोधात तीव्र असंतोष असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.सर्व प्रकरणांवर तात्काळ कारवाई करावी, आत्महत्या रोखण्यासाठी आणि विकास कामे करणाऱ्या कंत्राटदारांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनाही पाठवण्यात आली आहे. सरकारची अर्थी काढून निषेध व्यक्त केला. यानंतर ही मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. आंदोलनामध्ये अश्विन पवार, उज्ज्वल पांडे, राहुल मुरई, ऋषिराज नागरीया, गजानन दलवी, यश तायडे, आयुष किलोर, शिवचरण राठोड,सचिन डाके,दिपक साबू,अभिजीत ठाकूर,पंकज राठोड, राहुल सोटे,नरेंद्र भुतडा, संदीप राठोड, मनोहर लेवटे, अनिरुद्ध देशमुख, अश्विन सानप, कुसुम शेलोकर, मो. समीर, वैभव लाडे,यशवंत बाजड, राधेशाम अहिर, निशांत वानखडे,गोपाळ राठी, प्रमोद पिंपळे सह शेकडो इंजिनिअर्स आणि कंत्राटदार सहभागी झाले.

## ९०० वर्षांची परंपरा असलेला हिंगलाज भवानीचा नवरात्रोत्सव

**कारला/प्रतिनिधीः-**सुमारे ९०० वर्षापेक्षा जास्त वर्षाची परंपरा असलेला हिंगलाज भवानी मातेचा नवरात्रोत्सव देवीच्या मठात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या नवरात्रोत्सवात गावकरी मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

चांदुर रेल्वे तालुक्यातील कारला हे पाच हजार लोकसंख्येचे गाव असून गावात अनेक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहेत. श्री अवधूत महाराज मंदिर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. तसेच गावात हिंगलाज भवानीचे मंदिर आहे, हे मंदिर सुद्धा सर्वत्र प्रसिद्ध आहे. हिंगलाज भवानीचे मंदिर माहुरगडाच्या मंदिराची उपशाखा असल्याचे वृद्ध जानकार मंडळी सांगतात. या ठिकाणी सुमारे नऊशे वर्षापासून नवरात्रोत्सव साजरा केला जातो. हे मंदिर देवीचा मठ म्हणून प्रसिद्ध आहे. माहूरची रेणुका माता आणि कारल्याची हिंगलाज भवानी या एकाच शाखेतील आहेत. हिंगलाज भवानीच्या नवरात्रौत्सवाला अत्यंत महत्व आहे. नवरात्रीच्या काळात हिंगलाज भवानी आपले रूप दिवसातून तीन वेळा बदलते असे महंत मोती पुरी यांनी सांगितले. माहूरची उपशाखा असल्यामुळे पुरातन काळात माहूरचे महंत आपल्या हत्ती, घोडे, पालख्या व इतर मंडळी अशा लवाजम्यासह कारला येथे हिंगलाज भवानीचे पूजन करण्याकरिता येत होते. हि परंपरा अनेक वर्ष चालली आता त्यात



■ **माहूर गडाची उपशाखा म्हणून परिचित**

■ **कारलावासीयांचे कुलदैवत**

खंड पडला आहे. कारला गावाला पुरातन इतिहास आहे पूर्वीच्या काळात कारला गावात गोसावी समाजाची वस्ती होती. त्याअगोदर पासून येथे हिंगलाज भवानीचा मठ आहे. या ठिकाणी गोसावी समाजाने हिंगलाज भवानीची भक्ती केली व नवरात्रौत्सवाची सुरुवात केली. हिंगलाज भवानीच्या मंदिराची गावात दोनशे एकर जमीन होती. गाई, म्हशी व घोडे असा लवाजमा या संस्थानचा होता काही काळानंतर या गावात राजपूत सेनापती प्रतापसिंह सिसोदिया व पुरणसिंह जाधव यांची राजपूत सैन्याची तुकडी येथे स्थायिक झाली. भवानी माता हे राजपूत समाजाचे कुलदैवत त्यामुळे हिंगलाज मातेच्या प्रत्येक उत्सवाला व मंदिराच्या देखभालीकरिता पुरी परिवाराला सहकार्य केले. सिसोदिया घरण्यातील बाजीरावसिंह सिसोदिया हिंगलाज मातेचे परम् भक्त होते त्यांची भक्ति निस्वार्थ होती. देवीची खोळ सुद्धा त्यांच्या अंगावर पडली होती. आज संपूर्ण कारला गावाचे कुलदैवत म्हणून देवी परिचित आहे. या ठिकाणी दूरदुरुण लोक दर्शनाकरीता येतात. या मंदिरात दरवर्षी मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सव साजरा केल्या जातो. यावर्षी घटस्थापनेपासून नवरात्रौत्सवाला प्रारंभ झाला आहे. दररोज सकाळ संध्याकाळ देवीची आरती केल्या जाते. रोज संध्याकाळी गुरुदेव सेवामंडळाच्यावतीने सामुदायिक ध्यान व प्रार्थना केली जाते. नवरात्रोत्सवभर भजन कीर्तन सुरु असल्यामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे. हा उत्सव यशस्वी करण्याकरिता मोती पुरी, रुपेश पुरी, अमोल पुरी, दिनेश पुरी यांच्यासह गावातील युवक परिश्रम घेत आहेत.

## अभिनंदन बँकेचे संचालक मंडळ बिनविरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** सहकार क्षेत्रातील चर्चित आणि पुरस्कृत बँक असलेल्या अभिनंदन अर्बन बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत मोठी घडामोड झाली आहे. १५ सदस्यीय संचालक मंडळाची निवडणूक अखेर बिनविरोध झाली आहे. १७ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतीत १२ जागांसाठी १४ नामांकन दाखल झाले होते. त्यापैकी २ जणांनी आपले अर्ज मागे घेतले. सिद्धार्थ बोथरा आणि सीए निलेशभाई लाठिया यांनी उमेदवारी मागे घेतल्याने आता १२ जागांसाठी तेवढेच उमेदवार शिल्लक राहिल्याने निवडणूक



बिनविरोध झाली आहे. येत्या २६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या आमसभेत संचालक मंडळाची घोषणा करण्यात येणार आहे. बिनविरोध निवडून येणाऱ्यांमध्ये

अध्यक्ष एड. विजय बोथरा, नवीन चोरडिया, सीए. श्रेणिक बोथरा, एड. गौरव लुनावत, मनोहर कांकरिया, भरत प्रकाश खजांची, अभिनंदन बोकरिया, के. एन. जैन, एफ. सी. जैन, एस. एस. डागा यांचा समावेश आहे.महिला राखीव जागांवर सरला भंसाली आणि शशि बोकरिया यांची बिनविरोध निवड झाली आहे. तसेच ओबीसी, एससी- एसटी आणि व्हीजेएनटी या राखीव जागांवर प्रत्येकी एकच अर्ज आल्याने पंकज वासनकर, रमेश गुलारेकर आणि सुनील सरोदे हे देखील बिनविरोध संचालक झाले आहेत.१५ सदस्यीय संचालक मंडळ निवडून आल्यानंतर हेच संचालक अध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड करतात. तत्कालीन अध्यक्ष एड. विजय बोथरा हे सतत पाचव्यांदा अध्यक्ष होण्याची दाट शक्यता आहे. एड. बोथरा यांच्या नेतृत्वाखाली अभिनंदन बँकेने मोठी प्रगती केली असून प्रतिष्ठा मिळवली आहे.

## घरफोडी, दुकानफोडी करणारा संशयित जेरबंद

### ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव रेल्वे शहरात झालेल्या घरफोडी आणि दुकानफोडीच्या घटनांचा तपास करताना अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने एका संशयिताला अटक केली आहे. रोहित चंदू विश्वकर्मा (वय २४, रा. कॉटन मार्केटजवळ, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून दुचाकीसह एकूण ८४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे दत्तापूर पोलिस ठाण्यातील तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

धामणगाव रेल्वे येथील पृथ्वीराज नगर, परसोडी रोड परिसरातील अदनान सैफुदीन वलीजी यांच्या 'ग्लास ॲण्ड ॲल्युमिनीयम वर्क्स' या दुकानात १८ ऑगस्ट २०२५ रोजी चोरी झाली होती. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानातून ३९ हजार ९८८ रुपयांचा माल चोरून नेला होता. याप्रकरणी दत्तापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करीत होते. दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बडनेरा परिसरातून रोहित विश्वकर्मा याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, संबंधित दुकानफोडीच्या गुन्ह्यातील सहभागाबाबत माहिती मिळाली. पुढील चौकशीत त्याने धामणगाव रेल्वे शहरात दोन घरफोड्या आणि एक दुकानफोडी केल्याचे सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. दत्तापूर पोलिस ठाण्यातील अभिलेखांची पडताळणी केल्यानंतर घरफोडीचे दोन आणि दुकानफोडीचा एक, असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले. आरोपीकडून दुचाकीसह ८४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर आरोपी आणि जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी दत्तापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पोलिस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलिस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि वाहनचालक प्रज्वल राऊत यांचा समावेश होता.

## तरुणाला जीवे मारण्याची धमकी

**अमरावती-**जिल्ह्यात मारहाण आणि हल्ल्याच्या तीन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या आहेत. पोलिसांनी तिन्ही प्रकरणात बीएनएस कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. आसेगाव पोलीस ठाणे अंतर्गत विरुळ पूर्णा येथे शनिवारी सायंकाळी ४.४५ वाजता मुकिंद वानखेडे हे आरोपी मोहन बोबडे याच्या कडे मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी मोहन बोबडे याने त्यांना शिवीगाळ करून 'पुन्हा घराकडे आलास तर तुझा मर्डर करून टाकेन' अशी धमकी दिली.इतकेच नाही तर मुकिंद यांचा मुलगा घरी परतत असताना आरोपीने सत्तूर घेऊन त्याचा पाठलाग केला आणि मुलाच्या चेहऱ्यावर वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

## दारू तस्करीसाठी दोन वाहनांचा वापर, १४.३९ लाखांचा मुद्देमाल जप्त

### मध्यप्रदेशातून वर्ध्याकडे जाताना सापळा,दोघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या कारला पुढे दुसऱ्या वाहनातून संरक्षण देण्याचा प्रयत्न सुरू असतानाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोर्शी तालुक्यातील धानोरा टी-पॉइंटवर सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत ४० पेट्या विदेशी दारू, दोन चारचाकी वाहने आणि तीन मोबाईल असा एकूण १४ लाख ३९ हजार ५५४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, अन्य दोन आरोपी फरार आहेत.'ऑपरेशन कवच'अंतर्गत अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई सुरू असताना १८ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक आकाश शिवणकर यांच्या पथकाला विदेशी दारूच्या वाहतुकीबाबत गोपनीय माहिती मिळाली. मध्यप्रदेशातील आठनेर परिसरातून सालबर्डी, पाळा आणि मोर्शी मार्गे दारू वर्धा जिल्ह्यात नेली जाणार असल्याची माहिती होती.त्यानुसार पाळा-मोर्शी मार्गावरील धानोरा टी-पॉइंट येथे पोलिसांनी पाळत ठेवली. रात्रीच्या सुमारास ग्रे रंगाची सुझुकी सियाझ कार येताना दिसली. तिच्या पुढे पांढरी बोलेरो गाडी होती. पोलिसांनी वाहनांना थांबण्याचा इशारा दिल्यानंतर बोलेरोचा चालक वाहन सोडून पळून गेला. सियाझ कारमधील दोघांना मात्र पकडण्यात आले. इमरान शेख अब्दुल सत्तार (वय ३५) आणि फैजान खान जफर खान (वय २०), दोघेही महादेवपुरा, वर्धा येथील रहिवासी, अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. कारच्या झडतीत विविध कंपन्यांच्या ८०३ विदेशी दारूच्या बाटल्या आढळल्या. त्यांची किंमत २ लाख २९ हजार ५५४ रुपये आहे. अटक आरोपींच्या माहितीनुसार, फरार व्यक्तींनी महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर दारू आणून दिली होती. हा साठा वर्धा जिल्ह्यात विक्रीसाठी नेला जात असल्याचे त्यांनी सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. मोर्शी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यासह संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## डॉक्टरांच्या घरातून सव्वाआठ लाखांचा ऐवज लंपास

### व्यंकटेश कॉलनीत घरफोडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी डॉक्टरांच्या निवासस्थानाला लक्ष्य केले. बेडरूममधील लोखंडी कपाटातून रोकड, सोन्याचे दागिने आणि महागडी घड्याळे असा एकूण ८ लाख ७८ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. शंकरनगर परिसरातील व्यंकटेश कॉलनीत ही घटना उघडकीस आली असून, राजापेठ पोलिसांनी दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. डॉ. रविराज साधुप्रसाद पांडे (वय ३८, रा. व्यंकटेश कॉलनी) हे बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. १८ ऑक्टोबर रोजी पहाटे ४.४१ वाजण्यापूर्वी ही चोरी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटातून मौल्यवान वस्तू काढून चोरटे पसार झाले. चोरीला गेलेल्या ऐवजात २ लाख ५८ हजार रुपयांची रोकड, प्रत्येकी सुमारे सात ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या पाच



अंगठ्या, ५२ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, २३ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आणि टायटन कंपनीची १२ घड्याळे यांचा समावेश आहे. या सर्व वस्तूंची किंमत अंदाजे ८ लाख ७८ हजार रुपये असल्याचे पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, चोरीत दोन अज्ञात व्यक्तींचा सहभाग असल्याचा संशय आहे. त्यांची ओळख पटविणे आणि चोरीचा मुद्देमाल हस्तगत करणे, हे पोलिसांसमोरील आव्हान आहे.

पान १ व १० वरून

### आरोपींचे आका कुठेही लपलेले

हात असल्याच्या चर्चेवरही फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली. कोणतीही गँग असो किंवा व्यक्ती, कोणालाही सोडले जाणार नाही. धमक्या देऊन जर कोणी असे काम करत असेल, तर त्यांना कसे सरळ करायचे हे मुंबई पोलिसांना चांगलेच माहिती आहे.

### निधीची कमतरता; महिलांच्या

कारणास्तव १६ ऑक्टोबरपासून बंद करण्यात आली आहे. तसेच, जिल्हा परिषदांमार्फत महिला मंडळांना अनुदान देण्याची योजना, करोनामुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी आर्थिक मदत, निवारागृह चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना सा आणि देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी सा करणारी योजना, या दोन्ही योजनांना कडून निधीची कोणतीही मागणी किंवा पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**अंगणवाडी केंद्रांसाठी सौरऊर्जा संच योजना बंद-** याशिवाय, वीज नसलेल्या अंगणवाडी केंद्रांसाठी सौरऊर्जा संच पुरवण्याची योजना देखील बंद केली आहे. ज्या अंगणवाड्यांमध्ये वीजजोडणी उपलब्ध आहे, तिथे वीजखर्चासाठी केंद्र सरकारकडून दरमहा ५०० रुपयांची तरतूद असल्याचे कारण यासाठी देण्यात आले आहे. मात्र, कागदोपत्री अनुदानाची तरतूद असणे आणि प्रत्यक्षात प्रत्येक अंगणवाडीत वीज उपलब्ध असणे या दोन भिन्न गोष्टी असल्यामुळे, वीजजोडणी नसलेल्या अंगणवाड्यांसमोर निर्माण होणा-या परिस्थितीबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत.

**'माझी कन्या भाग्यश्री'योजना गुंडाळणार-** दुसरीकडे, 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेच्या बाबतीत सुधारित स्वरूपात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ही जुनी योजना आधीच बंद करून १ एप्रिल २०२३ पासून तिच्या बदलात 'लेक लाडकी' योजना अमलात आणण्यात आली आहे. आता या जुन्या योजनेचे स्वतंत्र अर्थसंकल्पीय लेखाशीर्ष पूर्णपणे बंद करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. असे असले तरी, ३१ मार्च २०२३ पर्यंत ज्या लाभार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले होते, त्यांची सर्व प्रलंबित देयके मार्च २०२७ अखेरपर्यंत अदा करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानंतर आर्थिक वर्ष २०२७-२८ पासून या जुन्या योजनेचे लेखाशीर्ष कायमचे रद्द केले जाणार आहे.

### राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्या!

प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात अंतर्गत गँगवॉर सुरू असल्याचा आरोप करत सरकारला कायदा आणि सुव्यवस्थेचे गांभीर्य नसल्याचे ते म्हणाले.राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत सपकाळ यांनी सरकारच्या कारभारावर टीका केली. टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या घटनेमुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, अशा घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी सपकाळ यांनी केली. महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, सपकाळ यांच्या आरोपांवर राज्य सरकारकडून काय प्रतिक्रिया दिली जाते, तसेच टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या प्रकरणात पुढे काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

### टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात

राबवली. कोटा पोलिसांच्या वेगवान कारवाईमुळे तिन्ही आरोपींना पकडण्यात यश आलं आहे. या आरोपींना आम्ही लवकरच मुंबई पोलिसांच्या ताब्यात देणार आहोत.'

'आरोपींकडे कोणत्याही प्रकारचं शस्त्र सापडलेलं नाही. त्यांनी त्यांच्याकडील शस्त्रांचं काय केलं? याची तपासणी केली जाणार आहे. तसंच, हे आरोपी दिल्ला जाऊन तेथून नेपाळला जाण्याच्या तयारीत होते', अशीही माहिती पोलिसांनी दिली. यावेळी पोलिसांनी या तिन्ही आरोपींची नावेही जाहीर केली. यापैकी एक आरोपी अल्पवयीन आहे. दुसऱ्या आरोपीचं नाव ऋतिक कुमार उर्फ रोशन असून तो २२ वर्षांचा आहे. तो मुळचा बिहारमधील बेगुसराय येथील असून सध्या मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील उर्दू शाळेजवळील दिल बर्ली परिसरात राहतो. तो रॅपिडो चालक म्हणून काम करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तर, तिसऱ्याचं नाव रेहान असून ते १८ वर्षांचा आहे. हरियाणातील सोनीपत जिल्ह्यातील तो रहिवासी असल्याचं पोलिसांनी सांगितलं. रेहान हा बिश्नोई गँगशी संबंधित असलेल्या अनिल पंडितच्या संपर्कात होता.

### आजितेंद्र आव्हाडांना

भ्रमणध्वनीवर अर्वाच्च भाषेत बोलून मारण्याची धमकी दिली. या धक्कादायक प्रकारानंतर आव्हाड यांचे कार्यकर्ते हेमंत वाणी यांनी संबंधित मोबाईल नंबरवर कॉल केला असता, त्या व्यक्तीने त्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. आधी जित्याला गोळ्या घालेन, नंतर तुला पण गोळ्या घालेन, घरच्या बाहेर येऊन गेलो, असे त्या व्यक्तीने वाणी यांना सांगितले. या अत्यंत गंभीर प्रकारानंतर हेमंत वाणी यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत याप्रकरणी रीतसर तक्रार दाखल केली आहे.

### विधान परिषदेच्या ५ पदवीधर

मतदारसंघांमध्ये एकूण १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद आहे. यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत.

मतदानासाठी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सर्व मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

६ डिसेंबरला विद्यमान सदस्यांची मुदत संपणार

विधान परिषदेच्या ज्या पाच जागांसाठी ही निवडणूक होत आहे, त्या जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी पूर्ण होत आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर यांचा समावेश आहे.

### पाच हजारांच्या मदतीविरोधात

असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

या आंदोलनात काँग्रेसचे दर्यापूर तालुकाध्यक्ष सुनिल पाटील गावंडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे दर्यापूर तालुकाध्यक्ष डॉ. अभय पाटील गावंडे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे दर्यापूर तालुका सचिव कॉ. अनिकेत वाकपांजर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवा सेना जिल्हाध्यक्ष अंकुश पाटील कवडकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल जळमकर, काँग्रेसचे सरचिटणीस नितेश वानखडे, वंचित बहुजन आघाडीचे दर्यापूर तालुकाध्यक्ष चंदुभाऊ रायबोले, बबनराव विल्हेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष गुड्डू पटेल, काँग्रेसचे जिल्हा सचिव अतिश शिरभाते, कॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, भारत आठवले, दिपक बागडे, सागर गिऱ्हे, राजेंद्र पाटील वडाळ, पार्थ लोढम, कॉ. अशोक पाटील कोकाटे, विजय चौरपगार, प्रशांत गावंडे, आसिफ भाई, बाबुलाल राऊत, अमित होले, राजाभाऊ तराळ, भूषण जंगले, अजय देशमुख, नितीन गाडे, रसूल शाह, शेतकरी संघटनेचे सुनिल पाटील साबळे, विष्णुभाऊ काळमेघ, सुधिर पवित्रकर, गणेश अरबट, संजय हाडोळे, बबनराव देशमुख, जगदीश कांबळे, सचिन साळवे, संजय पांचबुडे, सुधिर लोढम, गुड्डू लोढम आणि नमित हुतके यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले.

### अमरावती बाजार समिती संचालक

अ. गुडधे यांची एपीएमसीच्या नवीन प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आता नवीन समिती येईपर्यंत बाजार समितीचा सर्व कारभार त्या पाहणार आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १७ सदस्यीय मंडळासाठी २८ एप्रिल २०२३ रोजी निवडणूक झाली होती. मत मोजणीनंतर २९ मे २०२३ रोजी निकाल जाहीर झाले. काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनलने बाजी मारली होती. या पॅनलचे हरीश मोरे सभापती तर भैय्यासाहेब निर्मळ उपसभापती म्हणून निवडून आले होते. या संचालक मंडळाचा पाच वर्षांचा कार्यकाळ १८ मे २०२८ पर्यंत निश्चित होता, मात्र चौकशी आणि कायदेशीर प्रक्रियेनंतर तो मुदतीपूर्वीच बरखास्त करण्यात आला. बाजार समितीच्या कामकाजात अनियमितता आणि गैर व्यवहाराच्या तक्रारी आल्या होत्या. विद्युत कामे आणि स्वच्छतेच्या कंत्राट देयकांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा उपनिबंधकांनी २१ एप्रिल २०२५ रोजी संबंधित संचालकांना कलम ४५ (१) अंतर्गत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. न्या. अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने म्हटले की, याचिकाकर्त्यांनी कारणे दाखवा नोटीसीला उत्तर न देता थेट न्यायालयात धाव घेतली आहे. अशा परिस्थितीत या स्तरावर हस्तक्षेप करण्याचा आधार बनत नाही. मात्र, याचिका फेटाळणे म्हणजे अनियमिततेच्या आरोपांवर अंतिम न्यायालयीन निर्णय नाही, असेही स्पष्ट करण्यात आले.हायकोर्टातून धक्का बसल्या नंतरच ही बरखास्तीची कारवाई करण्यात आली असून या कारवाईमुळे सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

### साई मंदिर ट्रस्टचे सदस्य

नातेवाईक, मित्रपरिवार आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्याचे कामगार मंत्रीआकाश फुंडकर यांनी ही उपस्थित राहून दिवंगत राजेंद्र खंडेलवाल यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रकरणी दीपक खंडेलवाल यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. राजेंद्र खंडेलवाल यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### दुष्काळाच्या छायेतही विजयादशमीचा

नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करीत असले, तरी सण-उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. विजयादशमी हा मांगल्याचा आणि विजयाचा सण असल्याने नागरिक साधेपणाने का होईना, पण पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा करण्यास प्राधान्य देत आहेत. झेंडूच्या फुलांच्या विक्रीतून खर्च वजा जाता मिळणाऱ्या नफ्याच्या आधारावर व्यवसाय सुरू असल्याचे फुलविक्रेत्यांनी सांगितले. सणाच्या निमित्ताने बाजारपेठेत वाढलेली वर्दळ आणि फुलांची रंगत यामुळे दर्यापूर शहरात विजयादशमीच्या उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. दुष्काळाचे सावट असले, तरी संस्कृतीची परंपरा कायम असल्याचे दिसत आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## ‘मत वाचवा, देश वाचवा’चा नारा देत काँग्रेसची वाशिममध्ये भव्य मोटारसायकल रॅली

■ प्रतिनिधी | वाशिम ■

‘मत वाचवा, देश वाचवा’ आणि ‘संविधान वाचवा, लोकशाही वाचवा’ या घोषणांसह वाशिम तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) शहरात भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या देशव्यापी जनआंदोलनाचा भाग म्हणून आयोजित या रॅलीच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका करीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात निषेध नोंदविण्यात आला.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीला सुरुवात करण्यात आली. वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. दिलीपराव सरनाईक, वाशिम शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सागर गोरे आणि तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन गोटे यांच्या उपस्थितीत ही रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान ‘राहुल गांधी जिंदाबाद’, ‘मत वाचवा, देश वाचवा’ आणि ‘ज्ञानेश कुमार हटाव, देश बचाव’ अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित मनमानी कारभारामुळे देशातील निवडणुका स्वतंत्र व निष्पक्षपणे पार पाडण्याबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाच्या प्रभावाखाली काम करीत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.या मागण्यांसंदर्भातील निवेदन सर्व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह उपविभागीय अधिकारी, वाशिम यांना सादर करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२६ अन्वये नागरिकांना प्राप्त असलेल्या मतदानाच्या अधिकाराचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या रॅलीत मधुकर जुमडे, परसराम भोयर, महादेव सोळंके, ॲड. पी. पी. अंभोरे, राजू जानीवाले, मनीष भालेराव, संजयराव देशमुख, मीनाताई वाठोरे, जावेद शेख, अमोल शिंदे, संतोष तात्या गावंडे, गजानन भालेराव, भीमराव गंगावणे, उज्ज्वल देशमुख, सुरेश रत्नपारखी, यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन उज्ज्वल देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेश रत्नपारखी यांनी केले.

## लोकशाहीच्या रक्षणासाठी मानोरा येथे काँग्रेसची भव्य निषेध रॅली !

### तहसीलदार मार्फत महामहीम राष्ट्रपती यांना निवेदन!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि काँग्रेसचे युवा नेते, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या संघर्षाला पाठिंबा देण्यासाठी तसेच एस आर आर प्रक्रिया पारदर्शक राबवून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांचा राजीनामा घेऊन कार्यवाही करण्यासंदर्भात मानोरा तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता पंचायत समिती येथील स्वातंत्र्य स्तंभापासून तहसील कार्यालय पर्यंत केंद्र सरकारच्या विरोधात नारेबाजी करून भव्य निषेध रॅली काढण्यात आली.



मानोरा तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार व वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार मार्फत महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनानुसार मागील काही दिवसापासून देशभर एस आर आर च्या नावाखाली पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र इत्यादी राज्यात पात्र मतदारांची करोडो नावे मतदार यादीतून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना हाताशी धरून भाजप सरकारने मतदारांच्या अधिकारावर तथा लोकशाहीवर घाला घातलेला असुन जाचक अटी लावून मतदारांच्या अधिकारावर गदा आणलेली आहे. त्यामुळे पात्र मतदारांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करून मुख्य निवडणूक आयुक्त यांची निष्पक्षपणे चौकशी करण्यात यावी व राजीनामा घेऊन तात्काळ अटक करावी आणि एस आय आर प्रक्रिया पारदर्शक करून मतदारांना न्याय द्यावा, तसेच तक्रारीचे वेळेत निराकरण करून लोकशाही मजबूत करावी यासह विविध मागण्याचे निवेदन पाठविले आहे.

निवेदनावर काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष रामनाथ राठोड, जिल्हा उपाध्यक्ष संजय भानावत, इफ्तेखार पटेल, काँग्रेसचे पदाधिकारी मोहम्मद हुसेन युसुफ शेख, शेख नजीर, अलताब बेग, गोलू वाळले, रोशन राठोड, जय चव्हाण, डॉ निरंजन खुपसे, अभिषेक चव्हाण, रंगराव जाधव, गोपाल चव्हाण, अब्बास खान आदीसह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कृषी विज्ञान केंद्र, वाशिम द्वारे जागतिक अन्न दिन उत्साहात साजरा

**‘आज नावीन्य, उद्या पोषण’ – अन्न सुरक्षा, पोषण आणि शाश्वत अन्नप्रणालीवर भर**



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने जागतिक अन्न दिनानिमित्त विधाता सभागृह, वाशिम येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात गृहविज्ञान विभागप्रमुख शुभांगी वाटाणे यांनी जागतिक अन्न दिन २०२६ ची संकल्पना ‘Innovate Today. Nourish Tomorrow.’ या विषयावर तांत्रिक मार्गदर्शन केले.

यावेळी अन्न सुरक्षा, पोषणमूल्यांचे जतन, संतुलित आहार, अन्नाची नासाडी रोखणे आणि शाश्वत अन्नप्रणाली विकसित करण्यासाठी आधुनिक अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे महत्त्व विशद करण्यात आले. दैनंदिन आहारात तृणधान्ये, कडधान्ये, हंगामी फळे, पालेभाज्या व स्थानिक पौष्टिक अन्नपदार्थांचा समावेश केल्यास पोषण गुणवत्ता सुधारण्यास मदत होते, असे शुभांगी वाटाणे यांनी सांगितले. स्थानिक कृषी उत्पादनांवर आधारित अन्नप्रक्रिया, मूल्यवर्धन, सुरक्षित पॅकेजिंग आणि वैज्ञानिक साठवणूक तंत्रज्ञानामुळे शेतमालाची टिकवणक्षमता व आर्थिक मूल्य वाढविता येते. तसेच महिला बचत गट, ग्रामीण महिला आणि युवकांसाठी कृषीपूरक उद्योग व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

## मालेगाव जहांगिरची वाढीव पाणीपुरवठा योजना रखडली; ठेकेदाराच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मालेगाव जहांगिर शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम अर्धवट अवस्थेत बंद असल्याचा आरोप करत, संबंधित ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करून रखडलेले काम तातडीने सुरू करण्याची मागणी भाजप पदाधिकारी व नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात नगरपंचायत मालेगाव जहांगिरच्या मुख्याधिकाऱ्यांना तक्रार निवेदन सादर करण्यात आला यावेळी भाजप युवा मोर्चाचे वाशिम जिल्हा उपाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नागेश बळी यांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला. तक्रार प्राप्त झाल्यानंतरही प्रशासनाने संबंधित मुद्द्यांवर कठोर कारवाई करून कामाला गती दिली नाही, तर नगरपंचायत कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.



### नागेश बळी यांचा आंदोलनाचा इशारा

तसेच आमरण उपोषणही करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी नगरपंचायत प्रशासन, संबंधित ठेकेदार आणि जिल्हा प्रशासनाची राहील, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले या वेळी भाजप शहराध्यक्ष किशोर महाकाळ, नागेश बळी, सभापती संजय बळी, नगरसेवक विनोद बाणाईतकर, नगरसेवक ज्ञानेश्वर काटेकर, तालुका सचिव संतोष तिखे, माजी शहराध्यक्ष माधव बळी, आशिष बळी, किशोर शिंदे, तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष वसीम खान, श्याम बळी, सुरज वडतकर, संतोष घुगे, पप्पू कुटे, शंकर बळी, दशरथ गिरे, तुषार मांडे, किशोर बळी, अमोल अंभोरे, पराग पिंपरकर, डॉ. सुभाष सानप आणि मोहन वानखेडे यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. आता या तक्रारीवर नगरपंचायत प्रशासन काय भूमिका घेते आणि रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रत्यक्षात कधी सुरू होते, याकडे मालेगाव जहांगिरच्या नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलजीवन मिशनच्या कामांची जिल्हाधिकारी यांच्याकडून पाहणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, यासाठी पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती तपासून आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या वाशिम तालुक्यातील तामसी व मालेगाव तालुक्यातील पांगरी कुटे आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागा अंतर्गत येणाऱ्या रेगाव व मुंगळा येथे जलजीवन मिशनच्या रेट्रोफीटींगच्या कामांची पाहणी



करून योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश कान्हेरकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता नितीन उपरेलू,वाशिम तहसीलदार निलेश पळसकर, मालेगाव गटविकास अधिकारी निकेश पाटील, नायब तहसीलदार रंजना गोरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले, पाणीटंचाईचा विचार करून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सुरू असलेल्या योजनांची स्थिती आणि त्यांच्या कार्यक्षमतेची पडताळणी करणे आवश्यक आहे.

## मुलाच्या जीवाला धोका !

### वडिलांची जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरा तालुक्यातील वापटा येथील एका ६० वर्षीय मजूर व्यक्तीने आपल्या मुलाचा शोध घेण्यासाठी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम यांच्याकडे स्पीड पोस्टद्वारे धाव घेतली आहे. सुनेने जुलै २०२६ मध्ये माहेरी घेऊन गेलेल्या मुलाचा आजपर्यंत ठावठिकाणा लागत नसून, त्याच्या जीवाला धोका असल्याची भीती वडिलांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे मानोरा पोलीस ठाण्यात दि. २४ सप्टेंबर रोजी दिलेली तक्रार पोलिसांनी स्वीकारलीच नसल्याचा गंभीर आरोपही या निवेदनात करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मी वापटा येथील रहिवासी असुन शामराव मंगु राठोड, वय - ६०, असे माझे नाव आहे. गैर अर्जदार सुन सुनिता रामेश्वर राठोड, वय - ३०, व्यवसाय - मजुरी, ह.मु. खेड (बीड), ता. आर्णी, जि. यवतमाळ ही माझी सून आहे. आज रोजी ती तिच्या वडिलांकडे खेड (बीड) येथे राहत आहे. गै.अ. ही माझ्या मुलाला जुलै २०२६ मध्ये वापटा येथून माहेरी घेऊन गेली तेव्हापासून तो गै.अ. यांच्या सोबतच राहत असून आमचा त्याच्याशी कोणताही संपर्क झाला नाही. परंतु सप्टेंबर २०२६ ला गै.अ. यांच्याकडे माझ्या मुलाची विचारणा केली असता त्याने कुठे आहे हे आजपर्यंत सांगितले नाही. उलट तुमच्याकडे आला आहे सांगून आमच्यावर खोटे आरोप लावत आहे. मुलाला गै.अ. यांच्यापासून त्याच्या जीवाला धोका आहे त्यामुळे बेपत्ता मुलाची लवकरात लवकर चौकशी घ्यावी म्हणून दि. २४ सप्टेंबर रोजी पोस्ट मानोरा येथे तक्रार दिली परंतु त्यांनी स्वीकारली नाही. त्यामुळे मी स्पीड पोस्टद्वारे पाठविली परंतु आजपर्यंत कोणतीही चौकशी झालेली नाही. तरी सदर चौकशी लवकरात लवकर करण्यात येऊन माझ्या मुलाचा शोध घेण्यात यावा असे विनवणी केली आहे.

जुलै २०२६ पासून म्हणजे गेल्या ३ महिन्यांपासून मुलगा कुठे आहे हेच वडीलाकडील कुटुंबाला माहीत नाही. सुनेच्या ताब्यात असूनही वडिलांच्या कुटुंबाला संपर्क नाकारला जात आहे.

वडिलांनी थेट ’माझ्या मुलाला गै.अ. यांच्यापासून जीवाला धोका आहे’ असा गंभीर आरोप केला आहे. यामुळे हे प्रकरण केवळ कौटुंबिक वाद न राहता मुलाच्या सुरक्षिततेचा मुद्दा बनला आहे.

वडिलांनी २४ सप्टेंबरला मानोरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता ती स्वीकारलीच गेली नाही. त्यामुळे नाईलाजाने ६० वर्षीय मजूर वाशिम एस पी कार्यालयात स्पीड पोस्टने तक्रार पाठवावी लागली. तरीही ३ ऑक्टोबरनंतरही चौकशी झाली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. हे प्रकरण वाशिम जिल्ह्यातील वापटा आणि यवतमाळ जिल्ह्यातील खेड (बीड), ता. आर्णी या जिल्ह्यांना जोडणारे असल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावरून समन्वयाची गरज आहे.

## कोट्यावधी रुपयाच्या पाणीपुरवठा योजने चे पाणी मुरतंय कुठे?

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जवळपास सर्वच पक्षाच्या नेत्यांनी तसेच पक्षांनी कोट्यावधी रुपयाची पाईपलाईन आम्ही मंजूर करून आणली असे घोषणा करून शहरातील ठिकाणी बॅनर सुद्धा लावलेले होते मात्र अजूनही ती पूर्णत्वास पिण्याचे चिन्ह दिसत नाहीत त्यामुळे त्या पाणीपुरवठा चे योजनेचे पाणी मुरतंय कुठे असा प्रश्न जनसामान्य नागरिकांमध्ये उपस्थित केल्या जात आहे.

काही महिन्यांपूर्वी मालेगाव शहरातील पाणीपुरवठा योजना सुरू झाल्याच्या गोष्टी कानावर पडत होत्या अनेक नेत्यांनी पाईपलाईन सुरू असल्याचे फोटो सुद्धा टाकले होते अनेक नेत्यांनी स्वतः पाहणी सुद्धा केली होती.

**तात्पुरती पाणीपुरवठा योजना सुरू करा....**

मालेगाव शहरात कुरळा धरणावरून पाणीपुरवठा होतो. त्या धरणात पाणीच नाही म्हणून चाका तीर्थावरून कुरळा धरणात पाणी आणणे आणि चाका तीर्थ वरुन मालेगाव शहरात पाणी आणणे किमान असे जरी केले तरी पाणीटंचाई ची तीव्रता कमी केल्या जाऊ शकते.

मात्र मालेगाव शहरात पाणी तर आलेच नाहीत परंतु पाईपलाईन सुद्धा अर्धवट झाल्याची माहिती आहे त्या पाणीपुरवठा योजनेचे पाणी मुरतेय कुठे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मागील वर्षी पाणी पडू न सुद्धा तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती . यावर्षी तर पावसाळा झाला नाही त्यामुळे भयंकर पाणीटंचाई निर्माण होण्याची चिन्हे शहरात दिसत आहे आतापासूनच अनेक लोकांच्या बोर आटल्या असून त्यांना टँकरचा सहारा घ्यावा लागत आहे अजून पाणी पडेपर्यंत आठ ते नऊ महिने वेळ वेळ असून लोकांना पाणी मिळेल कसे नगरपंचायत याबाबतीत पाणीपुरवठा करेल कसा हा प्रश्न सर्वत्र भेडसावत आहे कोट्यावधी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेच्या घोषणा लोकांनी ऐकल्या परंतु सध्या सुद्धा थेंब मालेगाव शहरात आला नाही त्याचे नियोजन कुठेही होताना दिसत नाहीत याबाबत जबाबदार अधिकारी तसेच जबाबदार नगरसेवक काहीही बोलताना दिसत नाहीत. या साठी सर्व पक्ष सर्व नगरसेवक सुजाण नागरिक यांनी एकत्र येऊन नियोजन करणे आवश्यक आहे.

## एसओएसच्या शालेय स्पर्धेत रेयांश खिरेकर प्रथम

**अकोला :** नवरात्री उत्सवानिमित्त कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स मध्ये आयोजित शालेय चित्रकला स्पर्धेत या शाळेच्या रेयांश आकाश खिरेकर याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत रेयांशने पर्यावरणपूरक संदेश देणारा विषय सुरेखपणे चितारुन पाण्याचे संवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण रक्षणाचे आकर्षक सादरीकरणातून केले.


**कार्यालय नगर परिषद**
**खामगांव जिल्हा बुलडाणा**
**निविदा सुचना**

नरवि १३०४/२०२६ दिनांक १६/१०/२०२६

नगरपरिषद खामगांव अंतर्गत खालील नमुद कामासाठी शासनाच्या सार्व. बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा ऑनलाईन प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहे.

1. 2026_DMA_1345433_1,
2. 2026_DMA_1345445_1,
3. 2026_DMA_1345462_1,

शर्ती व अटी, दुरस्ती व इतर तपशील http:www/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इतर शर्ती व अटी नगरपरिषदेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**मुख्याधिकारी**
नगर परिषद, खामगांव


## आ. सईताई डहाके यांच्या पत्राने शिक्षण विभागात खळबळ

### १३ ऑक्टोबरच्या अल्टिमेटमनंतर शिक्षक समायोजन पूर्ण; आता पदोन्नतीतील अनियमिततेच्या चौकशीकडे लक्ष

■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा परिषद वाशिमच्या शिक्षण विभागातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न आमदार सईताई प्रकाश डहाके यांच्या ठाम भूमिकेमुळे मार्गी लागला असून, आता पदोन्नतीतील कथित अनियमितता आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीच्या चौकशीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. १३ ऑक्टोबरपर्यंत समायोजन प्रक्रिया पूर्ण करण्याचा अल्टिमेटम दिल्यानंतर प्रशासनाने निर्धारित मुदतीत प्रक्रिया पूर्ण केल्याने शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार सईताईंच्या पत्रव्यवहाराची आणि पाठपुराव्याची जिल्ह्याच्या शैक्षणिक वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

**समायोजन पूर्ण; शिक्षकांना दिलासा!**

जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेत अनियमितता, प्रशासकीय निर्णयांमधील त्रुटी आणि शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाच्या मुद्द्यांवर आमदार सईताई डहाके यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. यासंदर्भात त्यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्राद्वारे जाब विचारत समायोजन प्रक्रिया १३ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याची मागणी केली होती. या मुदतीनंतर समायोजन प्रक्रिया पूर्ण झाल्याने संबंधित शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी ठाम भूमिका घेतल्यास प्रशासनाला कार्यवाही करावी लागते, याची प्रचिती या घडामोडीतून आल्याची चर्चा शिक्षकांमध्ये आहे.



**आता पदोन्नतीतील कथित अनियमिततेची चौकशी कधी?**

समायोजनाचा प्रश्न निकाली निघाल्यानंतर आता शिक्षण विभागातील पदोन्नती प्रक्रियेतील कथित अनियमिततेचा मुद्दा महत्त्वाचा ठरत आहे. पदोन्नतीसंदर्भातील प्रशासकीय निर्णय, प्रक्रियेतील त्रुटी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी आमदार सईताई डहाके यांनी केली आहे. त्यामुळे आता या प्रकरणात वरिष्ठ प्रशासकीय स्तरावर कोणती भूमिका घेतली जाते, चौकशीचे आदेश दिले जातात का आणि अनियमितता आढळल्यास जबाबदारी निश्चित केली जाते का, याकडे जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

**गजानन डाबेराव यांच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न**

शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी गजानन डाबेराव यांच्या प्रशासकीय कार्यपद्धतीबाबतही आमदार सईताई यांनी पत्रातून प्रश्न उपस्थित केल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, तसेच नियमबाह्य बाबी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची बाजू आणि चौकशीचे अधिकृत निष्कर्ष समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**शिक्षकांचे लक्ष आता विभागीय आयुक्तांच्या निर्णयाकडे!**

समायोजनाचा प्रश्न निर्धारित मुदतीत मार्गी लागल्यानंतर पदोन्नतीतील कथित अनियमिततेच्या प्रकरणातही ठोस कार्यवाही होईल, अशी अपेक्षा शिक्षकवर्गातून व्यक्त होत आहे. आमदार सईताई डहाके यांच्या पुढील पाठपुराव्यामुळे या प्रकरणाला गती मिळते का, तसेच वरिष्ठ प्रशासनाकडून चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याबाबत कोणता निर्णय घेतला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२३ ■ मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.००रु


# नऊ दिवसांचा भक्तिरस ओसरला देवीला निरोप देताना भाविक भावुक

## 'जय अंबे, जय दुर्गे'च्या गजरात दुर्गामातेची विदाई, गजबजलेले चौक शांत, रस्त्यांवर शुकशुकाट





**वर्धा जनमाध्यम :** नऊ दिवस भक्ती, शक्ती आणि उत्साहाने भारलेले वातावरण. चौकाचौकांत देवीचा जयघोष, रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी लागलेल्या रांगा आणि भाविकांच्या गर्दीने फुललेले रस्ते. मात्र, नवरात्रोत्सवाच्या सांगतेनंतर सोमवारी दुर्गामातेच्या मूर्तीला निरोप देण्यात आला. 'जय अंबे, जय दुर्गे'च्या गजरात देवीची विदाई करताना भक्तांच्या मनात भक्तिभावाबरोबरच पुढील वर्षी लवकर येण्याची आर्त विनवणी दाटून आली.

शहरात नऊ दिवसांचा नवरात्रोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. पंचमीपासून रविवारपर्यंत दुर्गादेवीच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. अनेक ठिकाणी मध्यरात्री दोन ते तीन वाजेपर्यंत दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. देवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक, जयघोषाने दुमदुमणारे परिसर आणि उत्सवाच्या उत्साहाने उजळलेले चौक, असे चित्र शहरात पाहायला मिळाले.

### लंगरमधून सेवाभावाचा जागर

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने बजाज चौक ते शिवाजी चौकादरम्यान विविध चौकांत लंगरचे स्टॉल उभारण्यात आले होते. भाविकांना प्रसाद आणि खाद्यपदार्थांचे वितरण करण्यात येत होते. भक्तीबरोबरच सेवाभावाची परंपराही या माध्यमातून जपली गेली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या उत्सवी वातावरणामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर चैतन्य निर्माण झाले होते.

### उत्सव संपला, आठवणी मात्र कायम

नवमीच्या उत्साहानंतर देवीला निरोप देण्यात आला आणि नवरात्रोत्सवाची सांगता झाली. ज्या रस्त्यांवर काही दिवसांपूर्वी भाविकांची गर्दी उसळत होती, तेच रस्ते सोमवारी शांत दिसत होते. चौकांतील गजबज ओसरली, दर्शनासाठी लागणाऱ्या रांगा संपल्या आणि शहरात शुकशुकाट जाणवू लागला.

उत्सवाच्या नऊ दिवसांत अनुभवलेला भक्तिभाव, देवीच्या दर्शनासाठी केलेली प्रतीक्षा आणि 'जय माता दी'च्या जयघोषाने भारलेले क्षण भाविकांच्या मनात मात्र कायम राहणार आहेत. देवीला निरोप देताना प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती, 'आई, पुढच्या वर्षी लवकर ये!'

### नवरात्रोत्सवावर अपघातांचे सावट; दोन दुर्घटनांत ११ जणांचा मृत्यू

नवरात्रोत्सव सुरू होण्यापूर्वीच दुर्गामातेची मूर्ती आणताना समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेने संपूर्ण वर्धा जिल्हा हादरला होता. या घटनेची वेदना ताजी असतानाच शनिवारी देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या आष्टी तालुक्यातील ३ युवकांचा रस्ते अपघातात जागीच मृत्यू झाला. या दोन भीषण दुर्घटनांमुळे जिल्ह्यावर शोककळा पसरली.

एकीकडे नऊ दिवस भक्तिभावात नवरात्रोत्सव साजरा होत असताना दुसरीकडे या अपघातांमुळे अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. देवीच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंतचा उत्सवी काळ दोन भीषण दुर्घटनांच्या कटू आठवणींनी व्यथित करणारा ठरला. उत्सवाचा आनंद आणि अपघातांतील जीवितहानीचे दुःख, अशा संमिश्र भावनांच्या वातावरणात यंदाच्या नवरात्रोत्सवाची सांगता झाली.

भक्तीच्या उत्साहाला अपघातांच्या दुःखाची किनार लाभल्याने यंदाचा नवरात्रोत्सव वर्धा जिल्ह्यासाठी आनंदासोबत वेदनादायी आठवणीही मागे ठेवून गेला.

# पाचशे मीटर लोटांगण, ४६ भाविकांची श्रद्धा

## दोनशे वर्षांची परंपरा आजही कायम

## मातामायच्या जयघोषाने तेलीपुरा दुमदुमला, दर्शनासाठी हजारोंची गर्दी



**आष्टी शहीद जनमाध्यम :** कुणाच्या ओठांवर देवीचा जयघोष, कुणाच्या मुखातून भजनाचे सूर, तर कुणाच्या मनात मनोकामना पूर्ण होण्याची आस! अशा भक्तिमय वातावरणात आष्टी शहरातील तेलीपुरा येथे मातामाय दुर्गोत्सवाचा लोटांगण सोहळा उत्साहात पार पडला. तब्बल ४६ भाविकांनी सुमारे पाचशे मीटर अंतर लोटांगण घालत मातामाय देवीच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. हा अनोखा भक्तिसोहळा अनुभवण्यासाठी हजारोंच्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. दोनशे वर्षांपासून जपली जाणारी धार्मिक परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने सुरू असल्याचे चित्र यानिमित्ताने पाहायला मिळाले.

१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता नवयुवक मातामाय दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तेलीपुरा येथे दुर्गादेवीची स्थापना करण्याची सुमारे दोनशे वर्षांची परंपरा आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीची पूजा-अर्चा, भजन-कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो. यंदाही उत्सवात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

ह.भ.प. प्रमोद सातपुते महाराज ऊर्फ लोटांगण महाराज यांच्या उपस्थितीत लोटांगण सोहळा पार पडला. मनोकामना पूर्ण व्हावी आणि देवीप्रती आपली श्रद्धा व्यक्त करता यावी, या भावनेतून ४६ भाविकांनी लोटांगण घातले. देवीचे दर्शन घेतल्यानंतर सुरू झालेला हा भक्तिप्रवास सुमारे पाचशे मीटर अंतरापर्यंत चालला.

भजन मंडळाच्या गजरात आणि मातामायच्या जयघोषात भाविक लोटांगण घालत असताना परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते. अंतर पूर्ण झाल्यानंतर देवीची आरती आणि कापूर आरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी देवीच्या चरणी नतमस्तक होत विधी पूर्ण केला.

### श्रद्धेची परंपरा नव्या पिढीकडे

बदलत्या काळातही तेलीपुरातील मातामाय दुर्गोत्सवाची परंपरा जिवंत आहे. पिढ्यान?पिढ्या चालत आलेल्या या श्रद्धेच्या सोहळ्यात नव्या पिढीचाही सहभाग दिसून येत आहे. केवळ धार्मिक विधी नव्हे, तर सामूहिक श्रद्धा, भक्तिभाव आणि सामाजिक एकजुटीचे दर्शन घडविणारा हा सोहळा ठरला. हजारो भाविकांच्या उपस्थितीने तेलीपुरा परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

# मंगल कार्यालयातील २० हजारांचा गिझर चोरीला ; १२ तासांत महिला आरोपी जेरबंद

## सेलू पोलिसांच्या डी.बी. पथकाची धडाकेबाज कारवाई; मुद्देमाल हस्तगत



**सेलू जनमाध्यम :** येथील माहेर मंगल कार्यालयाच्या आवारातून चोरीला गेलेल्या तांब्याच्या गरम पाण्याच्या गिझरचा सेलू पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला. गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी एका महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून चोरीस गेलेला २० हजार रुपये किमतीचा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. सेलू पोलिसांच्या डी.बी. पथकाने केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे चोरीच्या घटनेचा तातडीने उलगडा झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माहेर मंगल कार्यालयाचे संचालक सुरेश मोतीलाल जयस्वाल यांनी १८ ऑक्टोबर रोजी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. १५ ते १६ ऑक्टोबरदरम्यानच्या रात्री अज्ञात चोरट्याने मंगल कार्यालयाच्या आवारात प्रवेश करून कार्यालयासमोर ठेवलेला अंदाजे २० हजार रुपये किमतीचा तांब्याचा गरम पाण्याचा गिझर चोरून नेला होता. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

गुन्ह्याचा तपास करताना डी.बी. पथकातील पोलीस हवालदार अनिल केकतपुरे यांना गोपनीय सूत्रांकडून महत्त्वाची माहिती मिळाली. त्याआधारे पोलिसांनी शोभा गोविंदराव शिंदे (वय ३२, रा. गिट्टी खदान, बोरगाव मेघे, वर्धा) हिचा शोध घेतला. तिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तिने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी तो जप्त केला.अवघ्या १२ तासांत गुन्ह्याचा छडा लावून शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत केल्याने तक्रारदाराने पोलिसांचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली सेलूचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. डी.बी. पथकातील पोलीस हवालदार अनिल केकतपुरे, रामकिसन इप्पर, गजानन कमठाने, विनायक गोडे, ओमप्रकाश तल्लारी, प्रियंका घुगरे आणि लोकेश पवनकर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# वृद्धाचे अपहरण करून २० हजारांची खंडणी

## कारमध्ये कोंबून मारहाण, मोबाईल फोडला, स्थानिक गुन्हे शाखेची २४ तासांत कारवाई



**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूर-हैदराबाद महामार्गावरून एका ६८ वर्षीय वृद्धाला कारमध्ये जबरदस्तीने बसवून त्यांचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर मारहाण करून मोबाईल फोडण्यासह जीवे मारण्याची धमकी देत ऑनलाइन २० हजार रुपये उकळण्यात आले. या खळबळजनक घटनेचा वर्धा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत छडा लावला. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन त्याला अमरावती जिल्ह्यातील देवगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली पाच लाख रुपये किमतीची कार, मोबाईल आणि रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रूपचंद चोखोबा कांबळे (वय ६८, रा. धामणगाव वाठोडा) हे १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास हिंगणघाट येथील कृषी उत्पन्न बाजार समितीजवळ नागपूर-हैदराबाद महामार्गावर उभे होते. यावेळी पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांना दवाखान्याकडे सोडण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून वणी गावाजवळ नेले.

वणी गावाजवळ नेल्यानंतर आरोपीने वृद्धाच्या चेहऱ्यावर आणि डोळ्यांवर ठोसे मारून त्यांना जखमी केले. त्यांचा मोबाईल फोडून नुकसान केले. तसेच जीवे मारण्याची धमकी देत जबरदस्तीने ऑनलाइन २० हजार रुपये घेतले. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी स्थानिक गुन्हे शाखेची पथके नागपूर आणि पुलगाव परिसरात रवाना केली.

गुन्ह्यातील रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्तीचा नागपूर जिल्ह्यात तांत्रिक पद्धतीने शोध घेण्यात आला. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी सुरेशसिंग बंगालसिंग चितोडीया (वय ४०, रा. पाचोरा, जि. जळगाव) याचा माग काढला. अमरावती जिल्ह्यातील देवगाव परिसरात तो आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली एमएच १९ ईए ३९८० क्रमांकाची पांढऱ्या रंगाची कार (किंमत पाच लाख रुपये), सॅमसंग कंपनीचा मोबाईल (किंमत १० हजार रुपये) आणि १७ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक राहुल इटेकर, पोलीस हवालदार नरेंद्र पाराशर, रामेश्वर नागरे, अरविंद येणुरकर, मनोज धात्रक, महादेव सानप, पोलीस अंमलदार मिथुन जिचकार, प्रफुल पुनवटकर, सागर भोसले, हर्षल सोनटक्के आणि सायबर सेलचे पोलीस हवालदार अक्षय राऊत यांनी कारवाईत सहभाग घेतला.

### सुट्टीची सूचना

आज मंगळवार दि. २० आक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) निमित्त दै. जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार दि, २१ आक्टोबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची नोंद एजंट, जाहिरातदार आणि वाचकांनी घ्यावी. - व्यवस्थापक

# इटाळ्यात जीवघेणा थरार पेट्रोल ओतले, गळा चिरण्याचा प्रयत्न

## जुन्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला; इटाळा येथील घटनेने खळबळ

**सेलू जनमाध्यम :** मित्राला भेटण्यासाठी गेलेल्या तरुणाच्या अंगावर पेट्रोल ओतून त्याला पेटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यातून बचाव करण्यासाठी तो पाण्याच्या टाकीजवळ गेला असता, हल्लेखोराने पाठलाग करून चाकूने त्याच्या गळ्यावर वार केला. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना शनिवारी, १७ ऑक्टोबर रोजी रात्री इटाळा येथे घडली.

चेतन अनिल गावंडे (३०, रा. महाबळा) असे जखमी तरुणाचे नाव असून रोहित विठोबा तळवेकर (३०, रा. महाबळा) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री ८.३० ते ९ वाजण्याच्या सुमारास चेतन हा त्याचा मित्र पप्पू दशरथ सावंत याला भेटण्यासाठी इटाळा येथे त्याच्या घरी गेला होता. यावेळी तेथे रोहित तळवेकर उपस्थित होता. जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपीने चेतनला, तू मला आधी का मारले अशी विचारणा केली. त्यानंतर वाद वाढताच आरोपीने जवळील पेट्रोल चेतनच्या अंगावर ओतून त्याला पेटविण्याचा प्रयत्न केला.

या हल्ल्यातून बचाव करण्यासाठी चेतनने जवळच असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ धाव घेतली. मात्र, आरोपीने त्याचा पाठलाग करीत चाकूने थेट गळ्यावर वार केला. या वारामुळे चेतनच्या गळ्याला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल केले.

या प्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# पाणी अडवा, पाणी जिरवा दुर्गा मंडळाचा स्तुत्य पुढाकार

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** यंदा पावसाने ओढ दिल्याने नदी-नाले कोरडे पडले असून आगामी काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नजीकच्या परसोडी गावातील 'एक गाव, एक दुर्गादेवी' मंडळाने नाल्यावर वनराई बंधारा बांधून जलसंवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमात गावातील पुरुष आणि महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले.



**धार्मिक श्रद्धेतून सामाजिक बांधिलकी** नवरात्रोत्सवात घटस्थापना आणि दुर्गामातेच्या मूर्तीच्या विसर्जनासाठीही नदी-नाल्यांत पाणी उपलब्ध नसल्याची समस्या गावकऱ्यांसमोर उभी राहिली. या परिस्थितीत केवळ चिंता व्यक्त न करता पाणी अडविण्याचा निर्णय मंडळाने घेतला. त्यातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. नवरात्रोत्सव म्हणजे केवळ देवीची आराधना नव्हे, तर समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याची संधीही आहे. याच भावनेतून मंडळाने धार्मिक उत्सवाला सामाजिक कार्याची जोड दिली.

'पाणी वाचवा, पाणी अडवा आणि भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी सज्ज व्हा,' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मंडळाच्या या स्तुत्य कार्याचे ग्रामस्थांकडून कौतुक व अभिनंदन होत आहे.

### श्रीकांत प्रधान यांचे निधन



वर्धा : येथील महावीर हाऊसिंग सोसायटी, केळकरवाडी येथील रहिवासी श्रीकांत गजाननराव प्रधान (वय ७२) यांचे रविवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. श्रीकांत प्रधान हे सहकार विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी होते. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर ते वर्धा येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पार्थिवावर स्थानिक मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, भाऊ, बहीण, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी HEENA MOHSIN NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील HEENA KAUSAR MOHSIN NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी MOHAMMAD MOHSIN MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील MOHSIN YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- वॉर्ड नं ३आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी HEENA NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील HEENA KAUSAR MOHSIN NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पासपोर्ट नंबर ञ१२७२४६९ वरील माझे MOHAMMAD ARHAAN MOHSIN NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील ARHAAN MOHSIN NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता:शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३

माझे पासपोर्ट नंबर ए५०९८२०२ वरील माझे MOHAMMAD MOHSIN MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील MOHSIN YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता: वॉर्ड नं ३ आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पासपोर्ट नंबर ७९१४००३ वरील माझे MOHAMMED YUSUF NOOR MOHAMMED NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील YUSUF NOORMOHAMMAD NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी SAIRA BANU MOHAMMED YUSUF असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील SAYARABANO YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पासपोर्ट नंबर X7908239 वरील माझे SAYRABANU MOHAMMED YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील SAYARABANO YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी MOHAMMED YUSUF NOOR MOHAMMED असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील YUSUF NOORMOHAMMAD NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी MOHAMMAD MOHSIN NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील MOHSIN YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- वॉर्ड नं ३ आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पासपोर्ट नंबर X3984791 वरील माझे HEENA KAUSAR NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील HEENA KAUSAR MOHSIN NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

माझे पूर्वी HEENA KAUSAR MOHAMMAD MOHSIN NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील HEENA KAUSAR MOHSIN NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची यवतमाळमध्ये दुर्गोत्सव मंडळाला भेट!

## गोळीबाराच्या घटनेनंतर थेट गाठले टायगर श्रॉफचे घर

**यवतमाळ/प्रतिनिधी-:** शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक प्रचारासाठी रविवारी यवतमाळ दौऱ्यावर आलेले शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रात्री शहरातील शिवराय दुर्गोत्सव मंडळाला भेट देऊन दुर्गामातेचे दर्शन घेतले. अष्टमीच्या निमित्ताने शहरातील दुर्गोत्सव मंडळांमध्ये भाविकांची गर्दी वाढलेली असताना, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेत त्यांनी हा दौरा केला. यावेळी पालकमंत्री संजय राठोड आणि खासदार संजय देशमुख उपस्थित होते. शिंदे यवतमाळात असतानाच मुंबईतील अभिनेता टायगर श्रॉफवरील हल्ल्याची माहिती त्यांना मिळाली, आणि तातडीने मुंबईकडे रवाना होत त्यांनी टायगर श्रॉफची भेट घेतली.

उपमुख्यमंत्र्यांना दुर्गादेवीच्या मंडपात बघून नागरिकांना आश्चर्य

यवतमाळ शहरातील दुर्गोत्सवाची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिली. त्यानंतर त्यांनी शिवराय दुर्गोत्सव मंडळाला भेट देत पूजा-अर्चना केली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी विवेक गावंडे, नितीन मिर्झापूरे, सचिन येवले, रवी राऊत, राहुल चौधरी, नीलेश फाळके आदींनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. चक्क उपमुख्यमंत्री अचानक देवीच्या दर्शनाला आल्याने उपस्थित नागरिकांना आश्चर्याचा धक्का बसला. मंडळासमोर भक्तांची गर्दी पाहून शिंदे यांनी यवतमाळात दुर्गोत्सवाची अधिक माहिती पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडून जाणून घेतली. दुर्गादेवीची पूजा करून, राज्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांना सुख, समृद्धी लाभू दे, अशी प्रार्थना त्यांनी केली.

**जय हिंद मंडळाला व्हिडीओ कॉलवरून शुभेच्छा**

शहरातील जय हिंद दुर्गोत्सव मंडळालाही उपमुख्यमंत्री शिंदे सदिच्छा भेट देणार होते. मात्र, वेळेअभावी आणि अष्टमीच्या पार्श्वभूमीवर जयहिंद चौकात वाढलेली गर्दी लक्षात घेता त्यांनी प्रत्यक्ष भेट टाळली. नागरिकांची गैरसोय होऊ नये, या भूमिकेतून शिंदे यांनी मंडळाचे पदाधिकारी पवन अराठे यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी मंडळातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दुर्गोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. पुढील वर्षी मंडळाला प्रत्यक्ष भेट देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा दिलासा-** यवतमाळ दौऱ्यादरम्यान शिंदे यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचीही माहिती घेतली. शेतकऱ्यांपुढील अडचणी आणि ग्रामीण भागातील परिस्थिती जाणून घेताना त्यांनी सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा असल्याचे सांगितले. दुष्काळाच्या संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे नमूद करत दिवाळीचा सण साजरा करता यावा, यासाठी पात्र शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची आगाऊ आर्थिक मदत देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळी मदतीची प्रक्रिया पूर्ण होऊन पुढील मदत मिळेलच; मात्र सणाच्या काळात शेतकरी कुटुंबांना तातडीचा आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने आगाऊ रक्कम दिली जात असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. राज्यात दुष्काळग्रस्त तालुक्यांची व्याप्ती वाढविण्यात आली असून, १४ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केल्याची आणि पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपये देण्याची घोषणा केल्याची माहितीही यासंदर्भात प्रसिद्ध झाली आहे.



**शिक्षकांच्या प्रश्नांवर सकारात्मक तोडग्याची ग्वाही-** शेतकऱ्यांप्रमाणेच शिक्षकांच्या प्रश्नांबाबतही शासन सकारात्मक असल्याचे शिंदे यांनी सहविचार सभेत सांगितले. शिक्षकांना विविध प्रशासकीय अडचणींमध्ये अडकून न पडता अध्यापनावर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची भूमिका त्यांनी मांडली. २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या शिक्षकांच्या निवृत्तिवेतनाचा प्रश्न तसेच अन्य प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्याची ग्वाही त्यांनी दिली. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या दौऱ्यात एका बाजूला दुर्गोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक-सामाजिक संवाद साधण्यात आला, तर दुसरीकडे जिल्ह्यातील दुष्काळ आणि शिक्षकांच्या प्रश्नांनाही महत्त्व देण्यात आल्याने उपमुख्यमंत्री शिंदे यांचा हा दौरा यशस्वी झाल्याची चर्चा आहे.

**टायगर श्रॉफवरील हल्ल्याची माहिती यवतमाळातच मिळाली**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यवतमाळात सहविचार सभेत भाषण करत असतानाच सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान मुंबईत बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर जुहू येथील पुष्पा पार्क, जामनाबाई फुटबॉल मैदानाजवळ गोळीबार आणि जीवघेणा हल्ला झाला. भाषण संपताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या हल्ल्याची माहिती मिळाली. यवतमाळहून रात्री मुंबई येथे पोहोचताच त्यांनी तातडीने टायगर श्रॉफ यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

# झेंडूच्या फुलांना कवडीमोल दराने शेतकरी हवालदिल

**अमरावती/प्रतिनिधी-:** दुष्काळाच्या संकटामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. दुसरीकडे दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत झेंडूच्या फुलांना अपेक्षित दर मिळेल या आशेने अनेक शेतक-यांनी झेंडू लागवड केली होती. उद्या दसरा अर्थात विजया दशमीसाठी मोठ्या प्रमाणावर झेंडूची मागणी असते. या पार्श्वभुमीवर बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात झेंडूच्या फुलांची आवक झाल्याने ३० ते ४० रुपये किलो एवढ्या कवडीमोल दराने झेंडूची फुलांची विक्री होत आहे. त्यामुळे झेंडूची फुले विक्री करुन ४ पैसे मिळतील अशी आशा बाळगलेला शेतकरी मात्र हवालदिल झाल्याचे चित्र पहावयास



मिळत आहे. विजयादशमीच्या निमित्ताने घराघरांत, मंदिरांमध्ये, वाहन, दुकानांना, कार्यालयांना सजविण्यासाठी झेंडूच्या फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, सणाच्या तोंडावर बाजारपेठेत झेंडूच्या फुलांना केवळ ३० ते ४० रुपये प्रतिकिलो असा दर मिळत असल्याने विक्रेत्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. फुले बाजारात आणण्यासाठी होणारा वाहतूक खर्च, तोडणी, लागवड खर्च लक्षात घेता कवडीमोल दर मिळत असल्याने झेंडूची फुले विक्रेत्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. शेतकरी विविध नैसर्गिक संकटांचा सामना करत आहेत. दुष्काळामुळे खरीप हंगामातील पिके हातची गेली आहेत. या परिस्थितीत झेंडूच्या फुलांना दर मिळाल्यास आर्थिक कोंडी थोडीफार सुटेल अशी शेतक-यांना आशा होती. परंतू बाजारपेठेत अतीशय कमी दरामुळे झेंडू उत्पादक शेतकरी आणि विक्रेते दोघांनाही आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे झेंडू विक्रेत्यांच्या चेह-यावरील समाधान हरवल्याचे दिसून येत आहे. विजयादशमी सणाला देखील झेंडू फुलांना योग्य दर मिळत नसल्याने विक्रेते चिंताग्रस्त झाले आहेत. दस-याचा उत्साह बाजारपेठेत दिसत असला, तरी झेंडूच्या फुलांच्या पडलेल्या दरामुळे झेंडू उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांचे मात्र आर्थिक गणीतच कोलमडल्याचे दिसत आहे.

# राज्यात पाणीसाठ्यात मोठी घट!

## धरणांमध्ये केवळ ७०.५३ टक्के जलसाठा

**पुणे / प्रतिनिधी-** राज्यात यंदा पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहिल्याने जलसाठ्यांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असून, अनेक भागांत पाणीटंचाईची चिंता निर्माण झाली आहे. अपु-या पावसाचा परिणाम केवळ नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावरच नव्हे, तर शेतीवरही झाला आहे. उष्णतेच्या तीव्रतेमुळे शेतातील पिके करपल्याने शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे.



जलसंपदा विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण ३,०३३ धरण प्रकल्पांमध्ये सध्या ७०.५३ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत यंदा राज्यातील पाणीसाठ्यात सुमारे २० टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. राज्यातील विविध विभागांमधील जलसाठ्याची स्थिती पाहता काही भागांत समाधानकारक पाणीसाठा असला, तरी काही विभागांमध्ये परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे.छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत कमी म्हणजे ४१.८४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे या भागात पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना प्रशासनाला विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे. विभागनिहाय आकडेवारीनुसार, अमरावती विभागात ५९.४७ टक्के, नागपूर विभागात ६५.४३ टक्के, नाशिक विभागात ७८.८८ टक्के आणि पुणे विभागात ८१.२९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. कोकण विभागाची स्थिती तुलनेने चांगली असून, येथे सर्वाधिक ८७.८४ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे.राज्यातील जलसाठ्यात झालेली घट लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक बनले आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. आगामी काळात पावसाची स्थिती आणि पाण्याचा वापर यावर राज्यातील जलसंकटाची तीव्रता अवलंबून राहणार आहे.

# फ्रान्समध्ये हाहाकार; २४०० हून अधिक जणांना अटक, पंतप्रधानांनी दिला कर्फ्यूचा आदेश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** महागाई आणि कॉस्ट ऑफ लिव्हिंगच्या मुद्द्यावरून फ्रान्समध्ये जनता रस्त्यावर उतरली आहे. अनेक ठिकानांवरून जाळपोळीच्या घटनाही समोर येत आहेत. आता परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी फ्रान्सचे पंतप्रधान सेबेस्टियन लेकोर्नू यांनी सोमवारी दंगल आणि लूटमारीमुळे प्रभावित झालेल्या भागांत आंशिक कर्फ्यूचे आदेश दिले आहेत.



क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सायंकाळपासूनच शहरांमध्ये कर्फ्यू लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**आंशिक कर्फ्यूचे आदेश -** यासंदर्भात, पंतप्रधान लेकोर्नू यांनी स्पष्ट केले आहे की, हे उपाय संपूर्ण देशात नाही तर आंशिक आणि स्थानिक स्तरावर लागू केले जातील. याचा मुख्य उद्देश लहान-मोठी दुकाने आणि व्यवसायांचे रक्षण करणे आहे. राजधानी पॅरिसमध्ये पूर्ण कर्फ्यूची शक्यता त्यांनी नाकारली. याशिवाय, या हिंसाचारामुळे प्रभावित झालेल्या व्यावसायिक व दुकानदारांसाठी मंगळवारपासून अस्थायी सुट्टीची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**२४०० जणांना अटक, १००० सुरक्षा कर्मचारी जखमी -** गेल्या शनिवारी झालेल्या हिंसक आंदोलनादरम्यान पोलीस आणि निदर्शकांमध्ये झालेल्या संघर्षात देशातून २,४०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान झालेल्या हिंसाचार आणि जाळपोळीच्या घटनांमध्ये जवळपास १००० पोलीस व सुरक्षाकर्मी जखमी झाले आहेत. महत्वाचे म्हणजे, रविवारीही देशाच्या विविध भागांतून लूटमार, तसेच तोडफोडीच्या घटना समोर येत होत्या.

**इन्टेलिजेंस आणि तयारीमध्ये चूक -** महत्वाचे म्हणजे, या तीव्र आंदोलनासंदर्भात बोलताना फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅनुएल मॅक्रॉन यांनी प्रशासकीय तयारी आणि गुप्तचर यंत्रणांच्या पातळीवर मोठी चूक व विसंगती झाल्याचे मान्य केले आहे. असे असतानाही, गृह मंत्री लॉरेंट नूनेज यांनी पोलीस नियंत्रण सुटल्याची कबुली देऊन स्वतःचा राजीनामा देऊ केला होता, मात्र राष्ट्रपती मॅक्रों यांनी तो नाकारला.

# राज्यात राष्ट्रपती राजवट लावा

**मुंबई / प्रतिनिधी-** मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट शरसंधान साधले. तसेच महाराष्ट्रात 'गँगस्टर' राज सुरू असून सत्ताधा-यांचा 'रेझिम चेंज' केल्याशिवाय जनता शांत बसणार नाही, असा इशाराही संजय राऊत यांनी या वेळी दिला.



ठाण्यातील गुन्हेगारीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर प्रहार करताना संजय राऊत म्हणाले, काल टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तातडीने अभिनेत्याच्या घरी पोहोचले. त्यांच्या चेह-यावरचे भाव पाहिले तर केवळ रडायचेच बाकी होते. बॉलिवूड, हॉलिवूड आणि उद्योगपतींवर गोळ्या चालल्या की यांना प्रचंड काळजी वाटते, त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्याच्या चर्चा सुरू होतात. दुस-या बाजूला स्वत: एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील घरासमोर राजकीय कार्यकर्ते प्रदीप पुर्णेकर यांची गोळ्या झाडून हत्या झाली. मात्र, ठाण्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री असूनही शिंदे पुर्णेकर यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करायला गेले नाहीत. या प्रकरणातील आरोपी सत्ताधारी गटाच्या स्थानिक नेत्यांसोबत उघडपणे दिसत आहेत. आरोपींना वाचवण्याचे काम गृहखाते करत असल्यामुळेच मुख्य आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर ताशेरे ओढताना ते म्हणाले, महाराष्ट्राला एक पूर्णवेळ आणि सक्षम गृहमंत्री हवा आहे, अशी मागणी आम्ही सातत्याने करतोय. मात्र, गृहखात्याचा वापर गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी न होता केवळ राजकीय विरोधकांना खोट्या गुन्ह्यांत अडकवण्यासाठी आणि तुरुंगात डांबण्यासाठी केला जात आहे.

# भारताचा सुवर्णमयी चौकार ; पहिल्याच दिवशी ११ पदकांची कमाई!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** जपानमधील आयची-नागोया येथे आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर आता पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंनी ४ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदकासह ११ पदकांची कमाई केली असून पदकतालिकेत भारत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे.




**मोना अग्रवाल, अवनी लेखरा यांची नेमबाजीत कमाल**

महिलांच्या १० मीटर एअर रायफल एए१ प्रकाराच्या अंतिम फेरीत मोना अग्रवालने सहाव्या स्थानावरून दमदार पुनरागमन करत सुवर्णपदक पटकावले. गतविजेत्या अवनी लेखराला यावेळी रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मोनाने २५०.० गुणांसह आशियाई पॅरा गेम्सचा विक्रम नोंदवला. तिने अवनीला केवळ ०.४ गुणांनी मागे टाकले.

**निषाद कुमारचा पदार्पणातच सुवर्णवेध; सौम्या आणि रिंकू यांनीही दाखवला सोनेरी दिवस**

पॅरा-अथलेटिक्समध्ये निषाद कुमार, सौम्या आणि रिंकू यांनी आपापल्या प्रकारांत सुवर्णपदके जिंकून भारताच्या पदकतालिकेत भर घातली. पुरुषांच्या लांब उडी T४७ प्रकारात निषाद कुमारने ७.११ मीटरची उडी मारत सुवर्णपदक जिंकले. दोन वेळचा पॅरालिम्पिक रौप्यपदक विजेता निषाद पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्तरावरील लांब उडीच्या स्पर्धेत सहभागी झाला होता. मात्र, त्याने कोणतेही दडपण न घेता सर्वोत्तम कामगिरी केली. महिलांच्या १५०० मीटर T12/T13 प्रकारात सौम्याने ५ मिनिटे १२.३९ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले. ही तिची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. भारताच्या राधा वेंकटेशने ५ मिनिटे ३०.९० सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले. त्यामुळे या प्रकारात भारताने सुवर्ण आणि रौप्यपदकांचा डाव साधला.

**रक्षितानं पदक गमावलं ते रवन्नी वलसनैनीनं कमावलं**

महिलांच्या T11 प्रकारात भारताच्या रवन्नी वलसनैनीने कांस्यपदक जिंकले. सुरुवातीला तिसऱ्या स्थानावर राहिलेल्या रक्षिता राजूला ड्रेस कोड, शूज आणि बिबसंदर्भातील स्पर्धा नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अपात्र ठरवण्यात आले. त्यानंतर रवन्नीला पदकाच्या स्थानावर बढती मिळाली. पुरुषांच्या भालाफेक इ४६ प्रकारातही भारताचे वर्चस्व पाहायला मिळाले. रिंकूने अखेरच्या प्रयत्नात ६५.११ मीटर भालाफेक करत सुवर्णपदक पटकावले. अजीत सिंहने ६५.०२ मीटर कामगिरीसह रौप्यपदक जिंकले. दोन्ही खेळाडूंनी या स्पर्धेत हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. दृष्टिहीन खेळाडूंच्या ज्युदो प्रकारात भारताला आणखी दोन पदके मिळाली.

**रवी कार्तिकने जलतरणात जिंकले रौप्यपदक**

जलतरणात भारताच्या रवी कार्तिक बुडिगिनाने पुरुषांच्या १०० मीटर फ्रीस्टाइल एए१३ प्रकारात रौप्यपदक जिंकले. त्याने ५६.६८ सेकंदांत शर्यत पूर्ण करत पदकतालिकेत भारताची भर घातली. एए१३ हा तुलनेने कमी दृष्टीदोष असलेल्या जलतरण-पटूंसाठीचा प्रकार आहे.




# बप्पी लाहिरी यांच्या संगीताचा वारसा सदैव प्रेरणा देत राहील

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'संगीतकार बप्पी लाहिरी मार्ग'चे नामकरण**

**मुंबई/प्रतिनिधी-** दिवंगत संगीतकार आणि गायक बप्पी लाहिरी यांनी आपल्या संगीताने, गीतांनी आणि अनोख्या शैलीने अनेक दशके संपूर्ण संगीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या संगीताचा प्रभाव देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचला.त्यांची अनेक गाणी आजही लोकप्रिय आहेत. बप्पी लाहिरी यांचे जीवन आणि संगीताचा वारसा सदैव प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अंधेरी येथील जुहू परिसरात दिवंगत संगीतकार व गायक बप्पी लाहिरी यांच्या निवासस्थानाजवळील मार्गाचे 'संगीतकार बप्पी लाहिरी मार्ग' असे नामकरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र, ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ, ज्येष्ठ गायक उदित नारायण यांच्यासह चित्रपटसृष्टी आणि संगीत क्षेत्रातील मान्यवर, तसेच बप्पी लाहिरी यांचे कुटुंबीय आणि चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बप्पी लाहिरी यांच्या स्मृतींना उजाळा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बप्पीदा हे केवळ एक लोकप्रिय संगीतकार नव्हते, तर त्यांनी आपल्या संगीताद्वारे अनेक पिढ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला. त्यांनी संगीतविश्वात अनेक नवे प्रयोग केले. विशेष म्हणजे, भारताबाहेरही त्यांच्या गाण्यांना मोठी लोकप्रियता मिळाली असून, रशियन फेडरेशनमध्येही त्यांची गाणी आजही मोठ्या प्रमाणावर गायली आणि ऐकली जातात. आजचा हा कार्यक्रम केवळ मार्गाच्या नामकरणापुरता मर्यादित नसून, त्यांच्या समृद्ध जीवनाचा आणि संगीतप्रवासाचा गौरव करण्याचा आहे. त्यांच्या गाण्यांचे स्मरण हा एक संगीतमय प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या आठवणींसोबतच त्यांची असंख्य गाणी आपल्या मनात पुन्हा जागी होतात. त्यांच्या जीवनाचा गौरव करण्याची संधी मिळणे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. बप्पी लाहिरी यांच्या नावाने या मार्गाचे नामकरण करून त्यांच्या संगीतक्षेत्रातील अतुलनीय योगदानाच्या स्मृती जतन करण्याचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# Gen-Alpha मुळे जॉर्जिया मेलोनी यांच्या अडचणीत वाढ

## इटलीत ४४०० कोटींच्या मालमत्तेचे नुकसानीचा दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** इटलीमध्ये सध्या नवीन पिढी अर्थात 'जेन-अल्फा'मुळे पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासमोर प्रशासकीय व राजकीय अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या नवीन पिढीतील मुलांच्या वर्तणुकीमुळे आणि वेगवेगळ्या समाज माध्यमांवरील ट्रेंड्समुळे देशातील सार्वजनिक मालमत्तेचे व व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. एका अहवालानुसार, या समस्यांमुळे



इटली सरकारला तब्बल ४४०० कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. डिजिटल युगात वाढणाऱ्या या नव्या पिढीच्या बदलत्या जीवनशैलीमुळे आणि ऑनलाईन आव्हानांमुळे शाळा, सार्वजनिक ठिकाणे तसेच सरकारी इमारतींचे नुकसान करण्याचे प्रकार समोर आले आहेत. तरुण पिढीमध्ये सोशल मीडियावरील लाईक्स आणि व्ह्यूजसाठी केल्या जाणाऱ्या स्टंट्समुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारांमुळे पंतप्रधान मेलोनी यांच्या सरकारसमोर एक नवे आणि मोठे आव्हान उभे राहिले असून, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर पावले उचलली जात आहेत. या वाढत्या समस्येमुळे मेलोनी सरकारवर देशातील आर्थिक शिस्त आणि सुरक्षा व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. एका बाजूला देशावर असलेले कर्जाचे ओझे आणि आर्थिक मंदीचे संकट असताना, दुसरीकडे अशा प्रकारच्या अंतर्गत नुकसानीमुळे सरकारी तिजोरीवर अतिरिक्त ताण पडत आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणांनी अशा घटनांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी इटली सरकार आता डिजिटल नियम अधिक कठोर करण्याच्या विचारात आहे. अल्पवयीन मुलांच्या ऑनलाईन वागणुकीवर आणि पालकांच्या जबाबदारीवर भर देणारे नवे कायदे आणले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी या संपूर्ण प्रकरणावर अत्यंत कडक भूमिका घेण्याच्या तयारीत असून, देशातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

# जामा मशीद मेट्रो स्टेशनवर संशयित ताब्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दिल्लीतील प्रसिद्ध जामा मशीद मेट्रो स्टेशनवर सुरक्षा तपासणीदरम्यान पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयित प्रवाशाला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या जवानांनी अगदी 'फिल्मी स्टाईल' पाठलाग करून पकडले आहे. बॅगेज स्कॅनिंग दरम्यान संशय आल्यानंतर, या प्रवाशाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, जवानांनी अत्यंत चपळाईने पाठलाग करून त्याला मेट्रो स्टेशनच्या एक्झिट गेटजवळच ताब्यात घेतले.सीआयएसएफने दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो स्टेशनवर सुरक्षा तपासणी दरम्यान एक्स-रे बॅगेज इन्स्पेक्शन सिस्टमच्या स्क्रीनवर प्रवाशाच्या पिशवीत एक संशयित वस्तू दिसून आली. तपासणीचा संशय येताच त्या प्रवाशाने तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क जवानांनी त्याला त्वरित पाठलाग करून रोखले आणि ताब्यात घेतले.त्याच्या सामानाची कसून तपासणी करण्यात आली. त्याच्या अंडरगारमेंटच्या शिवलेल्या भागात एक अज्ञात पदार्थ लपवून ठेवल्याचे आढळले आहे. प्राथमिक चौकशीत संबंधित प्रवाशाने तो मलेशियातील कुआला लंपूर येथील अनिवासी भारतीय असल्याचे म्हटले आहे. जप्त करण्यात आलेला संशयित पदार्थ नेमका काय होता आणि तो कोणत्या हेतूने अशा पद्धतीने लपवून ठेवण्यात आला? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. सीआयएसएफच्या जवानांनी या संशयित प्रवाशाला आणि जप्त केलेल्या पदार्थाला पुढील कायदेशीर चौकशीसाठी स्थानिक दिल्लीपोलिसांच्या हवाली केले आहे. पोलीस सध्या या पदार्थाची तपासणी करत असून सर्व बाजूंनी प्रकरणाचा तपास सुरू आहे.



**CISF च्या जवानांनी फिल्मी स्टाईल पाठलाग करून पकडलं**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## इथेनॉल आणि साखर उद्योग

सध्या सणासुदीचे पर्व आहे.त्यामुळे किरकोळ बाजारातील साखरेच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि संभाव्य साखर टंचाईला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीसाठी ऊस व साखर वापरण्यास पूर्ण बंदी घातली आहे. सामान्य लोकांना साखर कमी किमतीत उपलब्ध व्हावी, या चांगल्या हेतूने सरकारने इथेनॉलवर निर्बंध घातले असले तरी प्रत्यक्षात सणासुदीच्या काळात साखरेचे भाव किती कमी होतील किंवा स्थिर राहतील, हे किरकोळ बाजारातील परिस्थिती पाहूनच ठरणार आहे. सरकारच्या या निर्णयाचा अर्थ असा की, २०२६-२७ च्या इथेनॉल पुरवठा वर्षात (नोव्हेंबर २०२६ ते ऑक्टोबर २०२७) उसाचा रस, साखरेचा पाक, साखर आणि बी-हेवी मळीपासून तयार केलेल्या इथेनॉलची खरेदी तेल कंपन्या करणार नाहीत. मात्र, सी-हेवी मळीपासून तयार केलेल्या इथेनॉलला परवानगी आहे. त्यामुळे हा सर्व प्रकारच्या इथेनॉल उत्पादनावरील संपूर्ण बंदीचा निर्णय नाही; तो साखरेचे प्रमाण जास्त असलेल्या कच्च्या मालाच्या वापरावर निर्बंध घालतो. देशात साखरेचा पुरवठा कमी असल्याने मागील दोन महिन्यांमध्ये साखरेच्या भावात चांगलीच वाढ झाली. त्यातच यंदा दुष्काळामुळे साखरेचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. केवळ सी हेव्ही मोलॅसिसपासून यंदा इथेनॉल निर्मिती होणार आहे.सी हेव्ही मोलॅसिसमध्ये साखरेचे प्रमाण खूपच कमी असते. त्यातून पुन्हा साखर काढणे शक्य होत नाही. दरम्यान, सरकारी तेल विपणन कंपन्यांनी २०२६-२७ या तेल विपणन वर्षातील इथेनॉल पुरवठ्याची निविदा शुक्रवारी काढली आहे. म्हणजे पुढील वर्षभरात ११०० कोटी लिटर इथेनॉल मागणीनुसार पुरवावे लागणार आहे. राज्यात दोनशे साखर कारखाने आहेत, पैकी सव्वाशेपेक्षा जास्त कारखाने इथेनॉलची निर्मिती करतात. या सर्वांना वर्षभरासाठी नवे आर्थिक नियोजन करावे लागेल. पेट्रोलमध्ये ई-२० इंधनाचा वापर सुरू झाल्यापासून केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीसाठी साखर कारखान्यांना सवलती जाहीर केल्या. कर्जासाठी हमी तसेच व्याजदरात सवलती आदींचा त्यात समावेश आहे. साखर कारखान्यांनीही इथेनॉल निर्मितीमध्ये रस दाखवला. इथेनॉल निर्मितीसाठी देशातील साखर उद्योगाने पंचेचाळीस हजार कोटींची गुंतवणूक केली असल्याचा अंदाज आहे. आता नव्या निर्णयाने कारखान्यांच्या गणिताला धक्का बसणार आहे. इथेनॉल निर्मितीसाठी साखरेचा वापर थांबला की साखरेचे उत्पादन वाढेल व किरकोळ बाजारात साखरेच्या किमती स्थिर राहतील, असे गणित मांडले जात असले तरी दरवर्षी पंधरा लाख टन आयात केली जाणारी साखर थांबवली जाईल का, याचे मात्र उत्तर मिळत नाही. आजही देशात साखरेचा तुटवडा आहे, तो कमी होईल का व झाला तर किती तूट भरून निघेल याची अंदाजित आकडेवारी अजून पुढे आलेली नाही. मोठी गुंतवणूक केलेले साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही त्याचा फटका बसण्याचा धोका आहेच.महाराष्ट्रातील ऊस दराचे अर्थकारण हे शेतकरी, साखर कारखाने आणि सरकार यांच्या आर्थिक हितसंबंधांशी जोडलेले आहे. ऊस उत्पादकांना मिळणारा वाजवी आणि किफायतशीर दर (एफआरपी) हा त्यांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असतो. उसाचा उत्पादन खर्च, तोडणी व वाहतूक खर्च, पाण्याची उपलब्धता आणि साखरेच्या बाजारभावातील चढ-उतार यांचा शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नावर परिणाम होतो. दुसरीकडे, साखरेच्या विक्रीदरात पुरेशी वाढ न झाल्यास वाढीव एफआरपी देताना कारखान्यांवर आर्थिक ताण येतो आणि ऊस बिलांची थकबाकी वाढण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे महाराष्ट्रातील ऊस दराचा प्रश्न केवळ दरवाढीपुरता मर्यादित नसून, शेतकऱ्यांना योग्य मोबदला, कारखान्यांची आर्थिक व्यवहार्यता आणि साखर उद्योगाची दीर्घकालीन स्थिरता यांचा समतोल साधणे महत्त्वाचे असते. इथेनॉलची निर्मिती कमी झाली तर इंधनामधील मिश्रणावर त्याचा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच पर्यायी घटकापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर भर देण्याचे केंद्राने ठरवले आहे. २०२५- २६ या वर्षीच्या साखर हंगामात देशात साखर उत्पादन ३१० लाख टन अपेक्षित होते. यावर्षी ते २८० लाख टनापर्यंत खाली येईल, असा अंदाज आहे. विविध नैसर्गिक कारणांमुळे व हवामान बदलामुळे उसाच्या उत्पादनात घट होत आहे. दरवर्षी साखर उत्पादनातील तूट भरून काढण्यासाठी साखर आयात करावी लागते. आता इथेनॉलवर निर्बंध घातल्याने साखर उत्पादनातील तूट काही कमी होऊ शकेल, पण आयातीवर होणारा खर्च त्या प्रमाणात कमी होणार आहे का?साखर कारखान्यांना इथेनॉलमुळे नवे उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले होते. आता नव्या निर्णयाने साखर कारखाने, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, ग्राहक व इथेनॉल प्रकल्प या सर्व घटकांवर परिणाम होऊ शकतो. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व कर्नाटक ही तीन राज्ये साखर उद्योगात अग्रेसर आहेत. साखर कारखाने व ग्रामीण जीवनाचा निकटचा संबंध आहे. ग्रामीण जीवनात परिवर्तन घडविण्यात साखर कारखान्याचा मोठा वाटा आहे. २०२६-२७ च्या हंगामात साखर उत्पादनाबाबत अनिश्चितता आहे. म्हणूनच साखरेचा वापर इथेनॉलऐवजी साखर विक्रीसाठी करावा, असा निर्णय केंद्राने घेतला आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये केंद्राने दिलेल्या आकडेवारीनुसार साखरेचा सरासरी भाव जो २० जुलै रोजी प्रतिकिलो ४८.१८ रुपये होता तो २० ऑगस्ट रोजी ५५.७० रुपये वाढवला होता. या दरवाढीमागे केवळ इथेनॉल नव्हे तर साखरेचा कमी उत्पादन, वाढती मागणी, जागतिक परिस्थिती आणि साठेबाजी अशीही कारणे होती. केंद्र सरकारचा इथेनॉल निर्मितीवरील निर्बंधांचा निर्णय साखरेचा पुरवठा वाढवून किमती स्थिर ठेवण्याच्या उद्देशाने घेतला असला, तरी त्याचे यश केवळ साखरेचे उत्पादन वाढण्यावर ठरणार नाही. साखरेचे दर ग्राहकांना परवडणारे राहणे, साखर कारखान्यांची आर्थिक घडी विस्कटू न देणे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर व योग्य मोबदला मिळणे, या तिन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. इथेनॉल प्रकल्पांमध्ये झालेली मोठी गुंतवणूक आणि त्यातून निर्माण झालेल्या रोजगाराकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे साखर आणि इंधन या दोन्ही गरजांचा समतोल साधणारे धोरण आखणे आवश्यक आहे. अन्यथा, ग्राहकांना दिलासा देण्याच्या प्रयत्नात साखर उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अखेरीस, साखरेचे भाव किती कमी झाले यापेक्षा त्या निर्णयाचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचला का, शेतकऱ्यांचे हित जपले गेले का आणि कारखान्यांची आर्थिक स्थिरता टिकली का, या तीन कसोट्यांवरच केंद्र सरकारच्या निर्णयाचे खरे यश ठरणार आहे.

# वातावरणातील बदल घातक ठरणार



**एल-निनोच्या प्रभावामुळे राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. पण शेतकरी हा हवालदील झालेला आहे त्याला नैराश्याच्या गर्तेतून काढण्यासाठी २०१६-१७ मध्ये राबवलेला प्रेरणा प्रकल्प राबविणे गरजेचे आहे.**

क्लायमेट चेंजमुळे वातावरणातील अनेक स्थित्यंतराबरोबर एल-निनोचे संकट जगावर घोंघावत आहे. हा बदल शोधून काढणारे कोळी आहेत. त्यांना कळलेला हा पाण्याच्या तापमानात होणारा बदल, वाढलेले पाण्याचे तापमान त्यांच्या मासेमारीला अडचणीचे ठरायचे. एल-निनो म्हणजे Christ child छोटे बाळ. पेरू या देशाच्या समुद्रात दर डिसेंबर महिन्यात पाण्याच्या तापमान बदल व्हायचा. हा बदल हवामान शास्त्र व समुद्र शास्त्राप्रमाणे वातावरणातील बदलामुळे विषुववृत्तीय भागातील प्रशांत महासागरातील समुद्राच्या पाण्याच्या तापमानात वाढ झालेली. ही ऐन डिसेंबर महिन्यात होते, दक्षिण अमेरिकेवरही या विषुववृत्तीय भागाच्या विपरीत तापमान वाढीचा परिणाम दिसतो, याचा परिणाम चिलीमधील शेती मासेमारीवरही दिसून येतो. याचा दूरगामी परिणाम दक्षिण आशिया भागातील देशांवर दिसून येतो. हे सतत कमी जास्त होणारे तापमान ओशनिक निनो इंडेक्सद्वारे मोजले जाते. ONI यामुळे लंबकाप्रमाणे सतत ऑसिलेशन करत राहणारे तापमान ही हवामान शास्त्रासाठी डोकेदुखी असते.

सध्याचा एल-निनोचा प्रभाव हा मोठ्या प्रमाणात वातावरणातील बदल घडवून आणत आहे. याची सुरुवात जून २०२६ पासूनच झाली आहे. हा क्लायमेट चेंजचा प्रभाव हा जागतिक स्तरावर मोठी हानी होणार आहे. University of Chicago व क्लायमेट इम्पॅक्ट लॅब (Climate Impact Lab) च्या रिपोर्टनुसार जगात ४ लाख ५१ हजार लोक मृत्युमुखी पडू शकतात.

यापैकी ६०००हून अधिक लोक नेपाळ दुर्घटनेत बेपत्ता आहेत. कदाचित सर्वच मृत्युमुखी पडले असतील, असे सध्यातरी शव मिळालेले नसल्याने म्हणणे योग्य होणार नाही. मात्र शोध सुरू आहे असेच म्हणता येईल. यापैकी नायजेरिया सुदान याचबरोबर निगर, चाड, या साऊथ ईस्ट आशियातील देशात जास्त बळी जातील, असे म्हटले आहे. फिलिपाइन्सच्या व्हिएतनाम कंबोडिया थायलंड येथे ही ॲव्हरेज डेथ टोलपेक्षा जास्तीचे बळी जाणार, असे म्हणणे आहे. तसेच इंडोनेशियात अंदाजे १९३० अधिकचे मृत्यू होणार आहेत. भारततही १५००हून अधिकचे मृत्यू होतील, असे क्लायमेट इम्पॅक्ट लॅब यांच्या अहवालात नमूद केले आहे. विशेषत: पृथ्वीवर साऊथ ग्लोब हा या एल- निनोच्या प्रभावाचा बळी ठरेल. १३० हून अधिक देशात मृत्यू वाढतील पाण्याचे, अन्नाचे दुर्भिक्ष्य, वादळे याला या भागाला सामोरे जावे लागेल. यात जास्तीत जास्त बळी तापमानात होणाऱ्या वाढीमुळे आहेत, समुद्र तापमान वाढीबरोबरच Global Land temperature १.२ degrees Celsius ने वाढलेले असेल ही सर्व तापमान वाढ जून २०२६ पासून सुरू आहे. ती फेब्रुवारी-मार्च २०२७ पर्यंत राहील, असे म्हटले आहे. जागतिक स्तरावर याची नोंद घेतली गेली आहे.

महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भातील जनता दुष्काळी परिस्थितीत होरपळत आहे. देशातील परिस्थिती ही तशीच आहे. गेल्या २० वर्षांत जगात इतकी तापमानवाढ कधीच झाली नव्हती. या जून ते फेब्रुवारी या कालावधीतील ४४% दिवस हे सर्वाधिक उष्ण असतील. त्यामुळे हिट स्ट्रोकमुळे जास्त लोक मृत्युमुखी पडतील तसेच उष्णता वाढल्याने पाण्याची पातळी कमी होईल. वॉटर टेबल खाली जाईल. नदी, नाले, तलाव इतर पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटून जातील, त्यामुळे वॉटर टेबल खाली जाईल. पावसाळा संपत आला तरी महाराष्ट्रात फक्त किनारपट्टीच्या भागात थोडाफार पाऊस झाला. पण भातशेती ही धोक्यात आहे. कदाचित रिसर्चरच्या म्हणण्यानुसार, जलजन्य आजार वाढतील. दूषित पाणी व क्षारयुक्त पाणी प्यायल्याने डायरिया, कॉलरा, अमिबायासिस, कोलन कॅन्सरसारखे आजार मृत्यूच्या आकडेवारीत भर घालू शकतात. किडनी विकार क्षारयुक्त पाणी प्यायल्याने बळावतील. असे म्हणण्याला शास्त्रीय आधारही आहे, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जमिनीची क्षमता कमी होणे. पाऊस न पडल्याने त्या जमिनीचा आम्लयुक्तपणा दिवसेंदिवस वाढत आहे. जमिनीचा ज्‍ यापूर्वी पीक वाढवण्यासाठी वापरलेली सिथेंटिक नायट्रोजनयुक्त खते ही जमिनीतील दर्जेदार यील्ड देण्यासाठी अकार्यक्षम झाली आहेत. पिकाचा दर्जा ढासळेल अशी ही सूचना कृषी तज्ज्ञांना क्लायमेट चेंज रिसर्चरनी दिली आहे. यातून पुन्हा एकदा सिद्ध होईल की पिकलेल्या किंवा पिकवलेल्या धान्यात प्रोटीन, कार्बोहायड्रेट, मिनरल्स नाहीत. त्यामुळे वाढ खुंटेल, लहान मुलांना इन्फेक्शन होतील, कुपोषणही वाढेल, कॅन्सरसारखे आजार वाढतील.

शासनाने जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली या परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी वेळ न दवडता आराखडा बनवावा. हिट स्ट्रोक क्लिनिक्स ग्रामीण भागात शहरी भागात तयार करावी लागतील. या सर्वांची पार्श्वभूमी क्लायमेट चेंजमुळे होणारा एल-निनोचा उत्पात आहे.

याबरोबरच आणखी उत्पात होत आहे ते म्हणजे ओझोनच्या आवरणचे होणारे डिप्लेशन व पोलर व्होर्टेक्स (ध्रुवीय भोवरा) याचा जवळचा संबंध आहे. या ओझोनच्या आवरणाला असलेले छिद्र मोठे झाल्याने हा ध्रुवीय भोवरा तयार होण्यासाठी हिवाळ्यात पोलवर अति थंडी विशेषत: अंटार्क्टिका म्हणजेच साऊथ पोलवर असलेली तीव्र थंडी आणि थंड वारे त्यातून तिथे सूर्यप्रकाश नसल्याने थंडीची तीव्रता वाढते. हे वारे नॉर्थ पोल व साऊथ पोल चक्राकार वेगाने फिरतात. ते १० ते ३० मैल प्रतितास या वेगाने फिरतात. यामध्ये रासायनिक प्रक्रिया होऊन ओझोन आवरण कमकुवत होऊन छिद्र पडते. यामुळे वातावरणात अनेक बदल होतात. सध्या जे बर्फ वितळणे हे तापमान वाढल्यामुळे झपाट्याने होत आहे व सध्या बर्फ पडण्याचे प्रमाण (ICEFALLS) जे कमी झाले आहे त्याला पोलर व्होर्टेक्स ओझोन आवरणाला पोहोचलेली हानी जबाबदार आहे. बर्फबारीऐवजी पाऊस पडलेला दिसतो. १९३९ ते २०२४ या कालावधीत ४८ राज्यात snow fall कमी झालेला दिसतो. ओझोन आवरण जे शरीराला घातक आहे ते या कमजोर क्षीण झालेल्या आवरणातून पृथ्वीवर येऊन माणसाला त्वचाविकार, डोळ्यांचे आजार, कॅटरॅट अंधत्व, यूव्ही रेंजमुळे कॅन्सरसारखा आजार देतात. झाडाच्या वाढीवरही परिणाम करतात. त्यामुळे नजीकच्या काळात मोठे होणारे छिद्र हे जगातील आजारपण व मृत्यू वाढवतील, याचबरोबर टीबीसारख्या संसर्गजन्य आजाराच्या दृष्टीने एल- निनो अतिशय वाईट परिणाम घडवेल. आर्द्रता ६७% ते ८७% पर्यंत जाईल. त्या टीबीचा संसर्ग हा वेगात होईल. एल-निनोच्या प्रभावामुळे तापमानातील चढ - उतारामुळे टीबीच्या केसेस वाढतील, (science Direct) हेही महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेने लक्षात घ्यावे. त्याचबरोबर डेंग्यू, मलेरिया या आजारांनाही एल-निनो व तापमान बदल निमंत्रण देईल. आपल्या सर्वांच्या मनात एक प्रश्न येतो की १२००० किमी दूर असलेल्या भारताला याचा फटका कसा बसतो. ज्यावेळी विषुववृत्तीय भागातील तापमान वाढते तेव्हा साहजिकच ट्रेड विंड्स हे उत्तरेकडे सरकतात. ओझोन आवरण पूर्वपदावर आणण्यासाठी मॉन्ट्रियल येथे झालेल्या क्लायमेट चेंजच्या सभेत अनेक मुद्दे उपस्थित झाले. क्लोरीन ब्रोमिन तसेच हॅड्रोफ्ल्युरो कार्बन नायट्रस ऑक्साईड वायू उत्सर्जित करणारे किंवा तत्सम संयुगे हवेत सोडणारे केमिकल व इतर कारखान्यावर बंदी आणली. २०६० पर्यंत ओझोन लेयर पूर्ववत होईल. असा विश्वास व्यक्त करतात, पण सध्या ओझोन लेयरचे छिद्र मोठे होत आहे. यामुळे संशोधक, हवामानतज्ज्ञ चिंतित आहेत.

या काळात म्हणजेच एल-निनोमुळे पाऊस बेभरवशाचा राहील. पाऊस नसल्याने पिके जळून जातील. जमिनीतील ओलावा संपेल. ती शुष्क होईल, सेंद्रिय पदार्थ संपतील. इतकेच नव्हे, तर मायक्रोब्ज् नष्ट होतील. त्यामुळे जमिनीचा कसदारपणा संपून जाईल. यावर कृषी खात्याने मिलेट्स (तृण धान्य) वर भर द्यावा. कमी पाण्यात कमी कसदार जमिनीत होणारे मिलेट्स हेच पीक तग धरेल. यासाठी व्यापक मोहीम हाती घ्यावी लागेल. महाराष्ट्रात मिलेट्स मिशन ॲक्टिव्हेट करणे गरजेचे आहे. सध्या राज्यात दुष्काळ जाहीर झाला असला तरी आपल्याला पाण्याची समस्या भेडसावत राहील. पिण्याच्या पाण्याचे नियोजन कसे करावे. पाण्याचे नैसर्गिक स्रोत हे आटले आहेत. अगदी गोदावरीला पाणी आटले आहे, तर तिच्या ट्रिब्युटरीजना पाणी कुठे राहणार? कमाल उष्णतेमुळे बाष्पीभवनचा वेग वाढणार आहे. जमिनीतील ओलावा संपला आहे किंवा संपत चालला आहे. तसेच सध्या एल-निनोच्या प्रभावामुळे राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. पण शेतकरी हा हवालदील झाला आहे. त्याला नैराश्याच्या गर्तेतून काढण्यासाठी २०१६-१७ मध्ये राबवलेला प्रेरणा प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. त्याला आर्थिक मदतीबरोबर मानसिकदृष्ट्या उभे करणेही आवश्यक आहे. हा कालावधी मनुष्य जातीसाठी कोविडप्रमाणेच कसोटीचा काळ असेल.

**-डॉ दीपक रा. सावंत**

संवाद

## विजयादशमी: असत्यावर सत्याच्या विजय

पौराणिक कथेनुसार, भगवान श्रीरामांनी १४ वर्षांच्या वनवासात असताना लंकेचा राजा रावणाचा वध करून असत्यावर आणि अधर्मावर विजय मिळवला होता. रावण हा अफाट बुद्धीचा, ज्ञानी आणि महाशिवभक्त होता; परंतु त्याच्या ठायी असलेला अतिअहंकार, पराकोटीचा गर्व आणि परस्त्रीचा अनादर करण्याची प्रवृत्ती त्याच्या विनाशाचे कारण ठरली. या दिवशी प्रभू रामांनी रावणाचा पराभव करून जगात धर्माची स्थापना केली. त्यामुळे हा दिवस केवळ एका युद्धाचा विजय नसून, तो नैतिकतेचा आणि सत्याचा विजय मानला जातो.महाराष्ट्रात रावणाचे पुतळे जाळण्याची प्रथा उत्तर भारताच्या तुलनेत काहीशी वेगळी आहे. येथे या दिवशी ‘सीमलंघन’ केले जाते, शस्त्रांची पूजा केली जाते आणि एकमेकांना आपट्याची पाने (ज्याला आदराने ’सोने’ म्हटले जाते) देऊन स्नेह व आदर व्यक्त केला जातो. हे सोने म्हणजे परस्परांमधील कटुता संपवून प्रेमाचे नाते घट्ट करण्याचे प्रतीक आहे.आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणसा-माणसांमधील आदर कमी होत चालला आहे. अशा वेळी, दसरा आपल्याला केवळ बाह्य रावणालाच नव्हे, तर आपल्यातील स्वार्थी प्रवृत्तीलाही नष्ट करण्याची आठवण करून देतो.

**वर्षा आवदे**

## अमेरिकेतील हिंदू द्वेष

अमेरिकेतील अरोरा येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी (बालाजी ) मंदिरातील हिंदूंची हत्या करण्याचे एक षडयंत्र १९ वर्षीय अलेक्झंड्रोस पापोराकिस यांनी आखले होते. पण हिंदूंना त्यांच्या विरोधात चाललेल्या षडयंत्राची जाणीव झाली. बंदूक अडकल्यामुळे अलेक्झाँड्रोस आक्रमण करू शकला नाही. मंदिरात नवरात्रीसाठी एकत्र आलेले हिंदू देवीच्या कृपेने वाचले. इलिनॉयचा रहिवासी असलेला आणि नुकतेच मिसरुड फुटलेला अलेक्झाड्रोस मागील दोन वर्षापासून सामूहिक हत्याकांड करण्याचे षडयंत्र रचत असल्याची माहिती समोर येत आहे. ११ ऑक्टोबरला तो हिंदूंचे सामूहिक हत्याकांड घडवण्याच्या सिद्धतेनीशी म्हणजेच बंदूकादी शस्त्र हे घेऊनच आला होता. मोठ्या प्रमाणात हिंसाचार घडवून आणण्याची त्याची योजना होती.अमेरिका आणि कॅनडा येथील हिंदूंचे मंदिरे, घरे आणि हिंदू व्यक्ती यांना लक्ष करण्यापासून ते शाळा आणि महाविद्यालय यामधील विद्यार्थ्यांचा वाढता छळ आणि त्यांना धमकावणे अशा घटना वाढलेल्या आहेत. ‘ कॅलिफोर्निया नागरी हक्क विभागा’ च्या वर्ष २०२४ च्या एका अहवालात हिंदू द्वेष हा ज्यू द्वेषा नंतरचा दुसरा क्रमांक असल्याचे दिसून आले आहेत. अमेरिकेतील विविध संघटनांनी हिंदूद्वेषा च्या अनेक घटनांची माहिती दिली आहे. हिंदू द्वेषापायी घडलेल्या घटनांची ज्ञात माहिती पुष्कळ कमी आहे.अलीकडच्या काही वर्षांत डॉनाल्ड ट्रम्प भारतावर कर लादतात,‘एच १ बी’ व्हिसाचे नियम कठोर करतात, भारतीय आस्थापनांना तेथून बेदखल करतात, त्यांच्यावर मोठे अर्थनिर्बंध लादतात, भारतीय वंशाच्या लाखो मतदारांची नावे वगळतात, स्वतः रशियाकडून तेल विकत घेत असतानाही भारतावर आयात शुल्क लावतात, हे सर्व त्याच क्रूसेड चा भाग म्हणावा लागेल.अमेरिकेच्या म्हणजेच ट्रम्प यांच्या अलीकडील मूर्खपणा मागे वर्चस्व टिकवण्याच्या लालसेसह भारताविषयीचा द्वेष आणि म्हणजे बहुसंख्य हिंदूवासियांचा द्वेष कारणीभूत आहे, हे पुसट असलेले चित्रही समजून घ्यायला हवे. अमेरिकेतील कट्टर ख्रिस्त्यांच्या भारतीयांवरील आक्रमणातून व्यक्त होणारा हिंदू द्वेष जाणणे आवश्यक आहे.

**लीना गाडगीळ**

## दोषांचे सीमोल्लंघन करूया !

आपल्यातील ईर्षा, मत्सर, द्वेष आपल्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतात. आपल्यातील स्वार्थ आपल्याला भ्रष्टाचार, अनाचार करण्यास भाग पाडतो. असे एक ना अनेक दोष आपल्या मनात वर्षोनुवर्षे घर करून असतात. जीवनात घडणाऱ्या प्रसंगानुरूप ते उफाळून येतात आणि आपल्याला चुकिचे निर्णय घेण्यास भाग पाडतात. आपल्यातील दोषांचे पोषण करून आणि अहंकाराला खतपाणी घालून आपणच आपल्या सीमा मर्यादित केल्या आहेत. यंदाच्या दसऱ्याला आपणही सीमोल्लंघन करूया. आपल्यातील दोषांचे आणि अहंकाराचे निर्मूलन करण्याचा संकल्प करूया ! इतरांमधील दोष पाहण्याची सवय सोडून देऊन इतरांतील गुण हेरुया आणि ते आपल्यात आत्मसात करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करूया. त्यासाठी भगवंताला प्रार्थना करूया. सर्वगुणसंपन्न केवळ भगवंत आहे. आपल्यातील दोषांचे निर्दालन करून गुणांचे संवर्धन करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे एकप्रकारे भगवंताच्या समीप जाण्यासाठी केलेला प्रयत्नच होय, त्यामुळे या कार्यात भगवंत नक्कीच मदत करेल.

**जगन घाणेकर**

## दुष्ट प्रवृत्तीचा नाश व्हावा

आज एकीकडे स्त्रीशक्तीची पूजा केली जात असताना दुसरीकडे महिलांना पदोपदी दिव्य संकटाला सामोरे जावे लागते. समाजातील वासनांध असुरी लोक स्त्रियांकडे केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहात आहेत. प्रत्येक क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी नेत्रदीपक झेप घेतली असली तरीही त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलताना दिसत नाही. स्त्री-पुरुष समानता हे केवळ नावापुरतेच आहे. अनेक मोठी पदे भूषवत असतानाही या स्त्रीशक्तीची कौटुंबिक आणि सामाजिक हिंसाचारापासून सुटका होऊ नये हे सामाजिक अधोगतीचेच लक्षण आहे. लैंगिक शोषण, एकतर्फी प्रेमप्रकरण आणि हिंस व रानटी प्रवृत्तीच्या लोकांमुळे बळी पडणाऱ्या निर्भयाची प्रकरणे दररोज समोर येत आहेत. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या नुसत्या गप्पाच मारल्या जातात. मात्र, त्यांना स्वतंत्र अधिकार आणि स्वातंत्र्य कितपत दिले जाते,हा संशोधनाचा विषय आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत अजूनही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले आहे. आणि त्यांचे जीवन दुःख, वेदना, समस्या आणि संघर्ष अशा कष्टप्रद घटनांनी भरलेले आहे. सर्व धर्मांमध्ये स्त्रियांचे शोषण एकसारखेच आहे. या कलयुगात स्त्रियांनी चामुंडा देवीचा अवतार घेऊन अन्याय, अत्याचार आणि दुष्ट प्रवृत्तीचा संहार केला पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**

## स्टारलिंकला भारत सरकारचा ब्रेक का?

एलॉन मस्क यांच्या स्टारलिंक या सॅटेलाइट इंटरनेट सेवेला भारतात व्यावसायिक सुरुवात करण्यासाठी भारत सरकारने अद्याप अंतिम मंजुरी दिलेली नाही. स्टारलिंककडे प्राथमिक परवाना असला, तरी सध्याच्या नियमांनुसार त्यांच्या पूर्ण लाँचिंगवर सुरक्षा आणि पायाभूत सुविधांच्या अटींमुळे ब्रेक लागला आहे. भारताच्या गृह मंत्रालयाकडून स्टारलिंकला अद्याप अंतिम सुरक्षा मंजुरी मिळालेली नाही. सॅटेलाइट इंटरनेट थेट अंतराळातून काम करत असल्याने, त्याचा वापर सीमावर्ती भागात किंवा संवेदनशील क्षेत्रांमध्ये देशविरोधी घटकांकडून गैरवापरासाठी केला जाऊ नये, यासाठी सरकार अत्यंत कडक तपासणी करत आहे.

भारताची मागणी आहे की, आणीबाणीच्या किंवा सुरक्षेच्या कारणास्तव सरकारला भारतात सॅटेलाइट इंटरनेट सेवा तात्काळ बंद करण्याचा अधिकार असावा. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान मस्क यांनी युक्रेनमधील स्टारलिंक सेवा स्वतःच्या नियंत्रणात ठेवली होती. भारताला अशी कोणतीही परदेशी मक्तेदारी नको आहे; भारताचे नियंत्रण भारतीय यंत्रणांच्या हातात असावे, अशी सरकारची अट आहे. भारतीय कायद्यानुसार, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत किंवा सुरक्षेचा धोका निर्माण झाल्यास सरकारला इंटरनेट सेवा तात्पुरती बंद करण्याचा अधिकार असावा लागतो. स्टारलिंकने भारतामध्ये स्थानिक बेस स्टेशन उभारण्यास पूर्णपणे सहमती दर्शवणे आवश्यक आहे, जेणेकरून भारतीय यंत्रणांना कायदेशीर देखरेख ठेवता येईल.नुकतेच इलॉन मस्क यांनी सोशल मीडियावर आरोप केला होता की, भारतातील ’काही बड्या उद्योगपतींच्या मक्तेदारीमुळे’ स्टारलिंकला अडवले जात आहे. यावर रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेलने कायद्याचे पालन करून कोणत्याही स्पर्धेचे स्वागत असल्याचे म्हटले आहे. तर भारत सरकारने मस्क यांचे आरोप फेटाळून लावत आपली नियमप्रक्रिया सर्वांसाठी समान आणि निःपक्षपाती असल्याचे स्पष्ट केले आहे.

**-प्रा डॉ सुधीर अग्रवाल,**
वर्धा -९५६१५९४३०६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# आष्टा रामपूर रेती घाटावर प्रशासनाचा सर्जिकल स्ट्राइक..!

## पाच बोटी जप्त



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १९ :** बाभूळगाव क्षेत्रातील आष्टा रामपूर येथील रेतीघाटावर अवैध रेती उपशाविरोधात महसूल व पोलीस विभागाच्या पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत रेती उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन मोठ्या व तीन लहान अशा एकूण पाच बोटी पकडण्यात आल्या.

त्यापैकी तीन बोटी ब्लास्ट करून नष्ट करण्यात आल्या, तर उर्वरित दोन बोटी वर्धा महसूल विभागाच्या स्वाधीन करण्यात आल्याचे समजते . या बोटींची एकूण किंमत जवळपास १५ लाख रुपयेच्या वर असल्याची माहिती समोर आली आहे. आष्टा रामपूर येथील रेतीघाटावर मागील दोन दिवसांपासून बोटींच्या सहाय्याने रेती उपसा सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. रात्रीच्या वेळी रेती उपसा करून संबंधित बोटी नदीकाठावर आणून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर महसूल व पोलीस विभागाने संयुक्त कारवाईचे नियोजन केले. सकाळी साडेनऊपासून कारवाईला सुरुवात सोमवारी (दि. १९) सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास तहसील व पोलीस विभागाच्या पथकाने रेतीघाटावर धडक देत कारवाई सुरू केली. बोटी ताब्यात घेण्यासह त्यांच्यावर पुढील कारवाईची प्रक्रिया हाती घेण्यात आली. ही कारवाई सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू होती. या कारवाईमुळे रेती उपसा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. महसूल, पोलीस आणि NDRF पथकाचा सहभाग या संयुक्त कारवाईत तहसीलदार मीरा पागोरे, नायब तहसीलदार बदकी, बाभूळगावच्या ठाणेदार दीपमाला भेंडे, खनिकर्म विभागाचे अधिकारी, एनडीआरएफचे अधिकारी, तसेच पुलगावचे मंडळ अधिकारी व नायब तहसीलदार सहभागी झाले होते.

# गांजाच्या लागवडीवर मोठी कारवाई ५८ लाखांचा मुद्देमाल जप्त,तिघांना अटक..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १९ :** पांढरकवडा पोलिसांनी अंमली पदार्थ गांजाच्या अवैध लागवडीविरोधात मोठी कारवाई करत तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत एकूण ११९.१६५ किलो गांजा आणि मुळे व खोड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण बाजारमूल्य किंमत ५८ लाख २९० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी तीन आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत गांजाच्या लागवडीबाबत खात्रीलायक माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दही तांडा व सिरा परिसरात छापे टाकून गांजाची लागवड उघडकीस आणली. तीन ठिकाणी गांजाची लागवड उघड या कारवाईत दही तांडा येथील भिकू सुर्या



चव्हाण (वय ४७) याच्या घराजवळील परिसरातून व शेतातून गांजाची झाडे जप्त करण्यात आली. या मुद्देमालाची किंमत सुमारे ९ लाख १८ हजार ५०० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सिरा येथील प्रतापसिंग उर्फ पल्या राठोड (वय ४०) याच्या शेतातून गांजाची फुले व पाने तसेच मुळे आणि खोड जप्त करण्यात आले. या मुद्देमालाची किंमत सुमारे ९ लाख २८ हजार रुपये असल्याची माहिती आहे. तिसऱ्या कारवाईत सिरा येथील सुदाम जैलू रामपुरे (वय ६०) याच्या शेतातून गांजाची मोठी मात्रा आढळून आली. या ठिकाणाहून जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ५४ लाख ४२ हजार ७५० रुपये असल्याचे पोलिसांनी दिलेल्या माहितीत नमूद आहे. तिन्ही कारवायांमध्ये एकूण ११९.१६५ किलो गांजा आणि मुळे व खोड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचे एकत्रित बाजारमूल्य ५८ लाख २९० रुपये असल्याचे सांगण्यात आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि पांढरकवड्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजेश कुमार गाठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावडे, सहायक पोलीस निरीक्षक रमाकांत खांडरे, पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल कावरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद जुनूनकर, जमादार विलास जाधव, रविकांत दराडे, राजू टेकाम , सुनील राठोड,सचिन काकडे, राजू मुतय्यालवार व अमोल भोकरे यांच्यासह पोलीस कर्मचारी या कारवाईत सहभागी होते

# बच्चू कडू यांची विजय बाबू चोरडिया यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट.

## अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांवर आंदोलनाचा निर्धार



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १९ :** वेकोलि (WCL) च्या कथित अन्यायाविरोधात आवाज बुलंद करण्यासाठी साखरा (कोलगाव), पैनगंगा परिसरात आयोजित आंदोलनाकडे जात असताना शिवसेना नेते आमदार बच्चू कडू यांचे रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) वणी येथे स्वागत करण्यात आले.

वणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसैनिकांनी बच्चू कडू यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा दानशूर व्यक्तिमत्त्व विजय बाबू चोरडिया यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. वेकोलिमुळे निर्माण झालेल्या कथित अन्यायाचे प्रश्न, स्थानिक शेतकऱ्यांच्या अडचणी, कामगारांचे प्रश्न आणि अन्यायग्रस्त नागरिकांच्या मागण्या यांना न्याय मिळावा, या उद्देशाने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. विकासाच्या नावाखाली स्थानिक नागरिकांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर या आंदोलनाला महत्त्व प्राप्त झाले. वेकोलिविरोधातील संघर्षातून स्थानिकांच्या प्रश्नांना न्याय मिळणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात



### महागावमध्ये शारदा देवी मंडळाचा उपक्रम !

**पाणी वाचवा, झाडे लावा, भविष्य वाचवा चा दिला संदेश**

**महागाव :** येथील प्रभाग क्रमांक ७,८, व ९ मधील महिलांनी एकत्र येऊन मागील तीन दशकांपूर्वी शारदा देवी मंडळाची स्थापना केली,दरवर्षी मनोभावे शारदा देवीची स्थापना करून, समाज उपयोगी विविध उपक्रम राबविले जातात यावर्षी महाराष्ट्रात अत्यल्प पाऊस झाल्याने दुष्काळाच्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. याच पार्श्वभूमीवर महागाव येथील या शारदा महिला मंडळाच्या महिलांनी व चिमुकल्या मुलींनी दि. १६ ऑक्टोंबर रोजी महागाव शहरात पाण्याचे महत्त्व अधोरेखित करत, आम्ही लहान आहोत पण आमची विनंती मोठी आहे,आमच्या भविष्यासाठी, पाणी वाचवा,भविष्य वाचवा,च्या आशयाचे फलक हातात घेऊन जनजागृती संदेश दिंडीच्या माध्यमातून शहरातील मुख्य चौकाचौकातून रॅली काढून, पाण्याच्या थेंबा थेंबात जीवन आहे व पाणी जगण्यासाठी महत्वाचे आहे.करीत प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावून,पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाण्याची बचत करून येणाऱ्या भविष्यकाळात शहरातील सर्व लोकांना पाणी मिळाले पाहिजेत असे विनंती पुरक आवाहन केले. या रॅलीत शारदा देवी महिला मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,व सर्व सदस्य आणि अनेक महिला उपस्थित होत्या.

### नगराध्यक्ष आतिष बोरेले यांच्या हस्ते रजनीकांत बोरेले यांचा सत्कार..!



**पांढरकवडा :** येथील किरण फॅक्टरीच्या भव्य पटांगणात आयोजित माँ जगदंबा गरबा उत्सवाला हजारो रसिकांनी हजेरी लावत उत्साहाची रंगत वाढवली. या सोहळ्यात नगराध्यक्ष तथा उत्सवाचे आयोजक आतिष लक्ष्मणजी बोरेले यांच्या हस्ते प्रख्यात व्हिसल ब्लोअर व जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा शेला व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अक्षय पीपलवा, वसंता भोंग, जीतू चौधरी आणि मनीष रामगीरवार यांनी त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला सौ. प्रिया राजू तोडसाम, गजानन बैजंकीवार, किशोर देशट्टीवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गरबा स्पर्धेतील स्पर्धकांनी आकर्षक नृत्याविष्कार सादर करत रसिकांची मने जिंकली. विशेषतः मणियाराची कलाकृती लक्षवेधी ठरली. गुजरातमधील गरबा उत्सवाची अनुभूती देणारे वातावरण निर्माण झाल्याची भावना रजनीकांत बोरेले यांनी व्यक्त केली. भव्य मंडप, आकर्षक रोषणाई, ध्वनियंत्रणा, खाद्यपदार्थ व शीतपेयांची व्यवस्था यामुळे उत्सवाला विशेष झळाळी मिळाली. सौ. खुशी आतिष बोरेले यांनी व्यवस्थेची पाहणी करत आयोजनावर लक्ष ठेवले. महिलांची लक्षणीय उपस्थिती हे उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

### आधुनिक शिक्षणासोबत संस्कारांची शिदोरीही द्या!

**आमदार मुफ्ती इस्माईल कासमी यांचे पालकांना आवाहन**



**उमरखेड:** केवळ आधुनिक शिक्षणाने समाजाची सर्वांगीण प्रगती साधता येत नाही, तर शिक्षणासोबत संस्कार, नैतिक मूल्ये आणि धार्मिक शिकवणींची जोडही आवश्यक आहे. पालकांनी मुलांना आधुनिक शिक्षणासोबत संस्कारक्षम शिक्षण देण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन आमदार मुफ्ती मुहम्मद इस्माईल कासमी यांनी केले. स्थानिक एम. के. मंगल कार्यालयात आयोजित 'इस्लाह-ए-मआशरा' समाज सुधारणा सभा आणि भव्य बक्षीस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कुरआन व हदीसच्या शिकवणींचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी सामाजिक ऐक्य मजबूत करण्याचे, मशिदींच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे आणि शिक्षणव्यवस्था बळकट करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात कुरआन पठणाने झाली. हाफिज खलील यांनी नाअत-ए-पाक सादर केली. कुरआनवर आधारित परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. हाफिज अन्सार हुसैनी यांनी अध्यक्षस्थान भूषविले. मुफ्ती अब्दुल अझीझ रहमानी यांनी सूत्रसंचालन केले. भावपूर्ण दुआने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी परिसरातील नागरिक व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नवोदय विद्यालय प्रवेश अर्ज भरण्यासाठी २२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**यवतमाळ :** जवाहर नवोदय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता इयत्ता ९ वी व ११ वीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत २२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. इयत्ता ९ वी व ११ वी ची प्रवेश परीक्षा १० एप्रिल २०२७ रोजी होणार आहे.इयत्ता ९ वीच्या प्रवेशासाठी https://cbseitms.nic.in/२०२६/nvsix_९/ या संकेतस्थळावर, तर इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी https://cbseitms.nic.in/२०२६/nvsxi_११/ या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरता येणार आहेत. हे अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत.विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन अर्जांमध्ये ग्रामीण व शहरी, जात, अपंगत्व आणि लिंग यासंबंधी दुरुस्ती करण्यासाठी २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत तीन दिवस दुरुस्ती विंडो उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळांना भेट द्यावी किंवा प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, बेलोरा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दुष्काळाचा दुहेरी फटका, पुसदचे तांडे ओस, रोजगारासाठी मजुरांचे पलायन!

## रब्बी हंगामावर टांगती तलवार,स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणही धोक्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १९ :** दुष्काळी परिस्थिती, स्थानिक रोजगाराचा अभाव आणि सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे पुसद तालुक्यातील हजारो मजुरांवर गाव सोडण्याची वेळ आली आहे.

ऊसतोडणी, विटभट्ट्या आणि महानगरांतील बांधकामांवर कामासाठी मजूर कुटुंबांसह स्थलांतरित होत असल्याने तांडे-वाड्या ओस पडू लागल्या आहेत. यंदा ऑक्टोबरच्या प्रारंभीच ऊसतोडणी हंगाम सुरू झाल्याने मजुरांचे स्थलांतरही लवकर झाले. तालुक्यातील सुमारे सातशे एकर क्षेत्रावरील एमआयडीसीमध्ये मोजकेच उद्योग सुरू असल्याने स्थानिकांना बारमाही रोजगार मिळत नाही. शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योगांचा अभावही रोजगारनिर्मितीला अडथळा ठरत आहे. परिणामी,



रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतराची किंमत मजुरांच्या मुलांना शिक्षणाच्या रूपाने मोजावी लागत आहे. पुसद तालुक्यात सामान्य परिस्थितीत सुमारे १७ हजार २३८ हेक्टर क्षेत्रावर गहू, हरभरा, ऊस व भाजीपाला लागवड होते. मात्र, पावसातील खंडामुळे भूजलपातळी खालावली असून अनेक तलाव, नाले आणि नदीपात्रे कोरडी पडली आहेत. त्यामुळे रब्बीचे क्षेत्र घटण्याची भीती असून सिंचनाची सोय असलेले शेतकरीही पेरणीबाबत संभ्रमात आहेत. ऊस लागवड घटल्यास आगामी गाळप हंगामावरही परिणाम होऊ शकतो.

### विद्यार्थ्यांचे भविष्य कोण सांभाळणार?

**मजुरांसोबत मुलेही स्थलांतरित होत असल्याने जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. हंगामी वसतिगृहांची व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याची गरज आहे. दुसरीकडे, प्रक्रिया उद्योग, बारमाही सिंचन आणि सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्याची मागणी जोर धरत आहे. दुष्काळावर तात्पुरत्या उपायांपलीकडे जाऊन रोजगार व शिक्षणाची शाश्वत व्यवस्था उभी करण्याचे आव्हान प्रशासन आणि लोकप्रतिनिधींसमोर आहे.**

# शिक्षकांच्या मतदानाच्या अधिकारावर राजकीय हस्तक्षेपाचे सावट!

## संगीता शिंदे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे शिक्षकांना आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात राजकीय पक्षांकडून होणारे हस्तक्षेपाचे राजकारण शिक्षकांच्या स्वतंत्र प्रतिनिधित्वासाठी धोकादायक असल्याचा घणाघात माजी शिक्षक आमदार नागोजी गाणार यांनी केला. शिक्षक मतदारसंघ हा शिक्षकांच्या लोकशाही सहभागाचा महत्त्वाचा मंच असून, त्याचे राजकीय स्वार्थासाठी होणारे राजकारण थांबले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षण संघर्ष संघटनेच्या अधिकृत उमेदवार प्रा. डॉ. संगीता सचिंद्र शिंदे (बोंडे) यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. रविवार, १८ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथील उत्सव मंगल कार्यालयात आयोजित जिल्हा शिक्षक मेळावा व



प्रचारसभेत ते बोलत होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी नागोजी गाणार होते. उमेदवार प्रा. डॉ. संगीता शिंदे यांनी मागील १६ वर्षांपासून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यापूर्वी झालेल्या मतदानातील चुका पुन्हा न करता यावेळी संधी दिल्यास शिक्षकांना निराश करणार नाही, अशी ग्वाही देत त्यांनी समर्थनाचे आवाहन केले. प्रास्ताविकात राजेश मदने यांनी शिक्षकांचा प्रतिनिधी शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेलाच असावा, अशी भूमिका मांडली. मेळाव्याला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या राज्य महिला अध्यक्षा पुष्पाताई चौधरी, प्रशांत लांडे, राजेश खोडे, शुभांगी आवारी, धनंजय पांडे, कृपा पटेल, सचिन देशपांडे, यू. पी. इंगोले, कामनाथ यादव, ललिता हुलमारे, भाऊराव शिंदे, उदय कानतोडे, बंडू भाऊ कदम, गुल्हाने सर आणि संगीता डांगे यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संतोष पवार यांनी केले, तर विनोद चिरडे यांनी आभार मानले. मेळाव्याला जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षिका व हितचिंतकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**शिक्षकांनी चुकीच्या आश्वासनांना बळी पडू नये!**

शिक्षण क्षेत्रात राजकीय पक्षांचे वाढते राजकारण म्हणजे शिक्षकांच्या स्वतंत्र मतदानाच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न असल्याचे गाणार म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने दिलेल्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी शिक्षकांनी जागरूक राहावे आणि कोणत्याही चुकीच्या आश्वासनांना बळी न पडता योग्य प्रतिनिधी निवडावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

# उपमुख्यमंत्र्याची दुर्गामहोत्सवात हजेरी, शिवराय मंडळात जगदंबेचे दर्शन

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रयत्नांतून योग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** शहरातील वैभवी नवरात्रोत्सवात रविवारी, १८ ऑक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीने विशेष रंगत आली. दारव्हा नाका परिसरातील शिवराय दुर्गा उत्सव मंडळाला त्यांनी सदिच्छा भेट देत आई जगदंबेचे दर्शन घेतले. यवतमाळच्या दुर्गा उत्सव मंडळाला राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी भेट देण्याची ही पहिलीच घटना असल्याचा दावा मंडळाच्या वतीने करण्यात आला.

त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रयत्नांतून शिंदे यांची ही भेट निश्चित झाल्याचे सांगण्यात आले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी पालकमंत्री संजय राठोड, खासदार



### पालकमंत्र्यांकडून विविध मंडळांना भेटी

**पालकमंत्री संजय राठोड यांनी शिवराय, मातोश्री, जय हिंद आणि हिंदुस्तानी दुर्गा उत्सव मंडळांसह शहरातील विविध मंडळांना भेटी देऊन आई जगदंबेचे दर्शन घेतले. त्यांच्या भेटींमुळे मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.**

संजय देशमुख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, यवतमाळचा नवरात्रोत्सव भव्य सजावट, ढोल-ताशांचा गजर आणि देवीच्या जयघोषामुळे दरवर्षी लक्षवेधी ठरतो. यंदा उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीमुळे उत्सवाला राज्यस्तरीय महत्त्व प्राप्त झाल्याची चर्चा आहे.

# अडेगाव खाण प्रकल्पाला ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद, विकासासोबत पर्यावरण रक्षणाचीही कसोटी!

## ७२.१६ हेक्टर क्षेत्रात वार्षिक २.१५ दशलक्ष टन उत्पादनाचे नियोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामणी, दि. १९ :** प्रस्तावित खाण प्रकल्पातून स्थानिकांना रोजगार, गावांना पायाभूत सुविधा आणि परिसराला विकासाची संधी मिळणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

याच पार्श्वभूमीवर अडेगाव येथे १६ ऑक्टोबर रोजी आयोजित डोलोमाइट व चुनखडी खाण समूहाच्या पर्यावरणीय जनसुनावणीत स्थानिक रोजगार, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संरक्षणाचे मुद्दे ठळकपणे मांडण्यात आले. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अडेगाव खाण मालक संघटनेच्या गट क्र. ६२८ अंतर्गत प्रस्तावित या खाण समूहाचे क्षेत्रफळ ७२.१६ हेक्टर असून, वार्षिक उत्पादन



क्षमता २.१५ दशलक्ष टन आहे. यात जिग्सन माईन अँड मिनरल्स (२४.८७ हेक्टर), मर्लिन मिनरल्स (१०.५६), फासिविस्वनाथम फोचा (७.४७), जगती मायनिंग कंपनी प्रा. लि. (१९.९६) आणि तिरुपती मिनरल्स (९.३० हेक्टर) यांचा समावेश आहे. जनसुनावणीत प्रकल्पाचे सादरीकरण करताना धूळ व ध्वनी नियंत्रण, जलसंधारण, वृक्षारोपण, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) गावविकास करण्याबाबत माहिती देण्यात आली. मात्र, ग्रामस्थांनी केवळ आश्वासनांवर न थांबता स्थानिक पात्र युवकांना रोजगारात प्राधान्य, रस्त्यांचा विकास, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि मूलभूत सुविधांसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली. खाणकामामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य परिणाम रोखण्याची अपेक्षाही व्यक्त झाली. यावर क्लस्टर अध्यक्ष राजकुमार अग्रवाल यांनी ग्रामस्थांच्या सूचना व मागण्यांचा शासनाच्या नियमांनुसार विचार केला जाईल, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल आणि सीएसआर मधून गावविकासा साठी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली. जिल्हा प्रशासन, महसूल व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आता या जनसुनावणीत दिलेली आश्वासने प्रत्यक्षात किती उतरतात आणि विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण कितपत होते, यावरच प्रकल्पाची विश्वासार्हता ठरणार आहे.

# शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात, मुख्यमंत्र्यांनी तरी दिवाळी साजरी करावी!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉ.नीरज वाघमारे कडून पाच हजारांची मनीऑर्डर..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** अतिवृष्टी, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची वेळ आली असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तरी दिवाळी साजरी करावी, असा उपरोधिक टोला लगावत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा यवतमाळ नगरपरिषदेचे गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांनी मुख्यमंत्र्यांना पाच हजार रुपयांची मनीऑर्डर पाठवली.

या अनोख्या प्रतीकात्मक आंदोलनातून त्यांनी सरकारच्या शेतकरी धोरणांवर निशाणा साधला. सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.४५ वाजता यवतमाळ मुख्य टपाल कार्यालयातून



मुख्यमंत्र्यांच्या नागपूर येथील पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक मनीऑर्डर पाठविण्यात आली. पाच हजार रुपये आणि २५० रुपये कमिशन असे एकूण ५,२५० रुपये यासाठी अदा करण्यात आले. व्यवहाराची अधिकृत टपाल पावतीही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्राचा पोशिंदा आर्थिक संकटात असताना त्याच्या घरात दिवाळीचा दिवा पेटेल की नाही, याची शाश्वती नाही. शेतकरी कर्जाच्या ओझ्या खाली दबला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या दिवाळीत पैशांची कमतरता पडू नये म्हणून ही रक्कम पाठवली," अशी उपरोधिक प्रतिक्रिया डॉ. वाघमारे यांनी दिली. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे, तातडीची नुकसानभरपाई, कर्जमुक्ती आणि आर्थिक मदतीबाबत सरकारने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या घरात अंधार आणि सत्ताधाऱ्यांच्या घरात रोषणाई, ही कसली लोकशाही? असा सवाल उपस्थित करत ही मनीऑर्डर आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या वेदना सरकारपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बळीराजाच्या घरात दिवा पेटल्या शिवाय महाराष्ट्राची दिवाळी खऱ्या अर्थाने उजळणार नाही, हा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

# गरब्यातून नारीशक्तीचा जागर, संस्कृतीसोबत आत्मविश्वासाचाही हुंकार!

## ५५ पुरस्कारांची लयलूट, सोन्याच्या नथी ठरल्या आकर्षण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** पारंपरिक गरब्याचा ताल, रंगीबेरंगी वेशभूषा आणि देवीच्या विविध रूपांत सजलेल्या महिलांचा उत्स्फूर्त सहभाग अशा उत्साहपूर्ण वातावरणात यवतमाळात भाजप महिला मोर्चातर्फे आयोजित 'नारीशक्ती गरबा महोत्सव २०२६' दिमाखात पार पडला.

या महोत्सवातून भक्ती, संस्कृती, महिलांचा आत्मविश्वास आणि संघटित नारीशक्तीचा प्रभावी आविष्कार पाहायला मिळाला. सुमारे एक हजार महिलांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'महाकाली, माँ दुर्गा आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या विविध रूपांत सजलेल्या महिलांनी गरब्याच्या



सादरीकरणातून भक्ती, संस्कृती आणि नारीशक्तीचा सुंदर संगम घडवून आणला,' असे प्रतिपादन गोदावरी अर्बनच्या अध्यक्ष राजश्री हेमंत पाटील यांनी केले. नगरसेविका तथा भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापूरे यांच्या नेतृत्वात आयोजित या महोत्सवात त्या बोलत होत्या. महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्यासोबतच त्यांच्या सर्जनशीलतेला आणि एकजुटीला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम ठरला. विविध महिला गटांच्या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. माजी मंत्री मदन येरावार, भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान, नगराध्यक्ष अॅड. प्रियदर्शनी उईके, डॉ. प्रकाश नंदूरकर, लीना नंदूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गरबा स्पर्धेत दुर्गाशक्ती गटाने प्रथम, महागौरी गटाने द्वितीय, चेरी गटाने तृतीय, तर सिंचन नगर गटाने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. स्पर्धेत ३१ पैठण्या, ११ सोन्या-चांदीच्या नथींसह बेस्ट परफॉर्मर, बेस्ट कॉस्ट्यूम आणि बेस्ट मेकअप अशा विविध श्रेणींमध्ये एकूण ५५ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सोन्याच्या नथी आणि आकर्षक बक्षिसांमुळे महिलांच्या उत्साहात भर पडली.

# सौंदर्यात भर घालण्यासाठी लावण्यात आलेली झाडे कोमेजली !

## पाण्याविना दुभाजकांवर काटेरी झुडपांचे साम्राज्य



**अमरावती/ का.प्र.**

शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी रस्त्यांच्या दुभाजकांवर लावण्यात आलेली झाडे पाण्याअभावी कोमेजू लागली आहेत. एकीकडे शहरात दुष्काळजन्य परिस्थितीचे सावट असताना दुसरीकडे दुभाजकांवरील हिरवाई टिकविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी झाडांची वाढ खुंटली असून, त्यांच्या जागी काटेरी झुडुपे वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्गीकरणासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांवर पाणी फेरले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या झाडांना नवसंजीवनी देण्यासाठी महापालिका प्रशासन काय उपाययोजना करणार, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

शहरातील राजकमल चौकापासून बडनेराकडे जाणाऱ्या मार्गावरील दुभाजकांवर सौंदर्याकरणाच्या उद्देशाने मेहंदीसह विविध प्रकारची झाडे लावण्यात आली आहेत. मात्र, सध्या पाण्याअभावी या झाडांची अवस्था बिकट होत चालली आहे. अनेक झाडांची पाने सुकू लागली असून, काही झाडे अक्षरशः मान टाकू लागली आहेत. दुभाजकांवर वाढलेल्या काटेरी झुडुपांमुळेही या परिसराचे सौंदर्य कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

रस्त्यांच्या दुभाजकांवरील झाडे केवळ शोभेसाठी नसून, शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठीही महत्त्वाची आहेत. मात्र, झाडे लावल्यानंतर त्यांची नियमित देखभाल आणि पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. विशेषतः उन्हाचा तडाखा आणि पाण्याची टंचाई जाणवत असताना या झाडांना पुरेसे पाणी मिळणे गरजेचे आहे. अन्यथा, नव्याने केलेले सौंदर्गीकरण टिकविणे कठीण होऊ शकते.

# महावितरणचा व्हॉट्सअॅप नंबर केवळ देखावा?

**अंजनगाव सुर्जी / वार्ताहर**

खराब ट्रान्सफॉर्मर तात्काळ बदलण्यासाठी महावितरण कंपनीने अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी ७८७५३९०२२३ हा व्हॉट्सअॅप नंबर सार्वजनिक केला होता. मात्र, हा नंबर नागरिकांच्या समाधानासाठी होता की केवळ दिशाभूल करण्यासाठी, असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

शहरातील साईधाम नगरात गेल्या दोन वर्षांपासून ट्रान्सफॉर्मरमधून कमी दाबाचा वीजपुरवठा होत आहे. व्होल्टेज कमी-जास्त होत असल्याने अनेक घरांमधील फ्रीज, टीव्ही, पंखे, मोटर अशी वीज उपकरणे जळून खाक होत आहेत. यामुळे नागरिकांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

यावाबत साईधाम नगरातील नागरिकांनी अनेक वेळा येथील




### तक्रार करूनही दखल नाही

वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात लेखी व तोंडी तक्रारी दिल्या. मात्र, दोन वर्षे उलटूनही ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती अथवा तो बदलण्यात आला नाही.अखेर वैतागलेल्या एका ग्राहकाने महावितरणने सार्वजनिक केलेल्या ७८७५३९०२२३ या व्हॉट्सअॅप नंबरवर आपली तक्रार फोटो व तपशीलासह पाठवली. मात्र, आठ ते दहा दिवस उलटूनही या तक्रारीची कोणतीही दखल घेतली गेली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तक्रारीला ना उत्तर मिळाले, ना जागेवर पाहणी झाली.

त्यामुळे महावितरण कंपनीने प्रसिद्धीसाठी जाहीर केलेल्या या नंबरचा देखावा आता उघड झाला असून, कंपनी नागरिकांची केवळ दिशाभूल करत असल्याचा आरोप होत आहे.

महावितरणच्या या दुर्लक्षी कारभारामुळे साईधाम नगरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, तात्काळ ट्रान्सफॉर्मर बदलून सुरळीत वीजपुरवठा सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# संक्षिप्त

## एक दिवसीय राज्यस्तरीय संगीत कार्यशाळा

**अमरावती-** अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथे संगीत विभागाद्वारे एकदिवसीय राज्यस्तरीय संगीत कार्यशाळा आयोजिन करण्यात आलेली आहे.संगीत कला शिकणारे विद्यार्थी एक कलावंत म्हणून पुढे आले पाहिजे हा विचार पुढे ठेवून महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथील संगीत विभागाद्वारे 'रियाजाचे तंत्र' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. ही कार्यशाळा २८ ऑक्टोबर २०२६ रोजी संपन्न होणार आहे. या कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध गायक, सन्माननीय पं. संजयजी पत्की (जळगाव) हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत .तरी शिक्षक,विद्यार्थी, कलावंत ,गायक यांनी या संधीचा लाभ घेऊन या कार्यशाळेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ मीनल भोंडे तसेच संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ.जगन्नाथ इंगोले ,प्रा. डॉ.गजानन काळे, प्रा. डॉ.सोनाली आसरकर व प्रा. अमोल वाडवे यांनी केले आहे. या कार्यशाळेत सहभागासाठी शुल्क विद्यार्थ्यांसाठी फक्त रु.४००/ व शिक्षकांसाठी रु.८००/ ठेवण्यात आलेले आहे.सम्पूर्ण दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल. कार्यशाळेत सहभागासाठी संपर्क नंबर - ७०२०७०२४४२,९९६००९६०९५,८६००१२०६९४.

## विद्यापीठ वेटलिफ्टिंग (पुरूष) स्पर्धेकरिता संघ घोषित

**अमरावती-** संकलचंद पटेल युनिर्व्हसिटी, विसनगर (गुजरात) येथे ३० ते ३१ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ वेटलिफ्टग (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये कला व विज्ञान महाविद्यालय, कु-हा चा अनुराग मौर्य, आदित्य चव्हाण व सैफ अली, श्री आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा रोशन तायडे, जनता कला व वाणिज्य महाविद्यालय, मलकापूरचा गौरव कुरवाडे, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाचा अथर्व मिश्रा, श्री विठ्ठल रुख्मिणी महाविद्यालय, सावनाचा योगेश धाड व फैजान खान, नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेराचा साहिल तायडे आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अकोटचा आकाश इंजळीकर याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा संकुल येथे दि. २१ ते २७ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## २१ व २२ ऑक्टोबरला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी

**अचलपूर-** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासह प्रोत्साहन संशोधनवृत्तीला देण्यासाठी आणि विज्ञानातील नवनवीन संकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हरम येथे येत्या २१ व २२ ऑक्टोबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण विभाग, पंचायतसमिती अचलपूर, तालुका विज्ञान अध्यापक मंडळ अचलपूर आणि तालुका मुख्याध्यापक संघ अचलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हापरिषद उच्च प्राथमिक आदर्श शाळा, हरम येथे ही दोन दिवसीय प्रदर्शनी पार पडणार आहे.प्रदर्शनीमध्ये सर्व माध्यमांच्या इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. पंचायत समिती अचलपूरचे गटशिक्षणाधिकारी मयूर यादव यांनी इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या सर्व शाळांनी या विज्ञान प्रदर्शनीत सहभागी होणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे. विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी शाळांनी आवश्यक तयारी करून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तालुका विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## वेणूबाई खडसे यांचे निधन

**लेहेगाव/ वार्ताहर**



नजीकच्या धामणगाव(काटपूर) येथील प्रतिष्ठित नागरिक साहेबरावजी खडसे यांच्या मातोश्री श्रीमती वेणूबाई रामरावजी खडसे यांचे वयाचे ९४ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांचे मागे दोन मुले,मुली नातवंड असा मोठा आप्त परिवार होता त्यांचा अंत्यविधी धामणगाव ( काटपूर) येथील हिंदू स्मशानभूमीत पार पडला त्यावेळी गणमान्य नागरिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळाच्या छायेतही विजयादशमीचा उत्साह!

## बाजारपेठेत झेंडूच्या रंगीबेरंगी फुलांची रेलचेल

**दर्यापूर/ वार्ताहर**

यंदा महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असतानाही भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यासाठी नागरिक विजयादशमीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याच्या तयारीत आहेत. विजयादश मीच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर शहरातील बाजारपेठेत झेंडूच्या विविध रंगांच्या फुलांची आवक वाढली असून, रंगीबेरंगी फुलांनी बाजारपेठ गजबजून गेली आहे.आज नवमी आणि उद्या विजयादशमी असल्याने शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये झेंडूच्या फुलांची विक्री करण्यासाठी विक्रेत्यांनी दुकाने थाटली आहेत. पिवळ्या, केशरी आणि इतर आकर्षक रंगांच्या झेंडूच्या फुलांनी बाजारपेठेला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले आहे. घरांची सजावट, देवपूजा, तोरणे तसेच वाहनांच्या पूजेसाठी झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व असल्याने नागरिकांकडून फुलांची खरेदी केली जात आहे.दुष्काळामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करीत असले, तरी सण-उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. विजयादशमी हा मांगल्याचा आणि विजयाचा सण असल्याने नागरिक साधेपणाने का होईना, पण पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा करण्यास प्राधान्य देत आहेत.

# निधीअभावी जलयुक्त शिवारातील कामे

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यात भूजल पातळी वाढविण्यासाठी महत्त्वाच्या जलयुक्त शिवार अभियानालाच निधीची प्रतीक्षा करावी लागत आहे. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील तब्बल १ हजार ३५८ कामे निधीअभावी रखडली असून, या कामांसाठी सुमारे २४५.२८ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. शासनाने नियतव्ययाला मंजुरी दिली असली तरी प्रत्यक्ष निधी उपलब्ध न झाल्याने कार्यारंभ आदेशानंतरही अनेक कामांना सुरुवात झालेली नाही.

जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण ३ हजार ४२५ कामांचा आराखडा तयार करण्यात आला. यापैकी १ हजार ७४५ कामे विशेष निधीतून, तर १ हजार ६८० कामे अभिसरणातून प्रस्तावित करण्यात आली होती. या सर्व कामांसाठी सुमारे ३४० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नाला खोलीकरण, गाळ काढणे, रिचार्ज शाफ्ट उभारणे, बंधारे बांधणे, विहीर पुनर्भरण, तलाव दुरुस्ती आदी जलसंधारणाची कामे या अभियानात प्रस्तावित आहेत. आतापर्यंत एकूण २ हजार ६७ कामे पूर्ण झाली आहेत. मात्र उर्वरित कामांसाठी निधी उपलब्ध न झाल्याने ती प्रलंबित आहेत. विशेष निधीतील १ हजार ७४५ कामांपैकी गेल्या तीन वर्षांत केवळ ३८७ कामे पूर्ण झाली आहेत. त्यासाठी आतापर्यंत ९४.७२ कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. यामध्ये विशेष योजनेतील सुमारे ६२ कोटी, तर अभिसरणातील कामांसाठी संबंधित विभागांना मिळालेल्या ३२.७२ कोटी रुपयांचा समावेश आहे.

जलयुक्त शिवार अभियानाचा दुसरा टप्पा २०२५-२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन होते. मात्र निधीअभावी अनेक कामे वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत. आता दुष्काळी कामांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आल्याने निधी उपलब्ध झाल्यानंतर कामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. फेब्रुवारीनंतर या कामांना प्रत्यक्ष सुरुवात होण्याची शक्यता जलसंधारण विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. जलसाठे निर्माण करणे, भूजल

### दुष्काळी कामांमध्ये प्रलंबित कामांचा समावेश

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित १ हजार ३५८ कामांचा दुष्काळ निवारणा साठी प्रस्तावित कामांमध्ये समावेश करण्यात आला आहे. यामध्ये विशेष योजनेतील ९८५, तर अभिसरणातील ३७३ कामांचा समावेश आहे. या कामांमध्ये नाला खोलीकरण, जुन्या नाल्यांमधील गाळ काढणे, रिचार्ज शाफ्ट उभारणे, बंधारे बांधणे, विहीर पुनर्भरण तसेच तलाव दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत.पातळी वाढविणे आणि शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. मात्र निधी वेळेत उपलब्ध न झाल्याने या उद्देशालाच विलंब होत असल्याचे चित्र अमरावती जिल्ह्यात दिसून येत आहे.

# सोयाबीनच्या दरात चढउतार असल्याने शेतकरी चिंतेत

**अमरावती/ का.प्र.**

दुष्काळाच्या झळांनी सोयाबीनचे पीक होरपळून निघाल्याने यंदा खुल्या बाजारात हमीभावापेक्षा अधिक दर मिळत असला, तरी शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच आहे.

बाजारात समाधानकारक भाव असताना घरात विकायला सोयाबीनच शिल्लक नसल्याने, भाव असूनही पदरात काहीच नाही, अशी विदारक स्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे ग्रामीण भागाचे अर्थकारण कोलमडले आहे.

जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या पीककापणी प्रयोगांत हेक्टरी अवघी सहा ते सात क्विटल अशी निराशाजनक सरासरी नोंदवली गेली आहे. केंद्राने यंदाच्या हंगामासाठी सोयाबीनला प्रतिक्विटल ५ हजार ७०८ रुपये हमीभाव जाहीर केला आहे.

बहुतांश शेतकऱ्यांची काढणी पूर्ण झाली असून, दसऱ्याच्या आधीच बाजारात सोयाबीनची विक्री सुरू झाली. प्रारंभी बाजारात ६ हजार ३०० ते ६ हजार ८०० रुपयांपर्यंत (सरासरी ६,५५० रुपये) चढा दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, हा दिलासा अल्पजीवी ठरला.

गेल्या सोमवारी बाजारात १५ हजार ७५७ पोत्यांची आवक होताच, शुक्रवारच्या तुलनेत दरांमध्ये प्रतिक्विटल २२० ते २४९ रुपयांची घसरण झाली. आवक वाढल्याचे कारण पुढे करत व्यापाऱ्यांनी दर पाडल्याचे चित्र दिसले. शनिवारी पुन्हा दर वाढले. ६ हजार ६०० ते ६ हजार ९३५ रुपये म्हणजे सरासरी ६ हजार ८१७ रुपये दर मिळाला. दरांमध्ये चढउतार सुरू असल्याने

शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.उत्पादनात प्रचंड घट झाल्यामुळे खुल्या बाजारातील चढा दर शेतकऱ्यांसाठी केवळ मृगजळ ठरत आहे.

एका शेतकऱ्याला यंदा चार एकरांत अवघे ५ क्विटल ६० किलो सोयाबीन झाले. ६ हजार ३३० रुपये दराने त्यांना ३५ हजार ४४८ रुपये हाती आले. याच शेतातून गेल्यावर्षी या शेतकऱ्याला एकरी सहा क्विटल उत्पादन मिळाले होते; तेव्हा ५ हजार ३०० रुपयांच्या दराने त्यांनी १ लाख २१ हजार २०० रुपयांची कमाई केली होती. यंदा मात्र हाती केवळ नाममात्र रक्कम आली आहे.

# ५१ व्या ग्रंथभेट योजनेसाठी निवडलेल्या पुस्तकांची यादी जाहीर

## हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत

**अमरावती/ का.प्र.**

ग्रंथालय संचालनालयाच्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेअंतर्गत ५१ व्या ग्रंथभेट योजनेसाठी निवडण्यात आलेल्या पुस्तकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यादीतील पुस्तकांबाबत सूचना, हरकती, आक्षेप ३१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत ग्रंथालय संचालक कार्यालयात पाठविण्याचे आवाहन, प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या आणि ग्रंथालय संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथांमधून राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या उपसमिती सदस्यांनी एकूण ११८३ ग्रंथांची निवड केली आहे. यामध्ये ६८५ मराठी, २४६ हिंदी आणि २५२ इंग्रजी पुस्तकांचा समावेश आहे.

ही यादी ग्रंथालय संचालनालयाच्या .dol.maharashtra.gov.in वर अधिकृत संकेतस्थळावर १६ ऑक्टोबर, २०२६ ते ३१ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत सर्वांना पाहण्यासाठी खुली ठेवण्यात आली आहे. सदर ग्रंथ यादीतील पुस्तके ग्रंथालय संचालनालयाच्या २५% ग्रंथसूचीनुसार वितरित करणे बंधनकारक असणार आहे.या ग्रंथयादीतील कोणत्याही पुस्तकाबाबत सूचना, हरकती, आक्षेप ३१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१ यांच्याकडे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात, हस्तबटवड्याने किंवा पोष्टाने पाठवणे आवश्यक आहे. तसेच संकेतस्थळावर दिलेल्या ई-मेल आयडीवरही हे आक्षेप नोंदवता येतील. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा किंवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

या यादीतील ग्रंथांचे नाव, लेखक, प्रकाशक आणि किंमत यामध्ये काही बदल किंवा त्रुटी आढळल्यास त्या निदर्शनास आणून दिल्यास त्याचे स्वागतच असेल, असे सांगण्यात आले आहे.

# दुष्काळ निवारणासाठी जलपुनर्भरण काळाची गरज-आ. संजय खोडके

## हॉलिवूड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या रेन वॉटर हार्वेस्टिंग कामाचे उद्घाटन



**अमरावती/ का.प्र.**

वाढत्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तसेच भविष्यातील दुष्काळाचे संकट टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलपुनर्भरण करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे प्रदेश महासचिव- आमदार संजय खोडके यांनी केले.

कठोरा रोड, अमरावती येथील हॉलिवूड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादित यांच्या वतीने निर्मित रेन वॉटर हार्व्हेस्टिंग कामाच्या उदघाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर मनपा स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष - प्रशांत डवरे, मनपा नगरसेवक - चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर, प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, मनीष बजाज सोसायटीचे अध्यक्ष - डॉ. कृष्णा वडोदकर, सोसायटीचे सचिव - सुरेश भारंबे आदींसह संचालक मंडळ तसेच मान्यवर अतिथी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाला हॉलिवूड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारणी मंडळातील संचालक - अण्णा वानखडे, जयंत निंभोरकर , भूषण देशपांडे, प्राचार्य - डॉ. नितीन चांगोले, भाऊराव वावरे, तसेच कार्यकारणी सदस्य डॉ. शिवाजी झोंबाळे, प्रा. विनायक भांबुरकर, आदींसह सोसायटीचे सभासद प्रामुख्याने उपस्थित होते.

# पत्नीच्या किडनी दानातून पतीला नवजीवन

## डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील बारावे किडनी प्रत्यारोपण

**अमरावती/ का.प्र.**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे पत्नीने ६१ वर्षीय पतीला किडनी दान करून दिले नवजीवन दिले. डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील ही यशस्वी बारावी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ठरली.

अर्जुन नगर भागातील, अमरावती निवासी , सेवानिवृत्त शिवाजी शिक्षण महाविद्यालयातील माजी कर्मचारी राजेंद्र पंढरीनाथ वानखडे हे गेल्या पाच,सहा महिन्यापासून किडनी आजाराने त्रस्त होते. शहरातील डॉ हितेश गुल्हाने , नेप्रोलॉजिस्ट यांच्या देखरेखी खाली ते उपचार घेत असताना, त्यांना डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात त्यांची ६१ वर्षीय पत्नी महानंदा राजेंद्र वानखडे ह्या आपल्या पतीला किडनी दान करण्यास तयार झाल्या.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर, डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ सर्वेश माहेश्वरी, नेफ्रॉलॉजिस्ट डॉ हितेश गुल्हाने, बधीरीकरण तज्ज्ञ डॉ विजया पाटील,


रुग्ण :- राजेंद्र पंढरीनाथ वानखडे


डोनर :- महानंदा राजेंद्र वानखडे

डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ ऐश्वर्या नायर, डॉ रमणीका ढोमणे, डॉ रोहनसिंग चव्हाण, डॉ सलोनी देशमुख,डॉ कल्याणी तामगाडर्गे, ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांचा मोलाचा वाटा होता.

चार-पाच तास चाललेली ही बारावी शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली.

शस्त्रक्रिया पूर्व तयारीमध्ये रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मेट्रन चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहाय्यक आरती मोरांडे यांचे सहकार्य लाभले. प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ सुरेंद्र भुयार, सदस्य डॉ केशव पागृत, डॉ अनिल बत्रा, डॉ सायमा शेख , डॉ गणेश जाधव, डॉ टी सी राठोड, दिनकर पाटील, डॉ दुर्गेश देशमुख यांनी रुग्ण व नातेवाईक यांच्या सोबत प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रिया करिता मान्यता दिली.

शस्त्रक्रिया दरम्यान व पश्चात परिचारिका संध्या वाघमारे, शितल अंबरते, राणी खेकडे,प्रियंका मैंद, सुमित्रा गाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, आशिष बोकडे, वैभव नासरे, रोशन मेश्राम, दीप खांडेकर, प्रतिक्षा भिसेकर, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, ममता डोंगरे, शिवानी टापरे, रूद्रायणी खंडारे, अनिता गोमकाळे यांनी जबाबदारी पार पाडली.

उमेश चव्हाण, उमेश सोनवणे, मंगेश गुडदे, वर्षा गाढवे, सार्थक तसरे, संगीता तांबट,मधुर भुयार, अशोक खुरकटे, तेजस हरणे, आकाश हंबर्डे, राहुल पटले यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले.किडनी प्रत्यारोपण सारखी अत्यंत अवघड व जटिल शस्त्रक्रिया डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व डॉक्टरांचे, नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# कंदिल वा गॅसबत्तीच्या पिवळ्या उजेडात अवतरायची अयोध्या!

**विदर्भाच्या गावोगावी नऊ रात्री रंगणारी रामलीला, उत्तर भारतातून येणारे लोककलावंत आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्या एका विलक्षण सांस्कृतिक परंपरेच्या आठवणी...**



काही आठवणी अशा असतात की, त्या आठवताना डोळ्यांसमोर केवळ भूतकाळ उभा राहत नाही, तर त्या काळातले संपूर्ण जगच पुन्हा जिवंत होते. त्या जगात सुखसोयी कमी असतात, साधनांची वानवा असते; पण माणसांच्या जगण्यात एक विलक्षण ओलावा असतो. मनोरंजनाची साधने मर्यादित असतात; पण एकत्र येण्याचे, एकमेकांत मिसळण्याचे आणि सामूहिक आनंद अनुभवण्याचे प्रसंग मुबलक असतात. आजच्या चकचकीत, धावपळीच्या आणि प्रत्येक माणसाला त्याच्या मोबाइलच्या पडद्यामागे बंदिस्त करणाऱ्या जगात त्या काळाकडे वळून पाहिले की, हरवलेल्या एखाद्या सुंदर गावाची आठवण यावी, तसे वाटते.

विदर्भाच्या खेड्यापाड्यांत नवरात्र आले की अशाच एका आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक सोहळ्याची चाहूल लागायची. उत्तर प्रदेशातून किंवा हिंदी भाषिक प्रदेशांतून आलेली रामायण मंडळी गावात दाखल व्हायची. पुढचे नऊ दिवस गावाच्या सांस्कृतिक जीवनाचे घड्याळ जणू रामलीलेच्या वेळेनुसार चालायचे. संध्याकाळ झाली की गावातल्या एखाद्या चौकात, चावडीसमोर किंवा मोकळ्या मैदानात रामायणातील पात्रे अवतरायची. कधी कंदिलाच्या उजेडात, कधी गॅसबत्तीच्या पिवळसर प्रकाशात, तर पुढच्या काळात विजेच्या फिकट पिवळ्या बल्बच्या उजेडात रामकथेचे नाट्य रंगायचे.

आजच्या पिढीला कदाचित हे सारे एखाद्या चित्रपटातले दृश्य वाटेल. पण मागच्या शतकातल्या विदर्भातील अनेक गावांच्या सांस्कृतिक जीवनात हा एक महत्त्वाचा अनुभव होता. टीव्ही नव्हता, मोबाइल नव्हते, इंटरनेट नव्हते. मनोरंजनासाठी आजच्यासारखे असंख्य पर्याय उपलब्ध नव्हते. अशा काळात गावाच्या मातीत उभे राहणारे हे छोटेसे नाट्यगृह म्हणजे गावकऱ्यांसाठी केवळ मनोरंजनाचे साधन नव्हते; तो श्रद्धेचा, सामूहिक आनंदाचा आणि एका वेगळ्याच भावविश्वात रमून जाण्याचा सोहळा होता.आणि गंमत म्हणजे, त्या सोहळ्याचे शिल्पकार असायचे दूरच्या प्रदेशातून आलेले काही साधे लोककलावंत!

### दूरच्या प्रदेशातून येत असतं रामकथेची माणसे

आज आपण रामलीला म्हटले की डोळ्यांसमोर उत्तर भारतातील मोठे उत्सव, भव्य व्यासपीठे, रंगीबेरंगी प्रकाशयोजना आणि रावणदहनाचे देखावे उभे राहतात. परंतु ग्रामीण भारतात रामलीलेचे एक साधे, अनौपचारिक आणि लोकजीवनाशी जोडलेले रूपही दीर्घकाळ अस्तित्वात होते. उत्तर भारतात रामलीलेची परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे. सोळाव्या शतकात गोस्वामी तुलसीदासांनी रचलेल्या रामचरितमानसाने रामकथा सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात मोठी भूमिका बजावली. रामलीलेत या ग्रंथातील प्रसंग संवाद, गायन, निवेदन आणि अभिनयाच्या माध्यमातून सादर केले जातात. या लोकनाट्यपरंपरेला २००८ मध्ये युनेस्कोने मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या प्रतिनिधी यादीत स्थान दिले.

याच व्यापक लोकपरंपरेचा एक साधा आविष्कार विदर्भाच्या गावांमध्ये पाहायला मिळत असे. उत्तर प्रदेशातील किंवा हिंदी भाषिक प्रदेशांतील काही कलाकार नवरात्राच्या दिवसांत गावोगावी फिरत. रामायणातील प्रसंग सादर करणे, गाणे, संवाद म्हणणे, पात्रांच्या वेशभूषा करणे आणि उपलब्ध साधनांतून नाट्य उभे करणे, हेच त्यांचे जगणे होते.ते कोणत्या गावात कधी येणार, कुठे मुक्काम करणार आणि रामलीला कुठे सादर होणार, याची चर्चा सुरू झाली की गावात उत्सुकता निर्माण व्हायची. मंडळी गावात दाखल झाली की त्यांच्यासाठी जागा शोधली जायची. गावातील एखादे मोठे घर, शेतातील वस्ती, वाडा किंवा मोकळी जागा त्यांच्या मुक्कामासाठी निश्चित व्हायची.

या कलाकारांकडे मोठा लवाजमा नसायचा. एखादी पेटी, काही कपडे, मुकुट, दागिन्यांसारख्या दिसणाऱ्या रंगीत वस्तू, रंगरंगोटीचे सामान आणि नाटकासाठी आवश्यक असलेल्या काही वस्तू, एवढेच त्यांचे बाडबिस्तर असायचे. आजच्या भाषेत सांगायचे तर ते स्वतःच कलाकार, स्वतःच नेपथ्यकार, स्वतःच रंगभूषाकार आणि स्वतःच व्यवस्थापक असायचे.त्यांच्याकडे आधुनिक तंत्रज्ञान नव्हते; पण पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या रामकथेचे संस्कार होते. अभिनयाची एक विशिष्ट शैली होती. संवादफेकीची लकब होती. प्रसंगातील भावनांना ठसठशीतपणे व्यक्त करण्याची पद्धत होती. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपली कला सादर करण्याची मनापासूनची तळमळ होती.

### एका साध्या फळीवर उभे राहायचे संपूर्ण रामायण!

आज एखादे नाटक सादर करायचे म्हटले की रंगमंच, प्रकाशयोजना, ध्वनियंत्रणा, पडदे, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा अशा अनेक गोष्टींची जुळवाजुळव करावी लागते. त्या काळातल्या रामलीलेचे गणित मात्र अगदी वेगळे होते.गावातल्या एखाद्या चौकात चार बांबू रोवायचे. त्यावर कापड किंवा ताडपत्री टाकायची. जमिनीपासून थोडा उंचवटा करून फळ्या टाकल्या की रंगमंच तयार! मागे एखादा पडदा लावला की झाले नेपथ्य. अयोध्या, वनवास, पंचवटी, लंका, अशोकवाटिका, युद्धभूमी अशा अनेक ठिकाणांची कल्पना प्रेक्षकांनी आपल्या मनातच उभी करायची. कधी एखादे झाड, कधी काही फांद्या, तर कधी रंगीत कापडाचा तुकडा एखाद्या प्रसंगाला पूरक ठरायचा. कलाकारच या सगळ्या वस्तूंची जमवाजमव करायचे. प्रयोग संपला की पुन्हा त्या आवरून ठेवायचे. दुसऱ्या दिवशी नव्या प्रसंगासाठी पुन्हा रंगमंच सजवायचा.

### प्रकाशयोजनेची कहाणी तर आणखी रंजक

कंदिलाच्या उजेडात किंवा गॅसबत्तीच्या प्रकाशात कलाकारांचे चेहरे उजळायचे. वाऱ्याची झुळूक आली की ज्योती थरथरायच्या. त्या उजेडात रंगवलेले चेहरे, डोक्यावरचे मुकुट, चमचमणारे कृत्रिम दागिने आणि रंगीत वस्त्रे यांना एक वेगळेच नाट्यमय रूप प्राप्त व्हायचे. पुढे गावात वीज आली, तेव्हा एखादा पिवळसर बल्ब रंगमंचावर लावला जायचा. आजच्या निकषांनुसार ही प्रकाशयोजना अत्यंत प्राथमिक होती; पण त्या काळच्या प्रेक्षकांसाठी ती पुरेशी होती.कारण प्रेक्षक केवळ डोळ्यांनी नाटक पाहत नव्हते. ते मनाने त्यात सहभागी होत होते.ज्या फळ्यांवर राम उभा राहायचा, त्या फळ्यांना त्याक्षणी अयोध्येच्या राजदरबाराचे पावित्र्य लाभायचे. ज्या मोकळ्या जागेत लक्ष्मण उभा राहायचा, तीच जागा पंचवटी व्हायची. आणि रंगमंचावर रावण अवतरला की, त्याच साध्या जागेत लंकेचे साम्राज्य उभे राहायचे.कल्पनाशक्तीला आधुनिक साधनांची गरज नसते, याचा हा सुंदर प्रत्यय होता.

### सीतेच्या भूमिकेत पुरुष कलाकार!

या रामलीलेतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्त्रीपात्रे साकारणारे पुरुष कलाकार.आजच्या काळात स्त्रीपात्र पुरुषांनी साकारण्याची कल्पना अनेकांना आश्चर्यकारक वाटेल. पण पारंपरिक लोकनाट्याच्या अनेक प्रकारांत स्त्रीभूमिका पुरुष कलाकार साकारत असत. ग्रामीण रामलीलेतही अशी पद्धत अनेक ठिकाणी दिसून येत असे.सीतेची भूमिका करणारा कलाकार साडी नेसायचा, डोक्यावर पदर घ्यायचा, चेहऱ्यावर रंगरंगोटी करायचा आणि स्त्रीसुलभ हावभावांचा सराव करून रंगमंचावर यायचा. कौसल्या, कैकेयी किंवा इतर स्त्रीपात्रेही पुरुष कलाकारच साकारत असत.

त्यांच्याकडे आजच्या अर्थाने मेकअप आर्टिस्ट नसायचा. चेहऱ्यावर रंग चढविण्यापासून मिशा काढण्यापर्यंत आणि मुकुट व्यवस्थित बसविण्यापासून वेशभूषेची घडी घालण्यापर्यंत सगळे कलाकार स्वतःच करायचे. एका पात्राचा प्रयोग संपला की पुढच्या पात्रासाठी रंगरूप बदलायचे. एखाद्या कलाकाराला एकापेक्षा अधिक भूमिका कराव्या लागत असतील, तर त्यासाठी विशेष खबरदारी घ्यावी लागायची.या सगळ्या धावपळीतूनही ते आपापल्या भूमिका सादर करायचे.राम, लक्ष्मण, भरत, हनुमान, रावण, विभीषण अशी पात्रे रंगमंचावर अवतरायची. त्यांचे संवाद, देहबोली, आवाजातील चढ-उतार आणि प्रसंगानुरूप हालचाली यांतून कथा पुढे सरकायची.

हनुमानाची भूमिका करणारा कलाकार रंगमंचावर आला की लहान मुलांच्या डोळ्यांत चमक निर्माण व्हायची. रावणाच्या प्रवेशाने वातावरणात ताण निर्माण व्हायचा. राम-रावण युद्धाच्या वेळी प्रेक्षकांचा श्वास जणू रोखला जायचा.या सगळ्यात अभिनय किती वास्तववादी होता, यापेक्षा त्या पात्राविषयी प्रेक्षकांच्या मनात



किती श्रद्धा होती, हे अधिक महत्त्वाचे होते.कारण रामलीला पाहणाऱ्या अनेकांसाठी रंगमंचावरचा राम हा केवळ भूमिका करणारा कलाकार नव्हता. तो त्यांच्या श्रद्धेचा, संस्कारांचा आणि बालपणापासून ऐकत आलेल्या कथांचा जिवंत आविष्कार होता.

### नऊ दिवस गावाला लागायची रामलीलेची ओढ

नवरात्रातल्या नऊ दिवसांत रामायणातील विविध प्रसंग सादर केले जायचे. कार्यक्रमाचे स्वरूप आणि प्रसंगांचा क्रम मंडळीनुसार बदलू शकत असे. काही ठिकाणी रामजन्मापासून वनवास, सीताहरण, हनुमानाचे लंकेत जाणे, राम-रावण युद्ध आणि रामाचा अयोध्येला परतण्याचा प्रसंग अशा प्रमुख घटनांचा समावेश असे.

### प्रत्येक दिवसाची कथा पुढच्या दिवसाची उत्सुकता वाढवायची

दिवसभर शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर, दुकानदार आणि घरातील कामे आटोपणाऱ्या स्त्रिया संध्याकाळच्या कार्यक्रमाची वाट पाहत. मुलांसाठी तर हा उत्सव म्हणजे आनंदाची पर्वणीच! गावातील घरांतून जेवण आटोपले की लोक हळूहळू रामलीलेच्या ठिकाणी जमा होऊ लागायचे. कोणी चटई घेऊन यायचे, कोणी घरातून पोते आणायचे. कुणी लहान मुलाला खांद्यावर बसवायचे, तर कुणी पुढे जागा मिळावी म्हणून आधीच येऊन बसायचे.काही मुलांना नाटकातील संवाद पाठ व्हायचे. राम-लक्ष्मणाचा प्रवेश कधी होणार, हनुमान कधी दिसणार, रावणाचा दरबार कधी भरणार, याची त्यांना उत्सुकता असायची.

नाटक सुरू झाले की आजूबाजूचा गोंगाट हळूहळू कमी व्हायचा. कलाकारांचे संवाद स्पष्ट ऐकू येण्यासाठी लोक शांत बसायचे. एखाद्या प्रसंगात प्रेक्षकांच्या तोंडून उत्स्फूर्त प्रतिक्रिया उमटायच्या. ओळखीच्या संवादाला दाद मिळायची. भावनिक प्रसंगात वातावरण गंभीर व्हायचे.आज आपण घरबसल्या मोठ्या पडद्यावर रामायण पाहू शकतो. आवडता प्रसंग हवा तेव्हा पुन्हा पाहू शकतो. पण त्या काळात रामकथा पाहण्याचा अनुभव वेगळाच होता. तो एकट्याचा नव्हता, तर संपूर्ण गावाचा होता.

एकाच प्रसंगावर शेकडो लोकांची नजर खिळलेली असायची. एकाच संवादावर अनेक चेहरे उजळायचे. एकाच नाट्यमय क्षणी संपूर्ण गावातून आश्चर्याची किंवा आनंदाची प्रतिक्रिया उमटायची.मनोरंजनाची साधने कमी होती, पण आनंद सामूहिक होता.पन्नास पैसे, एक रुपया आणि गावकऱ्यांचे मोठे मन.या रामलीलेची अर्थव्यवस्थाही त्या काळच्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारी होती.आजच्या व्यावसायिक मनोरंजनाच्या जगात कलाकारांच्या मानधनापासून ते जाहिरातींच्या उत्पन्नापर्यंत सगळे काही आकड्यांत मोजले जाते. त्या काळात मात्र गावोगावी फिरणाऱ्या या कलाकारांचे अर्थकारण अगदी साधे होते.

प्रयोग संपल्यानंतर गावकरी आपल्या ऐपतीनुसार त्यांना बिदागी देत. कुणी पन्नास पैसे द्यायचे, कुणी एक रुपया. एखाद्याने थोडे अधिक दिले, तर कलाकारांच्या चेहऱ्यावर समाधान दिसायचे. प्रत्येक घरातून मोठी रक्कम मिळेल, अशी अपेक्षा नसायची. लोकांच्या श्रद्धेने आणि स्वेच्छेने मिळणारी मदत हेच त्यांच्या उत्पन्नाचे एक साधन होते.

गावातील श्रीमंत शेतकरी, सरपंच, पाटील किंवा प्रतिष्ठित व्यक्ती त्यांच्या निवासाची व्यवस्था करीत. कधी शेतातील वस्तीवर, तर कधी वाड्यात त्यांच्या राहण्याची सोय होई. त्यांना धान्य दिले जाई. काही ठिकाणी जेवणाची व्यवस्था केली जाई.कलाकार स्वतःचा स्वयंपाक स्वतः करीत असत, अशीही अनेक ठिकाणच्या अनुभवांतून आठवण सांगितली जाते. मुक्कामासाठी मिळालेल्या जागेत चूल पेटवून स्वयंपाक करायचा, जेवायचे आणि दुसऱ्या दिवसाच्या प्रयोगाची तयारी करायची.

या व्यवहारात एक साधा हिशेब होता. कलाकारांनी गावाला रामकथा द्यायची आणि गावाने त्यांना निवारा, अन्नधान्य व बिदागीच्या रूपाने हातभार लावायचा. आजच्या भाषेत याला लोकसहभाग म्हणता येईल. पण त्या काळच्या गावकऱ्यांना त्यासाठी कोणत्याही संज्ञेची गरज नव्हती. आपल्या गावात रामलीला सादर करणारी मंडळी आली आहेत, त्यांची व्यवस्था करणे हे आपले कर्तव्य आहे, अशी सहज भावना होती.कलाकार आणि प्रेक्षक यांच्यातील नाते केवळ पैसे देणाऱ्या आणि पैसे घेणाऱ्या व्यक्तींचे नव्हते. ते श्रद्धा, आदर आणि परस्परावलंबन यांतून तयार झालेले नाते होते.

### रामलीला म्हणजे गावाच्या एकजुटीचा उत्सव



या नऊ दिवसांत गावात एक वेगळेच वातावरण तयार होत असे.सामान्यतः आपापल्या कामांत गुंतलेली माणसे एका ठिकाणी एकत्र येत. शेजारी शेजारी बसून नाटक पाहताना त्यांच्यात संवाद घडत. मुलांना मोठ्यांच्या सहवासात रामायणातील कथा ऐकायला मिळत. ज्येष्ठांना आपल्या बालपणापासून परिचित असलेले प्रसंग पुन्हा अनुभवता येत.

अशा लोकनाट्यांचे वैशिष्ट्यच हे आहे की, त्यांची निर्मिती आणि आस्वाद या दोन्हींत समाजाचा सहभाग असतो. युनेस्कोने रामलीलेविषयी केलेल्या नोंदीतही या परंपरेमुळे वय, जात किंवा सामाजिक स्तर यांच्या पलीकडे जाऊन गावातील लोक एकत्र येतात, तसेच वेशभूषा, रंगभूषा, प्रकाशयोजना आणि इतर व्यवस्थांमध्ये स्थानिक लोक सहभागी होतात, असे नमूद केले आहे.

विदर्भातील गावांमध्ये येणाऱ्या रामायण मंडळ्यांचे स्वरूप प्रत्येक ठिकाणी सारखेच होते, असे म्हणता येणार नाही. मंडळी, गाव, स्थानिक परंपरा आणि उपलब्ध साधनांनुसार त्यांत फरक असू शकत होता. तरीही या प्रयोगांच्या आठवणीतून ग्रामीण समाजातील सामूहिकतेचे एक महत्त्वाचे चित्र समोर येते.नाटकाच्या निमित्ताने गावकऱ्यांना एकत्र येण्याची संधी मिळत होती. दूरच्या प्रदेशातून आलेल्या कलाकारांशी त्यांचा परिचय होत होता. हिंदी भाषेतील संवाद आणि गाणी ऐकताना भाषेच्या सीमा सहज ओलांडल्या जात होत्या.

विदर्भाच्या सांस्कृतिक जीवनात मराठी लोकपरंपरा, स्थानिक बोली, विविध धार्मिक उत्सव आणि इतर प्रदेशांतून आलेल्या सांस्कृतिक प्रवाहांचा संगम होत आला आहे. रामलीला हा त्यातील एक महत्त्वाचा धागा होता.या कलाकारांना गावातल्या प्रत्येक घराची ओळख झाली असेलच असे नाही; पण नऊ दिवसांत गावाच्या सामूहिक स्मरणात त्यांची जागा तयार होत असे.त्यांचा मुक्काम संपला की ते पुढच्या गावाकडे निघून जात. मागे राहायच्या त्यांच्या प्रयोगांच्या आठवणी, काही संवाद, एखादे गाणे आणि पुढच्या नवरात्रात ते पुन्हा येतील का, याची उत्सुकता!

**-अविनाश दुधे**

---

## सीमोल्लघंन

निर्धार 'रे' जग
जिकंण्याचा|
मी पथावरुनी निघालो,
ओठले सोने लुटीनी |
मागुता परतोनी आलो
||१||

अर्भके दुग्धाविना ती |
धरत वेठी,
पायली मी जात
असता,आसवाची |
रास मोठी ||२||

आंधळया श्रध्देत यांना |
देभ दिसला ना जगाचा
पेटलेला जठरागनी |
तरीही पततो मृग जळाचा
||३||

रेअसे विपरीत घडता |
किरण दिसती क्रांतीचे
पौर्णिमेचा चंद्र असता |
गाण थांबे सागराचे ||४||

का असे घडते |
क्रांतीज्योती का विझावी,
घ्या आता तरी द्या व्रताला |
भुक पोटाची क्षमाणी
||५||

**ॲड.अ.भो.तांबडे**
साई सागर अपार्टमेट
अम.

---

# विजयी होऊ चला..

**भारतीय संस्कृती वीरतेची पूजक आहे. शौर्याची उपासक आहे. व्यक्ती आणि समाजातील तमाम घटकांमध्ये वीरता प्रकट होण्यासाठी दस-याचा उत्सव साजरा करण्याची पद्धत आहे. या विजयाच्या ठायी लक्ष्मी वास करते. व्यक्ती, समाज, राष्ट्र या सर्वांच्या भूमिकांतून विजयश्री हे वैभव आहे आणि दसरा हा या विजयाच्या वैभवाचा व पराक्रमाचा सण आहे.**

### भारतीय संस्कृती पहा

आदिशक्तीच्या नवरात्रोत्सवाची सांगता होते ती दसऱ्याच्या दिवशी. संपूर्ण भारतभरात खासकरून दक्षिणेकडे हा उत्सव मोठया उत्साहात साजरा होतो. या दिवसाला अनेक पौराणिक तसेच नैसर्गिक ऋतुमानाचेही संदर्भ आहेत. हा उत्सव विजयासाठी प्रस्थान करण्याचा आहे. त्यामुळेच दसऱ्याला विजयादशमी असेही म्हटले जाते. या दिवशी सीमोल्लंघन करण्याची प्रथा प्राचीन काळापासून आहे. आज बदलत्या काळात सीमोल्लंघन म्हणजे आपल्या मनातील राग, लोभ, मत्सर, द्वेष, अंधश्रद्धा, सूड या वाईट भावना दूर करून मनाचे, विचारांचे एक प्रकारे सीमोल्लंघन करण्यासाठी या दिवसाचं महत्त्व आहे.

भारतीय संस्कृती वीरतेची पूजक आहे. शौर्याची उपासक आहे. व्यक्ती आणि समाजातील तमाम घटकांमध्ये वीरता प्रकट होण्यासाठी दसऱ्याचा उत्सव साजरा करण्याची पद्धत आहे. युद्ध अनिवार्य असेल तर शत्रूच्या आक्रमणाची वाट न बघता त्याच्यावर आक्रमण करून त्याचा पराभव करणे हीच कुशल राजनीती आहे. शत्रू आपल्या राज्यात घुसून लूट केल्यानंतर लढाई करण्याची तयारी करणारे आमचे पूर्वज नव्हते, तर शत्रूचा दुष्ट व्यवहार समजूनच त्याच्यावार आक्रमण करत असत. रोग आणि शत्रूला निर्माण झाल्याझाल्याच नष्ट करायला पाहिजे अन्यथा ते त्यांचे प्राबल्य वाढवते.



### भारतीय संस्कृती पहा

दसरा म्हणजे विजयाचे प्रतीक म्हणूनच या दिवसाला विजयादशमीदेखील म्हणतात. प्रभूरामचंद्रांच्या काळापासून दसरा हा दिवस विजयाचे प्रतीक बनला आहे. भगवान रामचंद्रांनी रावणाचा नाश याच दिवशी केला होता. म्हणून आजही या दिवशी प्रतीकात्मक रूपाने रावणदहन करतात. इतिहासात या दिवशी विजयप्रस्थान करण्याची अनेक उदाहरणे सापडतात.

### ऋतुमानाचे संदर्भ

या उत्सावामागे काही नैसर्गिक ऋतुमानांचेही संदर्भ आहेत. दसऱ्याच्या वेळी वर्षाऋतू येऊन गेलेला असतो. वरुण देवाच्या कृपेने या काळात अन्नधान्याची समृद्धी असते. त्यामुळे समाजमन आनंदाने भरलेले असते. नसानसांत उत्साहाचे कारंजे उडत असल्यामुळे विजयप्रस्थान करण्याचे त्याचे मन होणारच. या दिवसात पाऊस गेलेला असतो. चिखलाने माखलेले रस्ते सुकलेले असतात. हवामान अनुकूल असते. आकाश स्वच्छ असते. असे वातावरण विजयाला पूरक असते. शिवाय नऊ दिवस जगदंबेची उपासना करून प्रयत्न केलेली शक्तीदेखील शत्रूचा संहार करण्याची प्रेरणा देत असते.

देवी जगदंबेने सतत नऊ दिवस युद्ध करून चंड-मुंड, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांचा वध केला होता. तिच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही दसरा साजरा केला जातो. तसेच पांडवांनी अज्ञातवासातून बाहेर येऊन आपली लपविलेली शस्त्रे शमीच्या झाडावरून याच दिवशी बाहेर काढली होती. म्हणून या दिवशी सीमोल्लंघन करतात आणि येताना आपटय़ाची पाने सोन्याचे प्रतीक म्हणून एकमेकांना वाटतात. भारतीय संस्कृतीत प्रत्येक चेतन आणि अचेतन गोष्टीला सन्मान दिला जातो आणि त्यांचे पूजनही केले जाते. यामध्ये वृक्ष वनस्पतीही सामील आहेत. चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला कडुलिंबाची पूजा केली जाते. वटसावित्री पौर्णिमेला वडाची पूजा केली जाते. सोमवती अमावास्येला तुळशीची पूजा केली जाते. भाद्रपद महिन्यात येणाऱ्या कुशग्रहिणी अमावास्येला कुशाची पूजा केली जाते आणि कार्तिक महन्य़ातील नवमीला आवळे नवमी म्हणून आवळ्याच्या झाडाची पूजा केली जाते. त्या-त्या वनस्पतीचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व जाणून त्याचे पूजन केले जाते.

दस-याला आपटय़ाची पाने देण्यामागे विजय आणि उल्हासाची भावना असते. तसेच समृद्धीचीही कामनाही केली जाते. याच दिवशी काही भागांत अपराजिता (विष्णूकांता) या वनस्पतीचेही पूजन केले जाते. ही वनस्पती विष्णूला प्रिय आहे. या धार्मिक संदर्भाबरोबर तिचे काही वैद्यकीय गुणधर्म आहेत. ती अतिशय आरोग्यदायी आहे. कफविकारांवर या वनस्पतीचा खूप चांगला उपयोग होतो. विजया-दशमीला दुर्गा पूजन, अपराजिता पूजन, नवरात्रीचे पारणे इत्यादी विधी केले जातात.मकांतून विजयश्री हे वैभव आहे आणि दसरा हा या विजयाच्या वैभवाचा व पराक्रमाचा सण आहे.

पूर्वीच्या काळी सीमोलंघनाचा याचा अर्थ राज्याच्या सीमा ओलांडणे हा होता. आजच्या परिस्थितीत सीमोल्लंघनाचा नवा अर्थ जाणून घेतला पाहिजे यासाठी आपण आपल्या ध्येयाच्या कक्षा, आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारून पुढे गेलो, आपल्या मर्यादित संकुचित अवस्थेतचे सीमोल्लंघन करून व्यापकत्वाकडे गेलो, आपल्या दृष्टीचे उल्लंघन करून एका विशाल दृष्टीकडे गेलो, आपण आपले विचार कुटुंबापुरते मर्यादित न ठेवता समाजापर्यंत पोहोचलो तर ते ख?या अर्थाने सीमोल्लंघन ठरेल. आपल्यामधील संकृचित वृत्ती दूर करून विशालतेकडे झेपावणे असा याचा मथितार्थ आहे, पण सीमोल्लंघन म्हणजे मर्यादा ओलांडणे नसून कक्षा विस्तारणे आहे. आजच्या काळात अशा सीमोलंघनाची मोठी गरज आहे. समाजामधील भोगवृत्तीचा संहार करून त्यागवृत्तीकडे जाण्याचा हा सीमोलंघनाचा भाग आहे. अज्ञानाकडून ज्ञानाकडे झेपावण्याचा, अंधारातून प्रकाशाकडे जाणे म्हणजे आपण आपल्या जीवनाला उर्ध्व दिशेला परिवर्तीत करून जाण्यानेच खऱ्या अर्थाने हा सण आपण साजरा केला असे म्हणू शकतो.

**सुनील हिंगणे**

---

## प्रासंगिक

### रावण दहन

शतकानुशतके आम्ही
करतोय रावण दहन
पण सांगा थांबलय का
महिलांचे अपहरण ? ...

रावणानंतर तशी अद्दल
प्रत्येकाला घडली असती
तर समाज कंटकांनी
घेतली नसती का धास्ती?



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३२९



# अकोट फाईलमध्ये गांजाचा मोठा साठा जप्त ; एकाला अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई ; ३९.४ किलो गांजासह १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने अकोट फाईल परिसरात मोठी कारवाई केली. संत कबीर नगर, आपातापा रोड येथील एका घरावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल ३९ किलो ४०० ग्रॅम ओलसर गांजा जप्त केला. गांजा आणि मोबाईल असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, राजेश प्रल्हाद भेंडवाल (वय ४५) याला ताब्यात घेण्यात आले आहे.



पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात अवैध धंदे आणि अंमली पदार्थांच्या तस्करीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी 'ऑपरेशन प्रहार' राबविण्यात येत आहे. १९ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असताना अकोट फाईल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संत कबीर नगर परिसरातील एका घरात विक्रीसाठी गांजा साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शासकीय पंच, नायब तहसीलदार, अधिकृत वजनकाटाधारक आणि छायाचित्रकाराच्या उपस्थितीत संबंधित घरावर छापा टाकला.

घरातील हॉलमध्ये कापडी पिशव्यांमध्ये लपवून ठेवलेले गांजाचे ३९ बंडल आढळून आले. इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर मोजणी केली असता त्याचे वजन ३९ किलो ४०० ग्रॅम भरले. जप्त गांजाची किंमत ९ लाख ८५ हजार रुपये, तर रेडमी मोबाईलची किंमत १५ हजार रुपये आहे. असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण, विष्णू बोडखे, माजिद पठाण, पोलीस हवालदार वसीमोद्दीन, किशोर सोनोने, रवि खंडारे, मंगेश इंगळे, स्वप्नील खेडकर, सुलतान पठाण, खुशाल अहमद, अमित दुबे, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज नेमाडे, शेख चंदेल, शेख हसन, अब्दुल माजीद, एजाज मानकर, धिरज वानखडे, पवन डंबलकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, सतीश पवार, अशोक सोनवने, भिमराव दिपके तसेच वाहनचालक प्रविण कश्यप, मनिष ठाकरे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### कारमधून आणला होता गांजा

पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान आरोपीने अन्य साथीदारांनी दोन दिवसांपूर्वी कारमधून गांजा आणून घरात साठवण्यासाठी दिल्याचे सांगितले. त्यामुळे या तस्करीमागील अन्य व्यक्तींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. आरोपीविरुद्ध अकोट फाईल पोलीस ठाण्यात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ८ (क), २० (ब) (ii) (सी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात सनी कांबळेला नियमित जामीन

## दुसरे जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय; ॲड. आकाश हिवराळे यांचा प्रभावी युक्तिवाद

■ प्रतिनिधी | पातूर ■

खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या सनी जगन्नाथ कांबळे याला अकोला येथील दुसरे जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्या वतीने ॲड. आकाश जी. हिवराळे यांनी न्यायालयात बाजू मांडली.

पातूर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ३३१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), १२६(२), ३५२ आणि ३५१(३) अंतर्गत सनी कांबळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात त्याला १६ जून २०२६ रोजी अटक करण्यात आली होती. यापूर्वी दोषारोपपत्र दाखल होण्याआधी केलेला जामीन अर्ज मागील



गुन्ह्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन न्यायालयाने फेटाळला होता.

दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपीच्या वतीने दुसरे जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला येथे नियमित जामिनासाठी अर्ज करण्यात आला. सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या उपस्थितीबाबत मुद्दे मांडले.

तसेच, केवळ मागील गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आधारे जामीन नाकारता येणार नाही, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचा दाखला देत ॲड. हिवराळे यांनी युक्तिवाद केला. सरकार पक्ष आणि बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीचा नियमित जामीन अर्ज मंजूर केला. या प्रकरणात ॲड. प्रदीप रोकडे, ॲड. शुभम करडिले, ॲड. अजय भारसाकळे, ॲड. विकास आठवले आणि ॲड. सौरभ खर्चे यांनी सहकार्य केले.

# गरबा क्वीन साठी पाच महिला स्पर्धकांची निवड



■ प्रतिनिधी | अकोला ■

मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात सुरू असलेल्या गरबा महोत्सवात गरबा क्वीन स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी रविवारी पाच महिला युवती स्पर्धकांची निवड करण्यात आली.या स्पर्धेत तब्बल ४० महिला मुलींनी सुरुवातीपासूनच सहभाग घेतला होता. पारंपरिक, आधुनिक गरब्याचे विविध प्रकार व सुरेल संगीताच्या तालावर परीक्षकांनी या ४० स्पर्धकांमधून ५ स्पर्धकांची निवड केली. अंतिम लढतीत यामधील विजेता व उपविजेता स्पर्धकास उत्कृष्ट पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत बहाल करण्यात येत आहे. दरम्यान महोत्सवाच्या अष्टमी उत्सवात महेश बजाज, सोमेश बजाज, कैलास अग्रवाल, सौ सुहासिनीताई धोत्रे, महापौर सौ शारदाताई खेडकर, सौ चंदा शर्मा, सौ चंदा ठाकूर, लीनेस क्लबचे समस्त पदाधिकारी, शरद सावजी समवेत प्रकाश शर्मा, नितीन लोटिया, एड देवेंद्र अग्रवाल, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, गुजराती समाज अध्यक्ष दिपेन शहा, कन्नुभाई शाह, पोद्दार शाळेचे क्रीडाशिक्षक ब्रजेश नायर, स्केटिंग प्रशिक्षक नरेंद्र अग्रवाल समवेत व्यापार, उद्योग, क्रीडा, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक महिला पुरुष मान्यवरांनी महोत्सवाला भेट देत उपक्रमाची प्रशंसा केली.कार्यक्रमात समितीचे वरिष्ठ पदाधिकारी हेमेन्द्र राजगुरू यांचा नातू देव प्रशांत राजगुरू हा लॉन टेनिस स्पर्धेत जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय अव्वल आल्याबद्दल त्याचा समितीच्या वतीने त्याची आई समवेत सत्कार करण्यात आला.

### शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी जिल्ह्यात १३ केंद्रांवर मतदान

■ प्रतिनिधी | अकोला ■

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूकीसाठी दि. २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दु. ४ या कालावधीत जिल्ह्यात एकूण १३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे.

निवडणूकीची प्रक्रिया शांततेने पार पाडण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांनी संबंधित कार्यक्षेत्रानुसार स्वतंत्र आदेशान्वये नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिका-यांची नियुक्ती केली आहे. अकोला शहर तालुक्यासाठी शहर उपविभागीय पोलीस अधिकारी हे नोडल, तर सिव्हिल लाईन ठाणेदार हे सहायक नोडल अधिकारी असतील. पातूर व बाळापूर तालुक्यासाठी बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी नोडल अधिकारी व बाळापूर आणि पातूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहायक नोडल अधिकारी असतील. अकोट व तेल्हारा तालुक्यासाठी अकोट एसडीपीओ हे नोडल अधिकारी अकोट शहर ठाणेदार, तसेच तेल्हारा ठाणेदार सहायक अधिकारी असतील.

### सोयाबीन कुटार गट्टू निर्मितीवर कारवाई करा

**बाळापूर :** बाळापूर व पातूर तालुक्यात सोयाबीन कापणीचा हंगाम सुरू असून, सोयाबीनपासून तयार होणारा चारा व कुटार मोठ्या प्रमाणात गट्टू बनविणाऱ्या कारखान्यांकडून वापरला जात आहे. मात्र, सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांना चारा मिळणे कठीण झाले असून, उपलब्ध चाऱ्याचा मोठ्या प्रमाणात गट्टू निर्मितीसाठी वापर होत असल्याने पशुपालकांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेश काळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका उपाध्यक्ष गणेश खोडके यांनी बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देऊन सोयाबीन कुटाराचा गट्टू तयार करणाऱ्या संबंधित कंपन्या व कारखान्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर प्रतिबंध घालण्याची मागणी केली आहे.



जुने शहरची शारदा भवानी नवरात्रोत्सव मंडळ, मारोती नगर, अकोला



श्री पवनपुत्र नवरात्री नवदुर्गा उत्सव मंडळ (वर्ष १२ वे) शिवनगर जुने शहर अकोला.

# वारुळ्यात चार एकरांतील सोयाबीनची गंजी पेटवली; शेतकऱ्याला धक्का

## अज्ञात व्यक्तीचे कृत्य; शेतकऱ्याची प्रकृती बिघडल्याने रुग्णालयात दाखल

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील वारुळा येथे अज्ञात व्यक्तीने शेतातील सोयाबीनच्या गंजीला आग लावल्याची घटना घडली. या आगीत शेतकरी महेश रामभाऊ मोहोकार यांच्या चार एकरांतील सोयाबीनचे नुकसान झाले. डोळ्यांदेखत सोयाबीनची गंजी जळताना पाहून त्यांना मोठा मानसिक धक्का बसला. ते खाली कोसळल्याने उपस्थितांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.



ही घटना सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. अज्ञात व्यक्तीने सोयाबीनच्या गंजीच्या चारही बाजूंनी आग लावल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. गंजीतून निघणारा धूर आणि आगीच्या ज्वाळा परिसरातून दिसत असल्याने गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, पाण्याअभावी आग विझविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. या घटनेची माहिती संदीप काळे यांनी अकोट पोलिसांना दिली. त्यानंतर अकोट ग्रामीण पोलिसांसह अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत सोयाबीनच्या गंजीचे मोठे नुकसान झाले होते.

घटनास्थळी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे बीट जमादार निलेश खंडारे, पोलीस हेड कॉन्स्टेबल शिवकुमार तोमर, पोलीस कॉन्स्टेबल नितीन तेलगोटे, सागर नागे व अमोल म्हस्के यांच्यासह कृषी अधिकारी आणि तलाठी यांनी पाहणी करून पंचनामा केला. नुकसानीचा अहवाल अकोट तहसीलदारांकडे सादर करण्यात येणार असल्याचे समजते. या घटनेमुळे शेतकरी महेश मोहोकार यांच्यावर संकट कोसळले असून, सोयाबीनची गंजी पेटविणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्याची मागणी परिसरातून होत आहे.

# यशस्वी जीवनासाठी नऊ सूत्रे आत्मसात करा – दिलीप स्वामी

## 'उत्सव नवरात्रीचा, प्रचार महाबीजचा, सत्कार रणरागिणीचा' उपक्रमाचा समारोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

विज्ञानवादी अध्यात्माचा स्वीकार, सकारात्मक विचार, आरोग्यदायी जीवनशैली, उत्तम संस्कार, संकटांवर मात करण्याची जिद्द, वाचन संस्कृती, जीवनाचा आनंद, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि कर्मयोगाची कास ही यशस्वी व अर्थपूर्ण जीवनाची नऊ सूत्रे आहेत. प्रत्येकाने ती आत्मसात करून आपले जीवन समृद्ध करावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांनी केले.

महाबीजच्या वतीने आयोजित 'उत्सव नवरात्रीचा, प्रचार महाबीजचा, सत्कार रणरागिणीचा' या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. महाव्यवस्थापक डॉ.



संजय गरकल, व्ही. आर. देशमुख, पी. जी. पागृत, व्ही. व्ही. ठाकरे, प्रफुल्ल लहाने आणि मनीष यादव उपस्थित होते. स्वामी म्हणाले, यशस्वी जीवन म्हणजे केवळ वैयक्तिक प्रगती नव्हे, तर विचार, आचार, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय होय. अध्यात्मामुळे विचारांना दिशा मिळते, संस्कारांमुळे व्यक्तिमत्त्व घडते, तर संकटांवर मात करण्याची जिद्द यशाचा मार्ग सुकर करते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्रीशक्तीचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

यावेळी व्याख्याते विशाल नंदागवळी यांनी भारतातील प्रेरणादायी महिलांचे कार्य आणि त्यांनी दिलेल्या वैचारिक वारशावर प्रकाश टाकला. राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यासह विविध क्षेत्रांत कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नव्या पिढीने शिक्षण, स्वाभिमान, सामाजिक जबाबदारी आणि कर्तृत्वाची मूल्ये जोपासावीत, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या महाबीज कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रशांत पागृत यांनी केले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी हातुलकर यांनी केले, तर मयुरी निसाळ यांनी आभार मानले. महाबीजचे राज्यातील सर्व विभागप्रमुख व कर्मचारी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले, तर मुख्यालयातील कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६७०/२०२६ — प्रोसेस नं.१३११७/२०२६
चौ.ता. १८/११/२०२६ — दिनांक : १४/१०/२०२६

**अर्जदार :** १. सितलसिंह विजयसिंह ठाकूर रा. निसर्ग रो-हाउस, कौलखेड रोड, राउत प्रोव्हिजन जवळ, एस.टि. क्वॉर्टर जवळ,अकोला. ता. जि. अकोला. २. पंकजसिंह विजयसिंह ठाकूर रा. वाशिम बायपास रोड, स्वामी कॉन्व्हेंट जवळ, अंबिका नगर, जुने शहर, अकोला : ता. जि. अकोला. मो. क्र. ९०६७९५१२२९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विजयसिंह कुंजबिहारीसिंह ठाकूर २. ललिता विजयसिंह ठाकूर
**पत्ता :-** रा. अंबिका नगर, वाशिम बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९०६७९५१२२९

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विजयसिंह कुंजबिहारीसिंह ठाकूर यांचे दि. २२/१२/२०१९ रोजी व मयत ललिता विजयसिंह ठाकूर यांचे दि. १६/०८/२०२४ रोजी अंबिका नगर, वाशिम बायपास रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/११ / २०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७३७/२०२६ — प्रोसेस नं.१३१६५/२०२६
चौ.ता. ३०/११/२०२६ — दिनांक : १५/१०/२०२६

**अर्जदार :** १. सिंधुबाई सुखदेवराव बोटे २. राजेश सुखदेवराव बोटे मो. क्र. ९७६७४५७७२७, ३. गणेश सुखदेवराव बोटे ४. सुभाष सुखदेवराव बोटे सर्व रा. लोकमान्य नगर, बाळापूर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुखदेव भिकाजी बोटे
**पत्ता :-** रा. लोकमान्य नगर, बाळापूर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखदेव भिकाजी बोटे यांचे दि. ०८/०३/२०२६ रोजीराहते घरी लोकमान्य नगर, बाळापूर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६२३/२०२६ — प्रोसेस नं.१२३११/२०२६
चौ.ता. १७/११/२०२६ — दिनांक : २४/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती वंदना विलासराव शाहाकार २. विशाल विलासराव शाहाकार दोघेही रा. व्दारा विलासराव शाहाकार, शिव दर्शन, शास्त्री नगर, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजारामजी शिवरामजी शाहाकार
**पत्ता :-** रा. व्दारा विलासराव सहकार, शिव दर्शन, शास्त्री नगर, पक्की खोली,सिंधी कॅम्प, अकोला. पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजारामजी शिवरामजी शाहाकार यांचे दि. ०२/१२/२०१० रोजी मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७२४/२०२६ — प्रोसेस नं.१२९४९/२०२६
चौ.ता. २६/११/२०२६ — दिनांक : ०९/१०/२०२६

**अर्जदार :** १. रेखा दिलीपकुमार पाडीया २. अंकित दिलीप पाडीया ३. आशुतोष दिलीपकुमार पाडीया सर्व रा. रजपुतपुरा, गोपाल कुटीया जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिलीप रामधन पाडीया
**पत्ता :-** रा. रजपुतपुरा, गोपाल कुटीया जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिलीप रामधन पाडीया यांचे दि. २७/०५/२०२६ रोजी राहते घरी रजपुतपुरा, गोपाल कुटीया जवळ, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६८३/२०२६ — प्रोसेस नं.१२८३३/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ — दिनांक : ०७/१०/२०२६

**अर्जदार :** १. किर्ती गिरीष मोटवानी रा. संत निरंकारी भवन जवळ कारंजा लाड, वाशिम, जि. वाशिम. २. प्रीत विजय गाडीचा रा. डॉ. तनवानी जवळ, रामपुरी कॅम्प अमरावती. ता. जि. अमरावती. ३. प्रनिषा हिमांशु तनवानी रा. एफ - ६२, व्दारका सिटी, वंश रूप वार्ड, काटनी, मध्यप्रदेश. ४. सुरज रमेशलाल जगमलानी रा. साईकृपा अपार्टमेंट जवळ, आदर्श कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रमेशलाल अयलदास जगमलानी २. कमलाबाई रमेशलाल जगमलानी
**पत्ता :-** रा. साईकृपा अपार्टमेंट जवळ, आदर्श कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेशलाल अयलदास जगमलानी यांचे दि. १४/०२/२०२४ रोजी व मयत कमलाबाई रमेशलाल जगमलानी यांचे दि. ०५/०२/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१ / ११ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३०७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# राजकारणात छत्तीसचा आकडा, देवीच्या दरबारात एकाच रांगेत

## खा.अमर काळे, आ.सुमित वानखेडे आणि माजी आ.दादाराव केचे भजनात तल्लीन; राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण



**राजकारणात अंतर, भक्तीत मात्र एकत्र**

माँ पद्मावती दुर्गा पूजा उत्सव समितीचे टिंकेश महाजन आणि प्रशांत महाजन यांच्या पुढाकारातून हा भव्य भजन जागरण सोहळा आयोजित करण्यात आला. आर्वीतील राजकीय समीकरणे आणि नेत्यांमधील मतभेदांच्या पार्श्वभूमीवर एकाच ठिकाणी जमलेल्या आजी-माजी आमदारांसह खासदारांच्या उपस्थितीने वेगळीच चर्चा रंगली. निवडणुकीच्या मैदानात आरोप-प्रत्यारोपांची धग असो किंवा राजकीय वर्चस्वाची लढाई, देवीच्या दरबारात मात्र भक्तीचा सूर महत्त्वाचा ठरला. या निमित्ताने राजकीय मतभेदांपलीकडे सामाजिक आणि धार्मिक सलोखा जपण्याची अपेक्षाही व्यक्त होत आहे.

**आर्वी/जनमाध्यम**

राजकारण म्हटले की आरोप-प्रत्यारोप, मतभेद आणि एकमेकांवर कुरघोडी करण्याचे डाव आलेच. मात्र, भक्तीच्या दरबारात राजकीय गणितांनाही विराम मिळतो, याचा प्रत्यय आर्वी शहरातील पद्मावती चौकात आला. माँ पद्मावती दुर्गा पूजा उत्सव समितीच्या वतीने आयोजित भव्य भजन जागरण सोहळ्यात खा.अमर काळे, आ.सुमित वानखेडे आणि माजी आ.दादाराव केचे हे तिन्ही लोकप्रतिनिधी एकत्र आले. राजकीय पटावर वेगवेगळ्या भूमिका असलेल्या नेत्यांची ही उपस्थिती शहरात चर्चेचा विषय ठरली.

भाजपचे आजी-माजी आमदार राजकीयदृष्ट्या कितीही वेगवेगळ्या भूमिकांत दिसत असले, तरी देवीच्या जागरणात मात्र चित्र वेगळे होते.राजकारणातील छत्तीसचा आकडा बाजूला ठेवून भक्तीच्या सोहळ्यात तिन्ही नेते एकाच ठिकाणी बसलेले दिसले. विशेष म्हणजे, विरोधी पक्षातील खासदारही दोन्ही आमदारांच्या शेजारी बसून भजनांचा आनंद घेताना दिसले. राजकीय व्यासपीठांवर मतभेद असले, तरी धार्मिक व्यासपीठावर एकत्र येण्याचा हा प्रसंग लक्षवेधी ठरला.

माँ पद्मावती दुर्गा उत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यात बुऱ्हाणपूरच्या खुशबू चौकसे, आर्वीच्या अदिती चौबे आणि मिताली चौबे यांनी सादर केलेल्या मधुर भजनांनी उपस्थितांना

मंत्रमुग्ध केले. श्री श्यामबाबांच्या भजनांसह दुर्गामातेच्या जयघोषाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्यामभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# प्रथमच श्री गजानन महाराजांच्या मूळ पादुकांचे दर्शन

## २३ व २४ ऑक्टोबरला भाविकांना लाभणार दुर्मीळ पर्वणी

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

गण गण गणात बोते... या भक्तिमय जयघोषाने सिंदी रेल्वे नगरी दुमदुमणार आहे. श्री गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होण्याची आणि त्यांच्या मूळ पादुकांचे दर्शन घेण्याची दुर्मीळ संधी प्रथमच शहरातील भाविकांना लाभणार आहे. येत्या २३ व २४ ऑक्टोबर रोजी बाजार चौकातील श्री गणपती मंदिर देवस्थानात दोन दिवसीय धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा हा सोहळा गजानन भक्तांसाठी अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे. शुक्रवार,२३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री गजानन महाराजांच्या पादुकांचे सिंदी रेल्वे येथे आगमन होणार आहे. बसस्थानकापासून श्री गणपती मंदिरापर्यंत स्वागत यात्रा




काढण्यात येईल. शिवगर्जना ढोल पथकाच्या गजरात निघणाऱ्या या यात्रेत भक्तिमय वातावरणात पादुकांचे स्वागत करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता हरिपाठ, तर ७.१५ वाजता नैवेद्य आणि महाआरती होईल. २४ ऑक्टोबर रोजी पहाटे काकडा आणि आरतीने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ होईल. सकाळी ६ वाजता पादुकांचा अभिषेक, तर ७ वाजता नगर प्रदक्षिणा आणि भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सकाळी १०.४५ वाजता मंदिरात पादुकांचे आगमन व महाआरती, तर ११ वाजता नैवेद्य महाआरती होईल.दुपारी ३ वाजता नागपूर येथील जयंतजी बेलगावकर यांचे 'श्री गजानन अनुभूती' या विषयावर अनुभव कथन होणार आहे. यावेळी श्री गजानन महाराज पादुका संस्थान, श्रीक्षेत्र मुंडगाव, जिल्हा अकोला येथील संस्थान पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येईल. सायंकाळी हरिपाठ, महाआरती आणि पादुकांच्या प्रस्थानानंतर रात्री ७.३० वाजेपासून महाप्रसादाचे वितरण होणार आहे. श्री गजानन महाराजांच्या मूळ पादुकांचे दर्शन म्हणजे भक्तांसाठी केवळ धार्मिक विधी नव्हे, तर श्रद्धा आणि आध्यात्मिक समाधानाचा अनमोल क्षण आहे.सिंदी रेल्वे शहरात प्रथमच आयोजित या ऐतिहासिक धार्मिक महोत्सवात शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री गजानन महाराजांच्या पादुकांचे दर्शन घ्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# टेबल टेनिस प्रशिक्षकांच्या परीक्षेत यश

## कृष्णा डगवार राज्यात प्रथम; ओम गोडे यांना ५० पैकी ५० गुण



**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या वतीने सांगली येथे आयोजित प्रशिक्षक प्रशिक्षण शिबीर व परीक्षेत वर्धा जिल्ह्यातील प्रशिक्षकांनी उल्लेखनीय यश संपादन केले. कृष्णा डगवार यांनी लेव्हल १ आणि लेव्हल २ या दोन्ही परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून जिल्ह्याचा गौरव वाढविला. ओम गोडे यांनी लेव्हल १ परीक्षेत ५० पैकी ५० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटना आणि सूरज फाउंडेशन, सांगली यांच्या संयुक्त सहकार्याने १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान नवकृष्णा व्हॅली गुरुकुल येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रशिक्षक सहभागी झाले होते.

ओम तिवारी यांनी लेव्हल २ परीक्षेत चौथा क्रमांक मिळविला. स्वप्नील कांबळे, अदिती भोयर आणि लेखिका गौलकर यांनीही 'ए' श्रेणीत यश मिळविले.प्रशिक्षकांच्या या यशामुळे वर्धा जिल्ह्यातील टेबल टेनिस खेळाच्या विकासाला चालना मिळणार असून, नवोदित खेळाडूंना शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होईल.वर्धा जिल्हा हौशी टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष अतल बिहारी पांडे, उपाध्यक्ष प्रदीप बजाज, डॉ. प्रवीण धाकटे, सचिव ओम तिवारी यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी यशस्वी प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

# कानकाटीजवळ गांजा तस्करीचा पर्दाफाश

## १.१७ किलो गांजासह मोपेड आणि मोबाईल जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**वर्धा/जनमाध्यम**

नागपूर ते जाम महामार्गावरील कानकाटी परिसरात गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात पकडले. सारंग विनोद कुंभलकर (वय २८, रा. वॉर्ड क्रमांक ३, जाम, ता. समुद्रपूर) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून १ किलो १७० ग्रॅम गांजा, मोपेड आणि मोबाईल असा एकूण १ लाख ६८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात दोघांविरुद्ध समुद्रपूर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री आणि तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेदरम्यान १८ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार नागपूर-जाम महामार्गावरील कानकाटी येथे सापळा रचण्यात आला.

यावेळी एमएच ३२ एटी १२२६ क्रमांकाच्या होंडा ॲक्टिव्हा मोपेडवरून गांजाची वाहतूक करणाऱ्या सारंग कुंभलकर याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडील गांजा विक्रीसाठी नेला जात असल्याचे तपासात समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. हा गांजा नागपूर येथील खामला रोडवरील दंतेश्वरी नगर परिसरात राहणाऱ्या भूषण ऊर्फ मॅड्डी वर्मा याच्याकडून खरेदी केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणात दोघेही संगनमताने गांजाची तस्करी करून विक्री करीत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्तीची कारवाई पूर्ण करून दोघांविरुद्ध समुद्रपूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सिनुकुमार बानोत तसेच पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित, सागर भोसले आणि प्रतीक वांदिले यांनी केली.

# पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी देवी

## बाल गीताई दुर्गोत्सव मंडळाचा रौप्य महोत्सव उत्साहात

**वर्धा/जनमाध्यम**

गीताईनगर, नालवाडी येथील बाल गीताई दुर्गा पूजा उत्सव मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. मंडळाच्या २५ व्या वर्षानिमित्त देवीच्या मंडपात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा विशेष देखावा साकारण्यात आला आहे. मंडपाच्या बाहेरील आकर्षक विद्युत रोषणाई भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

रौप्य महोत्सवानिमित्त मंडळाने धार्मिक उत्सवाला सामाजिक उपक्रमांची जोड दिली आहे. यामध्ये आरोग्य शिबीर, लहान मुलांसाठी विविध बौद्धिक स्पर्धा, गरबा महोत्सव तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



करण्यात आले आहे.धार्मिक श्रद्धेसोबतच पर्यावरणाविषयी जागृती आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांचा सहभाग वाढविणे आणि नव्या पिढीमध्ये सामाजिक जाणिवा रुजविण्याचा उद्देश मंडळाने ठेवला आहे. रौप्य महोत्सवानिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन; युवकांना सहभागाचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी क्रीडा व कृषि विभागाच्यावतीने ३० ते ३१ ऑक्टोंबर या कालावधीत जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात जास्तीत जास्त युवक व युवतींनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२६-२७ या वर्षात केंद्र शासनामार्फत विकसित भारत चँलेंज ट्रॅक यामधील नवसंकल्पना युवा महोत्सवाकरीता देण्यात आलेली आहे. या संकल्पनेवर आधारीत युवा महोत्सवाचे आयोजन दि.३० ते ३१ ऑक्टोंबर या कालावधीत विकास भवन येथे करण्यात आले आहे. महोत्सवात वय १५ ते २९ वर्षापर्यंतच्या युवकांना सहभाग नोंदविता येणार आहे.

महोत्सवामध्ये समुह लोकनृत्य, वैयक्तिक लोकनृत्य, लोकगीत समुह, वैयक्तिक स्पर्धेचा समावेश असणार आहे. यासाठी कलाकारांना वाद्यवृंद व साहित्य सोबत आणणे आवश्यक आहे. लोकगीत व लोकनृत्य सादर करणाऱ्या कलाकारांनी पुर्वध्वनी मुद्रीत टेप अथवा रेकॉर्डीगवर कार्यक्रम सादर करता येणार नाही. लोकगीत व लोकनृत्य चित्रपटबाह्य असावे. साथसंगत सोबत असणे आवश्यक आहे.

विकसित भारत चँलेंज ट्रॅक या विषयावर कथा लेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता संकल्पनावर आधारीत स्पर्धा राहणार आहे. महोत्सवात प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकांना विभागीय महोत्सवाकरीता प्रवेश देण्यात येईल. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, युवक मंडळे, संगीत विद्यालय, स्वयंसेवी संस्थेतील युवक युवती सहभागी होऊ शकतात. महोत्सवात सहभाग नोंदविण्यासाठी दि.२८ ऑक्टोंबर पर्यंत सहभागी कलाकारांच्या नावासह प्रवेश यादी, मोबाईल क्रमांक, संस्थेचे नाव व प्रत्येकाच्या जन्मतारखेचा दाखला व रहिवासी पुराव्यासह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यायात सहभाग नोंदवावा किंवा sportwda@yahoo.com या ईमेल सादर करावा. अधिक माहिती व नियम अटीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांनी कळविले आहे.

# विष प्राशन केलेल्या तरुणाचा मृत्यू

**वर्धा**-विषारी औषध प्राशन केल्याने उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या २६ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना १३ ऑक्टोबर रोजी घडली.पोलीस नोंदीनुसार, आशिष जानराव हेटे असे मृत तरुणाचे नाव असून तो यवतमाळ जिल्ह्यातील रामजीतकर येथील रहिवासी असल्याची नोंद आहे.

त्याने विषारी औषध प्राशन केल्यानंतर त्याला १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.२० वाजता सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.मात्र, १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १.२५ वाजता त्याचा मृत्यू झाला. रुग्णालय प्रशासनाने याबाबतची माहिती सेवाग्राम पोलिसांना लेखी स्वरूपात दिली.प्राथमिक नोंदीनंतर घटनास्थळ देवळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधित कागदपत्रे देवळी पोलिसांकडे पाठविण्यात आली. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

# धनादेश अनादर प्रकरणी कर्जदाराला पाच महिने कारावास

## ६२ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश

**हिंगणघाट/जनमाध्यम**

कर्जाची परतफेड करण्यासाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी न्यायालयाने कर्जदाराला पाच महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच ६२ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश तृतीय सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सी. ए. गवई यांनी दिले.

शंकर सूर्यभान मडावी, रा. नरसाळा असे शिक्षा झालेल्या कर्जदाराचे नाव आहे. त्यांनी हिंगणघाट नागरी सहकारी पतसंस्थेकडून आवश्यक दस्तऐवज पूर्ण करून २५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, कर्जाची परतफेड केली नाही. संस्थेने वारंवार विनंती केल्यानंतर त्यांनी परतफेडीसाठी ३० हजार रुपयांचा धनादेश दिला. हा धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता अनादरित झाला.

यानंतर पतसंस्थेने न्यायालयात प्रकरण दाखल केले. सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने कर्जदार दोषी असल्याचे ठरवून पाच महिन्यांच्या कारावासासह ६२ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. नुकसानभरपाई देण्यात कसूर झाल्यास अतिरिक्त कारावासाची शिक्षाही सुनावण्यात आली. पतसंस्थेतर्फे ?ड. एच. एच. बोंडे यांनी बाजू मांडली.

# गळफास घेऊन आत्महत्या

**सेवाग्राम**-सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वार्ड क्रमांक ३१ मधील रवी नगर परिसरात ४२ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरातील खोलीत छताच्या पंख्याला दुपट्ट्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उघडकीस आली. माणिक रामकृष्ण सयाम असे मृताचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, माणिक हा १८ ऑक्टोबर रोजी दुपारी घरी आला होता. बाहेर वाद झाल्याने मित्राने मारहाण केल्यामुळे डोक्याला दुखापत झाल्याचे त्याने आईला सांगितले होते. त्यानंतर तो स्वतःच्या खोलीत गेला.सायंकाळी सातच्या सुमारास आई त्याला पाहण्यासाठी गेली असता खोलीचा दरवाजा आतून बंद होता. पाहिले असता माणिक गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. नातेवाइकांनी दरवाजा तोडून त्याला खाली उतरविले. मात्र, तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.मृताला दारू पिण्याचे व्यसन होते. पत्नी सोडून गेल्याने तो मानसिक विवंचनेत राहत असल्याचे नातेवाइकांनी पोलिसांना सांगितले.

**तरुणाची आत्महत्या**

**हिंगणघाट**-तालुक्यातील मुरपाड येथे २२ वर्षीय तरुणाने घराशेजारील जुन्या गोठ्यात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उघडकीस आली. हरीष ओमप्रकाश विरुळकर असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हरीष हा कुटुंबासोबत मुरपाड येथे राहत होता. त्याचे वडील आणि तो शेती करीत होते. घटनेच्या दिवशी दुपारी तीनच्या सुमारास वडील ओमप्रकाश विरुळकर हे बैल घेऊन शेतात गेले होते. त्यावेळी हरीष घरीच होता. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वडील शेतातून घरी परतले असता त्यांना घराशेजारील जुन्या गोठ्यात हरीष नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला.

## कर्जाच्या हप्त्यांनी घराघरांत कलह, उत्पन्न तुटपुंजे, कर्जाचा डोंगर मोठा

# मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात ग्रामीण कुटुंबांची होरपळ

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याच्या नावाखाली सुरू झालेला मायक्रो फायनान्सचा कर्जपुरवठा ग्रामीण कुटुंबांसाठी डोकेदुखी ठरत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. हातात कर्जाची रक्कम पडताना दिसणारा दिलासा हप्ते फेडण्याची वेळ येताच आर्थिक विवंचनेत बदलत आहे. उत्पन्नाचे साधन मर्यादित,घरखर्चाचा डोंगर आणि डोक्यावर अनेक कर्जांचे हप्ते अशा कात्रीत ग्रामीण कुटुंबे सापडत आहेत. वसुलीच्या तगाद्यामुळे मानसिक तणाव वाढत असून, कर्जाच्या पैशांवरून घराघरांत वादाची ठिणगी पडत आहे.काही कुटुंबांवर तर गाव सोडण्याची वेळ आल्याचे चित्र समोर येत आहे.

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी कर्ज उपलब्ध करून देणे ही मायक्रो फायनान्सची संकल्पना आहे. छोटा व्यवसाय उभारणे, रोजगार सुरू करणे आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालणे हा त्यामागील उद्देश.

मात्र, कर्ज घेताना कुटुंबाची वास्तविक आर्थिक परिस्थिती, उत्पन्नाचे साधन आणि आधीपासून असलेल्या कर्जांचा पुरेसा विचार होतो का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कर्जाचे हप्ते थकल्यानंतर वारंवार संपर्क आणि वसुलीसाठी होणाऱ्या तगाद्याबाबत काही कर्जदारांकडून तक्रारी केल्या जात आहेत.

कर्जवसुलीच्या प्रक्रियेत अनुचित दबाव येत असल्यास त्याची चौकशी होणे आवश्यक आहे.

आर्थिक मदतीच्या नावाखाली घेतलेले कर्जच मानसिक त्रासाचे कारण ठरत असेल, तर या व्यवस्थेच्या कार्यपद्धतीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.



**हप्त्यांच्या ओझ्याखाली संसाराची घडी विस्कटली**

शेती, शेतमजुरी आणि छोट्या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न अनेकदा अनियमित असते. त्यातून मुलांचे शिक्षण, आजारपणावरील खर्च, घरखर्च आणि शेतीच्या गरजा भागविताना आधीच दमछाक होते. त्यात दर आठवड्याला किंवा ठराविक कालावधीनंतर भरावयाच्या कर्जाच्या हप्त्यांची भर पडल्याने आर्थिक गणित कोलमडते.

हप्ते भरण्यासाठी पैशांची जुळवाजुळव करताना पती-पत्नीमध्ये वाद होणे, नातेवाईकांकडून मदत मागावी लागणे आणि एका कर्जाची परतफेड करण्यासाठी दुसरे कर्ज घेण्याची वेळ येणे, अशा समस्यांमुळे कर्जाचे दुष्टचक्र अधिक घट्ट होऊ शकते. आर्थिक तणावाचा परिणाम केवळ कर्जदार महिलेवरच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाच्या मानसिक स्वास्थ्यावर होतो.

**कर्जाच्या विळख्यातून मुक्त करणार कोण**

ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनविण्याचा उद्देश महत्त्वाचा असला, तरी कर्जवाटप आणि वसुलीच्या पद्धतींची तपासणी होणेही तितकेच आवश्यक आहे. कर्जदारांची परतफेड क्षमता तपासणे, कर्जाच्या अटी स्पष्ट करणे, तक्रारींचे निवारण करणे आणि वसुलीच्या प्रक्रियेत नियमांचे पालन होते की नाही, यावर संबंधित यंत्रणांनी लक्ष ठेवण्याची गरज आहे.

महिलांना केवळ कर्ज देऊन आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. त्यासाठी रोजगाराच्या संधी, लघुउद्योगांचे प्रशिक्षण, आर्थिक साक्षरता आणि उत्पन्नवाढीचे शाश्वत मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.कर्ज हे प्रगतीचे साधन ठरावे, संसार उद्ध्वस्त करणारे ओझे नव्हे ग्रामीण कुटुंबांची आर्थिक कोंडी आणि कर्जवसुलीबाबतच्या तक्रारी लक्षात घेता प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन वस्तुस्थितीची तपासणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३२३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# धरणातील पाणी चारगड नदीपात्रात सोडून नदी पुन्हा प्रवाहित करा

## युवासेनेच्या नेतृत्वात ऊदखेड बसस्टॉपवर चक्काजाम आंदोलन

**मोर्शी/प्रतिनिधीः-**

गेल्या कित्येक वर्षानंतर यावर्षी भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारगड धरणातील पाणी चारगड नदीपात्रात सोडून नदी पुन्हा प्रवाहित करण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी युवासेनेचे जिल्हाप्रमुख उमेश शहाणे यांच्या नेतृत्वात आज दि.१९ ऑक्टोबर रोजी हजारो शेतकरी, शेतमजूर, नागरिक यांच्या उपस्थितीत ऊदखेड येथील बसस्टॉपवर चक्काजाम आंदोलन छेडण्यात आले.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपली बैलबंडी रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी मात्र तो प्रयत्न हाणून पाडला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित शेतकऱ्यांनी आम्हाला पाणी द्या पाणी द्या अशा प्रकारची नारेबाजी करून परिसर दणाणून सोडला. आंदोलनाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी पोलीस दलासह सैनिक तैनात करण्यात आले होते. त्यामुळे उदखेड गावाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. या



चक्काजाम आंदोलनाची सुरुवात दु.११ वाजता करण्यात आली. आंदोलनाला संबोधित करतांना खेड येथील गोकुळ राऊत यांनी यापूर्वी याच मागणीसाठी झालेल्या आंदोलनात माझा भाऊ प्रफुल्ल राऊत याचा गोळीबारात बळी गेला. तरीसुद्धा आम्हाला न्याय मिळाला नाही २२ वर्षापासून आम्ही शेतकरी न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे त्यांनी सांगितले. उद्धव ठाकरे गट युवासेनेचे जिल्हाप्रमुख उमेश शहाणे यांनी चारगड धरणात पुरेसा जलसाठा उपलब्ध असतांना या दुष्काळी परिस्थितीत जीवन मरणाशी संघर्ष करणाऱ्या शेतकरी शेतमजुरांसाठी राखीव पाण्याचा साठा चारगड नदीपात्रात सोडण्याची मागणी त्यांनी रेटून धरली. शेवटी एक वाजताचे दरम्यान अचलपूर जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता उमप यांनी घटनास्थळी भेट देऊन चारगड प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्याकरिता जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे सांगितले. मंजुरीसाठी दि.२१ ऑक्टोंबर बुधवार रोजी मी स्वतः जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन किती पाणी नदीपात्रात सोडायचे याची मंजुरात घेऊन येत्या सप्ताहात पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करू असे आश्वासन दिल्यावर आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन तात्पुरते मागे घेतले असले. आश्वासन दिल्याप्रमाणे पाणी सोडण्यात आले नाही तर दि.२५ ऑक्टोंबर रोजी पुन्हा त्याच ठिकाणी आंदोलन छेडण्यात येईल असे उमेश शहाणे यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात युवा सेनेचे जिल्हाप्रमुख उमेश शहाणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव विपुल भडांगे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष भूषण कोकाटे, मुकुंद ठाकरे, अंबादास गेडाम, गजानन शहाणे, प्रवीण चौधरी, गोकुळ राऊत, सुनील कोंडे, नरेश वानखेडे, अशोक ठाकरे, मनोज भारसाखडे, विष्णू वानखडे, घनश्याम शहाणे, मुरलीधर खंडारकर, जगदीश भोकरे, सुनील लुंगे, निलेश पोहकार, दिपक भोकरे, नितेश सावरकर, राजेंद्र घाटोळे, सतीश ठाकरे, प्रभाकर वाट, पंडित चव्हाण, रोशन बुरंगे, रुपेश लुंगे, राजेश शहाणे, सागर शहाणे, प्रथमेश शहाणे, मंगेश आढाऊ तसेच चारगड नदीपात्रातील बरेचसे शेतकरी उपस्थित होते.

# पिरॅमिड ग्रुप आणि संकल्प फाउंडेशनतर्फे दीक्षाभूमीवर सलग २१ व्या वर्षी अखंड भोजनदान सेवा

## -गुणवंत देवपारे यांचा उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः--**

'शब्दांपेक्षा कृती श्रेष्ठ...' या उक्तीचा प्रत्यय देत, पवित्र दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी पिरॅमिड ग्रुप ऑफ कंपनीज आणि संकल्प फाउंडेशनच्या वतीने यंदा सलग २१ व्या वर्षी अखंड भोजनदान सेवा उपक्रम राबविला जात आहे. उद्योजक व समाजसेवक गुणवंत देवपारे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेला हा सेवेचा वारसा यंदा २०२६ मध्ये २१ व्या वर्षात यशस्वीपणे पदार्पण करत आहे.





धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ऐतिहासिक व पावन अशा दीक्षाभूमीवर देशभरातून लाखो भीमअनुयायी दाखल होतात. या क्रांतीभूमीवर येणाऱ्या एकाही बांधवाला उपाशी राहावे लागू नये, या एकाच प्रामाणिक व उदात्त भावनेतून मागील २० वर्षांपासून सातत्याने भोजनदानाचा हा उपक्रम राबवला जात आहे. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी इमान राखून समाजाचे ऋण फेडण्याचा हा एक नम्र प्रयत्न असल्याचे पिरॅमिड ग्रुपतर्फे सांगण्यात आले.

या उपक्रमाविषयी बोलताना पिरॅमिड ग्रुप ऑफ कंपनीज व संकल्प फाउंडेशनचे प्रमुख गुणवंत देवपारे म्हणाले, गेल्या २० वर्षांपासून सुरू असलेली ही सेवा यंदा २१ व्या वर्षात प्रवेश करत आहे, ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. महामानवाच्या विचारांवर चालत समाजाची सेवा करणे हेच आमचे आद्य कर्तव्य आहे. पवित्र दीक्षाभूमीवर येणाऱ्या सर्व बंधू-भगिनींचे आम्ही सहर्ष स्वागत करतो. दीक्षाभूमीवर येणाऱ्या सर्व अनुयायांसाठी ही भोजनदान सेवा अविरत सुरू राहणार असून, पिरॅमिड ग्रुप व संकल्प फाउंडेशनच्या या सामाजिक बांधिलकीचे व सेवाभावी वृत्तीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# रक्तदान, अंध विद्यार्थ्यांना साहित्य भेट देत बंटी रामटेके यांचा वाढदिवस साजरा

## -बच्चू कडू यांच्या विचारांतून प्रेरणा घेत सामाजिक उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-**

वाढदिवस म्हटला की जल्लोष, हारतुरे आणि मोठ्या सोहळ्यांचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र, वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू घटकांसोबत वाटून घेत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यातच खरा आनंद असल्याचा संदेश प्रहार जनशक्ती संघटनेचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांनी दिला. आपल्या वाढदिवसानिमित्त कोणताही मोठा दिखाऊ सोहळा न करता शहरातील भिवापूरकर अंध विद्यालयात रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य भेट आणि अल्पोपाहाराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात तब्बल ५८ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, तर विद्यालयाला दैनंदिन वापरासाठी आवश्यक साहित्य भेट देण्यात आले. सामाजिक संवेदनशीलतेची जाणीव करून देणाऱ्या या उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याचा एक वेगळा आदर्श निर्माण झाला.

वाढदिवसाच्या निमित्ताने भिवापूरकर अंध विद्यालयातील



विद्यार्थ्यांसाठीही विशेष उपक्रम राबविण्यात आला. विद्यालयाला शंभर ताटे, शंभर प्लेट्स आणि शंभर ग्लास यांसह आवश्यक साहित्य भेट देण्यात आले.

आमदार बच्चू कडू यांच्या विचारांतून प्रेरणा घेत प्रहार जनशक्ती संघटना सामाजिक कार्यात पुढे जात आहे. महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वाखाली शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर आणि अंध विद्यालयाला साहित्य भेट हा त्याच कार्याचा भाग ठरला.

या कार्यक्रमाला प्रहार जनशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्यासह संघटनेचे शहर संपर्क प्रमुख गोलू पाटील, हॉकर्स युनियन शहर प्रमुख गणेश मारोटकर, उपसरपंच बेलोरा ग्रा. पं. अतुल शिंगण, प्रदेश प्रवक्ता जितू दुधाने, शहर महासचिव अभिजीत गोंडाने, शहर संघटक श्याम इंगळे, युवक आघाडी शहर प्रमुख प्रशांत देशमुख, नितीन शिरभाते, शेषराव धुळे, इमरान शहा, प्रशांत शिरभाते, आकाश गजभिये, इमरान खान, सुनील खत्री, नितीन तायडे, मनीष देशमुख, मिथुन पुरोहित, संदीप चव्हाण, चेतन बर्डे, अजय तायडे, नंदू वानखडे, कुणाल खंडारे, आकाश जगदाळे, विक्रम जाधव, अमन गौरवे, अनिल रामटेके, ओम गुगलमाने, रितेश पुरी, राहुल गाखरे, अनिकेत गवई यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवजात बाळाची विक्री करणाऱ्या डॉक्टरवर गुन्हा दाखल करा

## युवतीसेना प्रमुख कोमल बद्रे आणि भुयार यांची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत गंभीर घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन मुलीच्या प्रसूतीनंतर तिच्या नवजात बाळाला पैशाच्या व्यवहारातून विकण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक आरोप आहे. या प्रकरणावरून शिवसेना सहसंपर्क प्रमुख वर्षा भोयर आणि युवती सेना जिल्हा प्रमुख कोमल बद्रे यांनी उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहून तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी आज सोमवार १९ ऑक्टोंबर रोजी पत्रकार परिषदेतून केली आहे. त्यांनी आरोप केले आहे की, १६ ऑक्टोबर रोजी एका अल्पवयीन मुलीची प्रसूती झाली. प्रसूतीनंतर तिच्या नवजात बालिकेला तिच्या आईपासून वेगळे ठेवण्यात आले आणि त्या बाळासाठी पैसे द्यायला तयार असलेल्या ग्राहकांचा शोध सुरू असल्याची माहिती वर्षा भोयर आणि कोमल बद्रे यांना मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी या प्रकरणाची पडताळणी केली. यासाठी गर्भधारणेसंबंधी वैद्यकीय सल्ला घेण्याच्या बहाण्याने एका महिलेला संबंधित डॉक्टर म्हणजेच डॉ. वैशाली भोजने यांच्याकडे पाठवण्यात आले, त्यानंतर हे प्रकरण समोर आले. पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हा प्रकार केवळ बाळाच्या विक्रीपुरता मर्यादित नाही, तर या संपूर्ण प्रकरणात बालकांची कथित विक्री, धमकी आणि खंडणी यांसारखे गंभीर आरोप जोडले गेले आहेत. एका अल्पवयीन पीडितेच्या असहाय्यतेचा फायदा घेत तिच्या बाळाचा सौदा करणाऱ्या डॉक्टरवर तात्काळ गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात केली आहे.


**शेत विकणे आहे**

**हेक्टर आर चौ.मि.१.५७, मौजे काट आमला भुमापन क्र.५२/१/क , बडनेरा ता.जि.अमरावती या सर्व्हे नंबरचे शेत विकणे आहे.**

**-संपर्क-**

**गजानन विठठलराव कुंभलकर**
**जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती**
**मो.नं.९८६५२३७८४५**



Jayashri Rajesh Rathi.
New Name
Jaya Rajesh Rathi
Shrikrishna peth .Morshi
हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे.


### दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), चांदूर रेल्वे जि.अमरावती यांचे न्यायालय
### जाहीरनामा

**आर.एम.जे.सि.क्रमांक २१३/२०२४** नेमलेली तारीख २१.११.२०२६

**अर्जदार :-**
१. **गिता भानुदास मेश्राम,** वय ७३ वर्षे, धंदा - घरकाम
२. **सविताबाई रामहरी बागडे,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.येरली, पो.मंगरुळ दस्तगीर, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
३. **ललिता संजय मारबदे,** वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पहुर, ता.फुबगाव, जि.अमरावती
४. **संगिता प्रमोद मारबदे,** वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वार्ड क्र.२, वरुड, पाचखेड, जि.यवतमाळ
५. **वनिता सतिश देवगडे,** वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वार्ड क्र.०७, उपजिल्हा रुग्णालय, मोशी, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **सतिश भानुदास मेश्राम,** वय ४८ वर्षे, धंदा - मजुरी
७. **नंदकिशोर भानुदास मेश्राम,** वय ४० वर्षे, धंदा - नोकरी
अर्जदार क्र.१, ६, व ७ रा.कवठा कडू, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

या नोटिस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **गिता भानुदास मेश्राम व इतर** यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळविण्याकरिता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे, अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **भानुदास तुकाराम मेश्राम** यांचा मृत्यू दिनांक **२७/०२/२०२६** रोजी मौजा **कवठा कडू, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार यांचे शिवाय मयताचे इतर कोणीही वारसदार नाही, असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज **दिनांक ०९ माहे ऑक्टोंबर २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

आदेशान्वये,
शिक्का **सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **21/2026 कलम ५० अ (१)** **पु.ता.१९.१०.२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व **श्री हनुमान मंदिर, शिरपुर, ता.नांदगाव खंडे., जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **अे-२००८/अम. बाबत**
बाबत अर्जदार - **श्री दिलीप लक्ष्मणराव मेश्राम व इतर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा.धर्मादाय उपआयुक्त-अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० अ (१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - परिशिष्ट १ प्रमाणे**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- परिशिष्ट १ प्रमाणे**

सदर प्रकरण महा.सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ (१) अन्वये न्यायिक बोर्डवर दाखल झालेले आहे.

**प्रस्तावित योजनेप्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळ -**

| | |
|---|---|
| ०१. श्री हरिभाऊ महादेवरावजी पुसदकर | ०२. श्री रामचंद्र महादेवराव सरदार |
| ०३. श्री दिपक विष्णुपंत पुसदकर | ०४. श्री नंदुआप्पा गोदाआप्पा केशरखाने. |
| ०५. श्री दत्त रामभाऊ पुसदकर | ०६. श्री संतोष वामनराव काळे |
| ०७. श्री विजय बाबाराव खंडार | ०८. श्री मोहन साहेबराव गाडेकर |
| ०९. श्री दिलीप लक्ष्मणराव मेश्राम | १०. श्री मंगेश अरविंदराव पुसदकर |
| ११. श्री विजय मोतीरामजी किंदरले | १२. श्री जानराव यादवरावजी आरोकर |
| १३. श्री रमेशआप्पा साहेबराव आप्पा गाडेकर | १४. श्री धैर्यधर काशिरावजी पुसदकर |
| १५. श्री रघुनाथआप्पा विश्वनाथआप्पा गाडेकर | |

गैरअर्जदार- कोणी नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय उपआयुक्त अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १५.०९.२०२६ रोजी दिली.

सही/-
शिक्का अधीक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

### -जाहीर नोटीस-
### सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी चांदूर बाजार

**कि.फौ.अर्ज क्र.३४४/२०२६,** **ने.ता. ०८/१२/२०२६**

**अर्जदार-** **नसरीन बानो सैय्यद रियाज, वय ४७ वर्ष, धंदा- घरकाम**
रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म व मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

ज्याअर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदार विरुध्द जन्म मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम १३ (३) (ब) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने नेमलेल्या वकिलांसह सह दिवाणी व फौजदारी न्यायालय क्र.२ चांदूर बाजार येथे हजर राहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या सही शिक्यानिशी दिले.

**दिनांक - १४/१०/२०२६**

**आदेशानुसार**
सही/-
शिक्का (**क.लिपिक**)
सह दिवाणी न्यायालय, (क.स्तर)
चांदूर बाजार

### -जाहीर नोटीस-
### विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी चांदूर बाजार, जि.अमरावती

**इतर किरकोळ फौजदारी प्रकरण क्र.३५१/२०२६,** **ने.ता. २४/११/२०२३**

**अर्जदार-** **सुरज पांडूरंग सोनार, वय ३६ वर्ष, धंदा- मजुरी**
रा.रामनगर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**गैरअर्जदार-** **निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अ अन्वये मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराने त्यांचे आजोबा रामराव किसनराव सोनार मृत्यूची नोंद करण्याकरिता अर्ज जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १३ (३) आणि जन्म व मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जात असे नमूद केले आहे की, अर्जदार त्यांचे आजोबा रामराव किसनराव सोनार यांचा मृत्यू दि.२९/०८/२०२४ रोजी मौजा करजगांव, ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथे झाला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द दिनांकापासून ३० दिवसांचे आंत न्यायालयात कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून नोंदवावो त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक - १७/१०/२०२६

**आदेशानुसार**
सही/-
शिक्का (**सहाय्यक अधिक्षक**)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, (क.स्तर),
चांदूर बाजार

### सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६७९/२०२६ ने.ता.१८.११.२०२६

अर्जदार -
१. श्री. प्रकाश अंबादास भुयार, **वय ७० वर्षे, धंदा - शेती**
**रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती**
२. सौ.अरुणा हरिभाऊ कोल्हे, **वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.गणेश कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती**
३. सौ.माला रामेश्वर गावंडे, **वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.जवाहर नगर,अमरावती, ता.जि.अमरावती**
४. सौ.अल्का मोरेश्वर काळमेघ, **वय ६० वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.भांबोरा,पो.कवाडगव्हाण, ता.तिवसा, जि.अमरावती**
५) दिलीप अंबादास भुयार मयताचे वारस
५ अ) **निखिल कुमार दिलीप कुमार भुयार, वय ३३ वर्षे, धंदा - व्यवसाय**
**रा.इमराव बाग अस्सी वाराणशी (उत्तर प्रदेश)**
६) विलास अंबादास भुयार मयताचे वारस
६अ) श्रीमती कल्पना विलासराव भुयार, **वय ५६ वर्षे, धंदा - शेती**
६ब) सारंग विलासराव भुयार, **वय २९ वर्षे, धंदा - शेती**
६क) कु.पुजा विलासराव भुयार, **वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम**
**तिघेही रा.स्वागत कॉलनी, पिंपरी मेघे, जि.वर्धा**

-- विरुध्द --
कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ ते ४ चे वडिल तर अर्जदार नं.५ (अ) व अर्जदार नं.६ (ब,क,ड) चे आजोबा तर अर्जदार नं.६ (अ) चे सासरे नामे** अंबादास काशीराव भुयार **हे** दिनांक २८/०८/२००२ **रोजी** खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती **येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.**

**दिनांक- १७/१०/२०२६**

**आदेशानुसार,**
शिक्का **(सहाय्यक अधीक्षक)**
**दिवाणी न्यायालय, (क.स्तर), मोर्शी**

### जाहीर नोटीस

**प्रो.नं.२१४६/२०२६**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर**
**दि.२९.०८.२०२६**

### वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील यु.एन.पाटील, सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.३६१/२०२६ ने.ता.२३.११.२०२६

**अर्जदार -** १. **रुपाली पंडितराव देवके,** वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सिव्हील लाईन पोलीस स्टेशन जवळ दर्यापूर,
ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रंजनी पंडित देवके** हया दिनांक २२.०७.२०२६ रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :- मयत रंजनी पंडित देवके** याचे नावे मौजा दर्यापूर येथील शिट क्र.३२, प्लॉट क्र.३२६६/३४, क्षेत्रफळ ११६.९१ चौ.मी. भोगवटदार -२ इतकी संपत्ती असून सदर जागेची किंमत २०,०००/- रु.इतकी आहे.

आज दि.२९.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

### जाहीर नोटीस
### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.४९५/२०२६** **ने.ता.३०.११.२०२६**

**अर्जदार :** १. **इंदू रामदास नान्हे,** वय ६६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **शिंधु रमेशराव भानगे,** वय ७६ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.सर्फाबाद, पो.हिरुळपुर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक अंजना गणाजी पारिसे** यांचा **मृत्यू दि.२०/११/२०२३** रोजी तसेच **मृतक गनाजी शिवरामजी पारिसे** यांचा **मृत्यू दि.२४/११/२०१०** रोजी रा.सर्फाबाद, पो.हिरुळपुर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४९५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१४.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

### जाहीर नोटीस

**प्रो.नं.१९१२/२०२६**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर**
**दि.०५.०८.२०२६**

### वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील एम.डी.कमलाकर, सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.३२५/२०२६** **ने.ता.२४.११.२०२६**

**अर्जदार -** १. **अरुणा विजय थोरात,** वय ४५ वर्षे, धंदा -शेती
२. **रवि विजय थोरात,** वय २५ वर्षे, धंदा -शेत मजुरी
अ.क्र.१ व २ रा. सांगळूंद, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **पल्लवी विक्की जामनिक,** वय २२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लाखपुरी, ता.मुर्तिजापुर, जि.अकोला

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **विजय जानराव थोरात** हे दिनांक २४.१०.२००६ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०५.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
शिक्का सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विविध संस्था, संघटना आणि 'नूटा'मुळे उमेदवारांना बळ

## पाठिंब्यामुळे ताकद वाढली; अमरावती शिक्षक मतदारसंघाची निवडणूक रंगात

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत आता चांगलीच चुरस निर्माण झाली असून, विविध शैक्षणिक संस्था, संघटना आणि शिक्षकांच्या पाठिंब्यामुळे काही उमेदवारांची ताकद वाढली आहे. त्यातच नूटा (NUTA) संघटनेने परिपत्रक जाहीर करून प्रा.डॉ.प्रशांत विघे,प्रा.अदिती पोहरे,दिलीप कडू आणि अविनाश बोर्डे या उमेदवारांना आपापल्या पसंतीनुसार मतदान करण्याचे आवाहन केल्याने निवडणुकीतील राजकीय गणिताला नवे वळण मिळाले आहे.

येत्या २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या निवडणुकीसाठी विविध उमेदवारांनी प्रचाराची जोरदार तयारी केली आहे. मात्र, शिक्षक मतदारांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी ठरणाऱ्या उमेदवारांची ताकद वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

शिक्षण क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या उमेदवारांना विविध संस्था आणि संघटनांकडून मिळणारा पाठिंबा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे.

प्रा.डॉ. प्रशांत विघे आणि प्रा. अदिती पोहरे हे उच्च शिक्षण क्षेत्राशी संबंधित असून, दिलीप कडू आणि अविनाश बोर्डे यांनाही शैक्षणिक कार्याचा अनुभव आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांची जाण, शिक्षकांशी असलेला संपर्क आणि संघटनांचे पाठबळ या बाबी निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



अदिती पोहरे | प्रशांत विघे | दिलीप कडू | किरण सरनाईक

विद्यमान आ.किरण सरनाईक आणि माजी आ.श्रीकांत देशपांडे यांच्यासमोर नव्या पर्यायांच्या रूपाने उभे राहिलेले उमेदवार निवडणुकीची रंगत वाढवत आहेत. विशेषतः प्रा. डॉ. प्रशांत विघे आणि प्रा. अदिती पोहरे यांना मिळणारा पाठिंबा लक्षवेधी ठरत असून, यंदाच्या निवडणुकीत पारंपरिक राजकीय समीकरणे बदलणार का, याबाबत शिक्षक वर्तुळात चर्चा सुरू आहे.

**पसंतीक्रमाच्या मतदानामुळे गणित गुंतागुंतीचे**

शिक्षक मतदारसंघात पसंतीक्रमानुसार मतदान होत असल्यामुळे कोणता उमेदवार बाजी मारणार, याचा अचूक अंदाज बांधणे कठीण झाले आहे.

पहिल्या पसंतीच्या मतांसोबतच पुढील पसंतीक्रमातील मतांचे महत्त्वही निकालावर प्रभाव टाकू शकते. त्यामुळे विविध उमेदवारांना मिळणारा संस्थात्मक आणि संघटनात्मक पाठिंबा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. प्रशांत विखे यांना पाचवी जिल्ह्यातून मतदारांनी चांगले समर्थन दिल्यामुळे

यंदा नव्या उमेदवाराला संधी देण्याचा विचार या निमित्ताने शिक्षक मतदारांकडून व्यक्त होत असल्याची चर्चा आहे.

`आता शिक्षक मतदार कोणाच्या बाजूने कौल देतात आणि पसंतीक्रमाचे गणित कोणाला विजयाच्या जवळ नेते, याकडे संपूर्ण अमरावती विभागाचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

**चांदुर रेल्वे**-राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालय चांदुर रेल्वे येथील विद्यार्थ्यांनी नीट,जेईई या सारख्या परीक्षेमध्ये प्राविण्य प्राप्त करत विविध क्षेत्रांमध्ये आपला प्रवेश निश्चित करत महाविद्यालयाचो नावलौकिक केले. सोहम नितीन राठोड याने नीट परीक्षेत प्राविण्य प्राप्त करत एमबीबीएस ला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश निश्चित केला.वेदिका प्रदीप गाढवे व कोमल गजानन गायकवाड हिने सुद्धा परीक्षेत प्राविण्य प्राप्त करत एएनएम नर्सिंग ला प्रवेशित झाली.दीप्ती दिवाकर राऊत हिने COEP टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी येथे इलेक्ट्रॉनिक इंजीनियरिंग ला प्रवेश निश्चित केला. या सर्व विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त करत महाविद्यालयाचे नावलौकिक करत उज्वल परंपरा कायम ठेवली.यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अतुल विद्या मंदिर संस्थेचे सर्व पदाधिकारी प्रा.उत्तरा वि.जगताप,प्रा.वीरेंद्र जगताप,डॉ.वैष्णवी जगताप,परीक्षित जगताप तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पराग वडनेरकर आणि सर्व शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





### बालिकांनी साकारली देवीची नऊ रूपे

**मोशी**-मोशी येथील पोलीस स्टेशनच्या बाजूला असलेल्या जय दुर्गा मंडळात नवरात्रीनिमित्त नऊ बालिकांनी देवीची नऊ रूपे साकारून उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.या कार्यक्रमात शैलपुत्री देवी, ब्रह्मचारिणी देवी, चंद्रघंटा देवी, कूष्मांडा देवी, स्कंदमाता देवी, कात्यायनी देवी, कालरात्री देवी, महागौरी देवी आणि सिद्धिदात्री देवी अशी दुर्गामातेची नऊ रूपे नऊ बालिकांनी सादर केली. या बालिकांनी देवीच्या विविध रूपांतील वेशभूषा परिधान करून आपल्या सादरीकरणातून भक्तिमय वातावरण निर्माण केले.या सर्व नऊ बालिकांची देवीच्या विविध रूपांतील सुंदर व आकर्षक वेशभूषा दीपा फंदे यांनी साकारली.या अनोख्या उपक्रमातून देवीच्या नऊ रूपांचे दर्शन घडल्याने उपस्थित प्रेक्षकांनी समाधान व्यक्त केले.जय दुर्गा मंडळाच्या या उपक्रमातून नवरात्रोत्सवाचा धार्मिक आणि उत्साह अनुभवायला मिळाला.



श्री शिवाजी दुर्गोत्सव मंडळ सहाखिराडी चौक, अंजनगाव बारी



न्यु बालवीर दुर्गोत्सव मंडळ आसरा नगर, अंजनगाव बारी

## जुळ्या शहरातील पाणीटंचाईवरून नगरसेवक राज पाटील आक्रमक; लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील विविध प्रभागांमध्ये नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत असून, या समस्येमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे नगर परिषदेचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा अचलपूर नगर परिषदेचे नगरसेवक राज पाटील यांनी सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी परतवाडा येथील नगर परिषद कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाच्या



इमारतीवर चढून आक्रमक आंदोलन केले. पेट्रोल व लायटर घेऊन त्यांनी केलेल्या या आंदोलनामुळे नगर परिषद परिसरात एकच खळबळ उडाली.

आंदोलनाची माहिती मिळताच अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्यासह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी राज पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांना आंदोलन मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. जुळ्या शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चंद्रभागा धरणात मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्के अधिक पाणीसाठा उपलब्ध असल्याची बाब उपस्थित करत, शहरातील नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा का होत नाही, असा सवाल राज पाटील यांनी उपस्थित केला. शहरातील विविध प्रभागांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली. याशिवाय, ब्राह्मणसभा परिसरातील नागरिकांनाही पाणीटंचाईचा त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषदेने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका त्यांनी घेतली. अखेर अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी पाणीपुरवठ्याशी संबंधित मागण्या मार्गी लावण्याबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर राज पाटील यांनी आपले आंदोलन मागे घेतले. या आंदोलनादरम्यान नगर परिषद अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते. आंदोलनामुळे नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

**सर्वेक्षणाची गरज**

जुळ्या शहरातील पाणीटंचाई कोणकोणत्या प्रभागात आहे? याचा सर्वेक्षण होण्याची गरज आहे. आणि जुळ्या शहरातील सर्व भागात पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनुभवी व सुसज्ज कंपनीला कंत्राट देण्याची मागणी सुद्धा नागरिकांनी केली आहे.एकीकडे जुळ्या शहरातील अनेक रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे काम काही महिन्यातच झाले आहे.यानंतर ही पाणीपुरवठा विभागाचे संबंधित ठेकेदार मनमर्जीप्रमाणे रस्ते पाइपलाइन दुरुस्तीच्या चा नावावर खोदत आहे. एकाच ठिकाणी तीन ते चार वेळा पाइपलाइन दुरुस्तीच्या नावावर खोदून ही पाणीटंचाई ची समस्या मार्गी लागलेली नाही.यामुळे पाणीटंचाई ची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## शेतशिवारातून शेतकऱ्याची दुचाकी लंपास

**करजगाव** - शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना चौधर खेल देशमुख शेतशिवार परिसरात घडली. याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सुनील नामदेवराव वडनेरकर रा. करजगाव हे १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते.

यावेळी त्यांनी आपली काळ्या रंगाची, निळे पट्टे असलेली हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल शेताजवळ उभी केली होती.

.याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४४९/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये मोटारसायकल चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चोरीस गेलेल्या मोटारसायकलची किंमत अंदाजे ३५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, शेतातून दुचाकी चोरीला गेल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, चोरट्याचा शोध घेऊन चोरीस गेलेली मोटारसायकल परत मिळविण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## कॅडेन्स ॲकेडमीच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाला शैक्षणिक भेट

**अमरावती/का.प्र.**

येथील कॅडेन्स ॲकेडमीच्या इंटेरिअर डिझायनिंगच्या विद्यार्थी व शिक्षकांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाला नुकतीच शैक्षणिक भेट दिली.या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी गृहविज्ञान विभागातील दृकश्राव्य प्रयोगशाळा, परिसंवाद सभागृह,ध्यानकक्ष यांची पाहणी केली.तेथील अंतर्गत रचना,फर्निचरची मांडणी,उपलब्ध जागेचे नियोजन आणि विविध सुविधांचा उपयोग याचे विद्यार्थ्यांनी बारकाईने निरीक्षण



केले.

यावेळी गृहविज्ञान विभागातील शिक्षक सुमित गेडाम, डॉ. रविशा आंबेकर, अनुश्री आडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दृकश्राव्य प्रयोगशाळेचा शैक्षणिक उपयोग, फायदे तसेच विभागातील विद्यार्थी या प्रयोगशाळेचा अध्यापन-अध्ययन आणि विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी कसा वापर करतात,याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शैक्षणिक भेटीचा उद्देश,त्यांनी केलेले निरीक्षण,भेटीतून मिळालेली माहिती यांविषयी विचारपूस केली व विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव,निरीक्षणे मांडली.सदर शैक्षणिक भेट कॅडेन्स ॲकेडमीचे शिक्षक कौस्तुभ रानडे व स्वानंदी जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.सदर शैक्षणिक भेट ज्ञानवर्धक व अनुभवसमृध्द करणारी ठरल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देणारी ही भेट विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास कौस्तुभ रानडे यांनी व्यक्त केला.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनी

**अमरावती**-स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाद्वारे नुकताच वाचन प्रेरणा दिन पुस्तक प्रदर्शनी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनाच्या प्रसंगी प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी मार्गदर्शन करताना ग्रंथालये वाचन साहित्याने परिपूर्ण असतानाही विद्यार्थ्यांची वाचनाची आवड मंदावत चालल्या बद्दल खेद व्यक्त केला. डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांच्या जीवनातील



वाचनाचे सामर्थ्य अधोरेखित केले.डॉ अब्दुल कलाम यांना आदरांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने तरी निदान ग्रंथालयाचा वापर विद्यार्थ्यांनी करावा असे आवाहन याप्रसंगी प्राचार्यांनी केले. प्रास्ताविकाच्या माध्यमातून वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य प्रा. डॉ. अतुल वानखडे ग्रंथपाल यांनी समजावून सांगितले. डॉ. कलाम आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या दोघांच्याही व्यक्तिमत्व जडण घडणीत वाचनाची ऊर्जा होती. महात्मा ज्योतिराव फुले यांच्यावर थॉमस पेन यांच्या ग्रंथाचा अत्याधिक प्रभाव होता.वाचनाने मनुष्य केवळ ज्ञान समृद्धच होत नाही तर त्याचे शब्द सामर्थ्य वाढते,त्याच्यात वैचारिक प्रगल्भता येते,भावनिक अभिव्यक्ती करण्यासाठी वाचन अनिवार्य आहे आणि म्हणून जगण्याची उर्मी देण्याचे आणि आयुष्याला नवीन दिशा देण्याचे कार्य वाचन संस्कृती करते कार्यक्रमाचे संचालन,आयोजन, प्रास्ताविक आणि आभार प्रा. डॉ अतुल वानखडे यांनी केले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भरभरून या पुस्तक प्रदर्शनीला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी उज्वला चव्हाण, ग्रंथालय सहायक व इतर शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## नांदरुन बुद्धविहारात तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीचे अनावरण,

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर तालुक्यातील नांदरुन येथिल बुद्धविहारात वर्षावासानिमित्त भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे अनावरण व प्रतिष्ठापना सोहळा उत्साहपूर्ण आणि धम्ममय वातावरणात पार पडला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते नितेश वानखडे यांच्यासह गावातील नागरिकांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. नितेश वानखडे, मुरलीधर रायबोर्ड, भारतीय बौद्ध महासभेचे दर्यापूर तालुका अध्यक्ष रामदास वाकपांजर, उपाध्यक्ष धनराज रायबोले,अरुण रायबोले, दौलत रायबोले, अशोक ना. रायबोले, माजी उपसरपंच प्रमोद मानकर,पोलीस पाटील सुभाष ब. रायबोले, चंदू रायबोले, विद्याधर रायबोले जगदीश कांबे,संगिता रायबोले प्रमिला रायबोले,आचल रायबोले, राजकन्या वानखडे,कमला रायबोले यांच्यासह इतर मान्यवर नागरिक महिला मोठया संख्येने उपस्थित होते.तथागत गौतम बुद्ध यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात समता, न्याय, शांतता आणि बंधुता करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत, असा संदेश या प्रतिष्ठापना सोहळ्यातून देण्यात आला.

## सेवा संकल्प अभियानातर्गत दिव्यांगांसाठी विशेष आरोग्य शिबीर

### १५५ दिव्यांगांनी घेतला आरोग्य तपासणीचा लाभ

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

सेवा संकल्प अभियान तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती आणि ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. मेघा गिर्हेपुंजे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीत पार पडलेल्या या शिबिराला शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील दिव्यांगांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १५५ दिव्यांगांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.



दिव्यांग व्यक्तींना विविध वैद्यकीय तज्ज्ञांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांची तपासणी करणे तसेच आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शिबिरात उपस्थित राहून दिव्यांगांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी केली.जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथून अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत लांजुळकर, फिजिशियन डॉ. गुणवंत जटाळ, मनोविकारतज्ज्ञ डॉ. स्वाती सोनोने, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. दीपक पवार आणि कान, नाक व घसातज्ज्ञ डॉ. जुनेद खान यांनी रुग्णांची तपासणी केली.यावेळी दिव्यांग विभागप्रमुख प्रमोद भक्ते, दिव्यांग विभागाच्या समुपदेशक अश्विनी म्हैसणे, फिजिओथेरपिस्ट डॉ. नितीन चौके, डॉ. अर्पित राऊळ, डॉ. स्वप्नजा निबोकार व डॉ. अमोल भातकुलकर, ऑडिओलॉजिस्ट राहुल थोरात, मानसिक आरोग्य विभागातील सचीन टौलारे व सुनील कळथकर तसेच नेत्ररोग सहाय्यक आरती चव्हाण यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनीही सेवा दिली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामध्ये डॉ. वेदांत ग. टांक, डॉ. अक्षय रेखाते, डॉ. मृणाल मोहोड, डॉ. तरुण पटेल, डॉ. साकीब शेख आणि डॉ. सुवर्णा बिहाडे यांचा समावेश होता. मुख्य अधिपरिचारिका भाग्यश्री अस्वार यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या व्यवस्थापनासाठी सहकार्य केले.शहर आणि ग्रामीण भागातील एकूण १५५ दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घेतल्याने दिव्यांगांच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.दिव्यांग व्यक्तींना सुलभतेने आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे असून, या उपक्रमातून दिव्यांगांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित झाले.

